भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

वर्ष ४०] त्रैमासिक [अंक १-४

१५७-१६०

शिव-चरित्र-साहित्य

१२ वा खंड

(स्वीय-ग्रंथमाला-क्र. ९४)

BHĀRATA ITIHĀSA SAMŚODHAKA MAṆḌAḶA

Vol XL } QUARTERLY } Nos. 1-4

157-160

Records of the Shivaji Period, Vol. XII

शक १८८६] किंमत ५ रु. [A. D.
रा. श. २९१] Price Rs. 5 [1964-65

निवेदन

(१) आपल्या त्रैमासिकाच्या चाळिसाव्या वर्षाचे एक ते चार अंक किंवा शिवचरित्रसाहित्य १२ वा खंड म्हणजे प्रस्तुत पुस्तक होय. एकुणचाळिसाव्या वर्षाचे एक ते चार अंक किंवा ऐतिहासिक संकीर्ण साहित्य ११ वा खंड श. १८८१ च्या मार्गशीर्षांत प्रकाशित झाल्यावर जवळजवळ साडेचार वर्षांनीं हें त्रैमासिक पुस्तक प्रकाशित होत आहे. पण यावरून कोणी अशी समजूत करून घेऊं नये कीं, या साडेचार वर्षांच्या मध्यंतरांत मंडळानें कांहींच प्रकाशित केलें नाहीं. या अवधींत मंडळानें एक भारतइतिहाससंशोधक-मण्डलस्थहस्तलिखितग्रंथानुक्रमणिका (श. १८८१, डबल क्राऊन, ३६८ पृष्ठें) व दुसरें ऐतिहासिक फार्सी साहित्य पांचवा खंड, पहिला भाग (श. १८८२, डेमी २६८ पृष्ठें) असे दोन ग्रंथ प्रसिद्ध केले. पण ते ग्रंथ मंडळाच्या केवळ अ, आ, इ या वर्गांतील सभासदांना विनामूल्य मिळणारे असल्यानें ते प्रत्येक सभासदापर्यंत पोचूं शकले नाहींत. त्रैमासिक मात्र या मध्यंतरांत निघालें नाहीं.

(२) आपल्या मराठींत ‘ घर बांधून पाहावें ’ असा एक वाक्प्रचार आहे. त्याचा अनुभव या मध्यंतरांत चांगला आला. श. १८७६ पासून सारखी खटपट केली तेव्हां श. १८८०–८४ पर्यंत मंडळाच्या नव्या वास्तूसाठीं जवळजवळ तीन लाख रुपये भारत व महाराष्ट्र या दोन सरकारांकडून मिळाले. पण मिळाले पैसे कीं राहिली वास्तु उभी असें थोडेंच होतें. वास्तूचे आराखडे व व्ययाचे संकल्प पक्के तयार करणें, त्यांस आवश्यक त्या कचेऱ्यांच्या व अधिकाऱ्यांच्या संमति मिळविणें, ठेके देणें, कामावर सतत देखरेख ठेवणें, नियंत्रित सामान नियंत्रित भावांत मिळविणें, इत्यादि कामांत इतका वेळ गेला कीं, संशोधनप्रकाशनाकडे आवश्यक तेवढें लक्ष पुरविणें शक्य झालें नाहीं. एवढें केलें तेव्हां कोठें तुलनेनें समाधान मानण्यासारखी वास्तु उभी राहिली. तिच्या चांगुलपणांत ठेकेदार व त्याहून अधिक सल्लागार स्थपति यांचेही वाटे आहेत. पण नुसती वास्तु उभी राहण्यानें काय होणार ? तीमध्यें वस्तु ठेवण्यासाठीं शिड्या, कपाटें, ओटे, मंजूषा, घोडे इ. सामान पाहिजे. त्यासाठींही खटपट केली तेव्हां ५०।६० हजार रुपये मिळाले. त्यांतून तयार केलेल्या किंवा विकत घेतलेल्या सामानांत मंडळसंग्रह यथाशक्य लावून ठेवला आहे, यांतही कांहीं कमी वेळ गेला नाहीं. तरीहि अजून उपर्युक्त सामानासाठीं अधिक द्रव्याची आवश्यकता आहेच. खेरीज मंडळाच्या योगक्षेमासाठीं किमान दहा लाख रुपये पाहिजेत ते निराळेच.

(३) पण वास्तूच्या उभारणीचें काम चालू असतां सामग्री जमविण्याचें व संशोधनाचें काम स्थगित झालें नव्हतें हें श. १८८१ ते ८४ च्या मंडळाच्या वार्षिक वृत्तांतांवरून दिसून येईल. या पुस्तकांत प्रकाशिलेल्या कागदांचें बहुतेक कामही याच कालखंडांत झालेलें आहे.

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, पुणें

वर्ष ४०] त्रैमासिक [अंक १-४

१५७–१६०

शिव-चरित्र-साहित्य

१२ वा खंड

(स्वीय–ग्रंथमाला–क्र. १४)

BHĀRATA ITIHĀSA SAMŚODHAKA MAṆḌAḶA

Vol XL { QUARTERLY } Nos 1-4

157-160

Records of the Shivaji Period, Vol. XII

शक १८८६] किंमत ५ रु. [A. D.
रा. श. २९१] Price Rs. 5 [1964-65

अनुक्रमणिका

भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिकाची केंद्रसरकारच्या नियमानुसार द्यावयाची माहिती (१९५६ चे नियम, नियम ८, नमुना ४)

१ प्रकाशनस्थळ—भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २

२ प्रकाशन काल—त्रैमासिक

३ मुद्रकाचें नांव राष्ट्रीयत्व व पत्ता — दत्तात्रय वासुदेव आंबेकर, भारतीय; आर्यभूषण प्रेस ९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४

४,५ प्रकाशक व साधारण संपादक यांचीं नांवें, राष्ट्रीयत्व व पत्ते — श्री. गंगाधरराव नारायणराव मुजुमदार, श्री. गणेश हरि खरे, श्री. विश्वनाथ त्र्यंबक शेटें, भारतीय; १३२१ सदाशिव पेठ, पुणें २.

६ मालक व पत्ता–भारत इतिहास संशोधक मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २.

आम्ही उपर्युक्त तिघे प्रकट करतों कीं, आमची माहिती व विश्वास यांप्रमाणें वर दिलेला तपशील अचूक आहे.

ता. २२।६।१९६४.

गं. ना. मुजुमदार, ग. ह. खरे, वि. त्र्यं. शेटे.

शब्दसंक्षेप

अ. = अस्पष्ट
अष्ट. = अष्टकोनी
इ. = इसवी वर्ष
औ. = औरंगजेबी
क्र. = क्रमांक
चौ. = चौकोनी
जखर = जमादिलाखर
जवल = जमादिलावल
जु. = जुलूस वर्ष
नि. = निराळ्या वळणांत
पै–पौ = पैवस्ती
फ. = फसली वर्ष
फा. = फार्सी
ब. = बदामी
ब. द. = बहुदळी
बा. = बालबोध
म. = मराठी
मज. = मजकूर
मो. = मोर्तब
मो. जा. = मोकळी जागा
रा. = रवाना
रा. श. = राज्याभिषेक शक
ले. = लेखांक
लं., लं. व. = लंबवर्तुळी
वा. = वाटोळा
श. = शक वर्ष
शि. = शिक्का
ष. = षट्कोनी
सु. = सुहूर वर्ष
हि. = हिजरी वर्ष

संदर्भग्रंथसंक्षेप

ऐफासा=ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड व लेखांक
कछघइसा=करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें, भाग व लेख
बाबापेरो = बाळाजी बाजीराव पेशवे रोजनिशी भाग व पृष्ठ
रा = राजवाडे खंड व लेख
शिचप्र = शिवचरित्रप्रदीप
शिचवृसं = शिवचरित्रवृत्तसंग्रह, खंड व पृष्ठ
शिचसा = शिवचरित्रसाहित्य, खंड व लेख
शिव्हिऔआ = शिवाजीज व्हिजिट टु औरंगजेब अॅट आग्रा
सप = सनदापत्रांतील माहिती

शोध

या पुस्तकाच्या छपाईंत कांहीं अशुद्धें राहिलीं आहेत. पैकीं अगदीं अपरिचित शब्दांची तोडजोड खालीं दर्शविली आहे. इतरांची नाहीं. जुन्या पत्रांत विराम-चिन्हें नसतात; येथें पडलेलीं अनावश्यक समजावीं. मात्रा व वेलांटी यांस चिकटून असलेला व अतिसूक्ष्म अनुस्वारही कांहीं ठिकाणीं अनावश्यकच आहे. क्वचित् ज, न च्या वाचनांत बदल झाला आहे. तीच स्थिति ऱ्हस्वदीर्घ उकाराची. कालानुक्रम छापून झाल्यावरही कांहीं पत्रांच्या कालनिर्देशांत सुधारणा करतां आल्या त्या येथें दर्शविल्या आहेत.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
८	१८	श.	श. १६०८ पौष वद्य १
८	१९	इ.	इ. १६८६ डिसेंबर २०
८	२४	बरामुकाबला	बरा मुकाबला
११	१४	घोडदेघ	घोडदेव
११	२०	स्र्वा	सर्वा
१२	६	घोडेस्वार	घोडेस्वार
१५	१८	गीर	जागीर
१५	१८	जागीर	तगीर
१९	१४	बाअद्रऊ	बाअद ऊ
२१	४	बाबाजी	याबाजी
२१	१७	श.	श. १६१० वैशाख शुद्ध १०
२१	१८	इ.	इ. १६८८ एप्रील २९ पूर्वी
२१	२६	तुमचे यामधे	तुमचे यामधे
२२	१	श.	श. १६१० ज्येष्ठ वद्य ४
२२	२	इ.	इ. १६८८ जून ७
२२	५	यादाजीराम	याबाजीराम
२२	१८	खान बहादुर	बहादुरखान
२५	८	सु.	हि.
२५	८	श. १६११ वैशाख वद्य ७	श. १६०० भाद्रपद वद्य ७
२५	९	इ. १६८९ मे १	इ. १६७८ ऑगस्ट २८
२५	१४	फ. ?	हि.
२५	१४	श. १६११ श्रावण शुद्ध ६	श.१६१० श्रावण शुद्ध ४
२५	१५	इ. १६८९ जुलै १२	इ. १६८८ जुलै २१
२६	१	[फ.*]	हि.

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२६	१	श. १६११ भाद्रपद वद्य ७	१६१० भाद्रपद वद्य ८
२६	२	इ. १६८९ ऑगस्ट २७	इ. १६८८ सप्टेंबर ७
२६	८	[फ.* ?]	हि.
२६	८	श. १६१२ आश्विन शुद्ध. ७	श. १६१० कार्तिक शुद्ध ७
२६	९	इ. १६९० सप्टेंबर २९	इ. १६८८ आक्टोबर २१
२६	१९	[फ* ?]	हि.
२६	१९	श. १६१२ फाल्गुन वद्य ५	श. १६११ चैत्र वद्य ४
२६	२०	इ. १६९१ मार्च ९	इ. १६८९ मार्च ३०
२७	१	[फ.* ?]	हि.
२७	१	श. १६१२फाल्गुन व.११	श. १६११ चैत्र वद्य ११
२७	२	इ. १६९१ मार्च १५	इ. १६८९ एप्रिल ५
२७	२५	आलियांबाद	आलियां बाद
२८	४	लिहिजे	लिहिने
२९	२५	सदाभाव	सदा भाव
३०	१४	‘ पौ ’ गाळा	
३५	११	फर्वांविलेवरून	फर्मांविलेवरून
३५	१५	रास	रा
३६	२	(कारआमदनी)	कारआमदनी
३७	२०	सावगावत्रफेसी	सावगाव त्रफेसी
३८	७	गांब	गांव
३९	१८	श.	श. १६१३ पौष वद्य ९
३९	१९	इ.	इ. १६९२ जानेवारी २ नंतर
३९	२३	राऊयानी	राऊ यानी
४०	शे. ओळ	‘ जाणिजे ’ गाळा	
४२	शे. ओळ	७१	५१
४३	५	कुडनूरासी	कुडनूरासी
४३	२४	सधा	सवा
४४	१०	शाहमहमद	शाह महमद
४६	२३	रुगरमल	डूंगरमल
४९	१२	मासां	मारां
५१	९	जुसेवौ लागाका	जु सेवौ भागाका
५३	१२	सासे	साढे

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
५४	३	मोपबरावरी	मोप बराबरी
५४	११	वरकउ	वरकड
५५	१०	नि।*	[नि.*]
५६	२४	गमिमानी	गनिमानी
५८	२७	कमतकवा	कमतकटा
५९	२	जिल्हेज	जिल्हेज १
६०	१४	पवित्रगडाकडे	पवित्रगडाकडे
६३	२५,२६,२८	=	२
६४	८	मानथानी	मानपानी
६४	२३	कबूलकताब	कबूलकतबा
६४	२८	रूा	का
६५	२	वडिलाये	वडिलाचे
६५	३	सताज्री	सताजी
६५	१०	राजमान्य श्रो	राजमान्य [मो. जा.*] श्रो
६५	१८	करावी	करावो
६७	११	मेवायेद	मेबायेद
६७	१३	मुस्तकील	मुस्तकीम
७३	१७	सेरिखनोह	सेरिख नोह
७४	१५	पेस्तरसाला	पेस्तर साला
७५	२४	नुमायेदकी	नुमायेद की
७६	१३	मकान हाये	मकानहाये
७९	२३	५४४०॥=	१४४०॥=
८०	११	खरीफई (यं) थ	खरीफ ई(यूं) थ
८०	११	दुयुम	दुयूम
८०	१२	' कोये ' गाळा	
८०	१७	तरवा को	तखाको
८०	२०	द्वाज दह	द्वाजदह
८१	२२	खोजेस्तेबुनियाद	खोजेस्ते बुनियाद
८२	३	आबादकार	आबादकार
८७	८	मसरूल	मसरुल
८८	७	असेल	असे
९०	७	समाचारघेत	समाचार घेत
९१	१५	येसियअजी	येसियासी
९५	२ नंतर पूरणिकेंतील ५६ अचाक्रम येतो		

पूरणिका

५६ अ

ले. ७९ } श्री. {श. १६२४ चैत्र शुद्ध १
सु. ११०२ शव्वाल२९ } कैलासवासी {इ. १७०२ मार्च १८

राजश्री बसप्रभु देसाई प्रा हूकेरी गोसावी यास

दं अखडित लक्ष्मी अलकृत राजमान्य [मो. जा.*] श्रा परशराम त्र्यबक प्रतिनिधि असिर्वाद सुा इसने मया व अलफ राजश्री श्रीनिवास माधवराव व राजश्री भीमराव रुद्र त्या प्रांते अले होते त्यास तुम्ही अपल्या जमावानिसी सामील होउनू येकनिस्टेने स्वामीकार्य त्यां बाा फिरोन केले गनिमाची ठाणी जागा जागा होती तेथेंहीं जूज मांडण करून मेहनत जे करणें ते बहुतच केली व विशालगडी खासा औरगजेब येऊन वेढा घालून भांडत असता गडीचा उपराला मदत दारूगोली सामान जे मदत करणे ते केली आणि विनति केली की काा कापसी आपली सरदेसमुखी महतकदीम चालत आहे दरम्याने माहाल देसमुख लागो देत नव्हते त्यास माहाराज राजश्री [मो. जा.*] स्वामी कृपाळू होऊन सनदा करून देऊन सरदेसमुखी अपले दुमाला केली होती त्या सनदा चिकुडीस गनीम आला त्याचे उल्हाण जाले ते समई सनदा गेल्या स्वामींनीं कृपाळू होऊन ताज्या सनदा करून देविल्या पाहिजेत म्हणऊन विनती केली त्यावरून मनास अणून तुम्ही या राज्यासीं येकनिष्ठ पहिले पासून आहां पुढेंही येकनिस्ठपणें वर्तणूक करितां तुमचे चालवणे अगत्य याकरितां पेसजी तुमची सरदेसमुखी आहे त्या प्रमाणे हाली तुमचे दुमाला केली असे हकल वाजिमा इनाम जमीन व हुगी गला व तूप व भेटी गांव विस्वा व बाजे बाबा बरहुकूम देसाई काा मार तुम्ही घेत जाणें पानमान तश्रीफ अधी तुम्ही घेत जाणे याखेरीज मुकासा गांव मौजे मादेहाल काा मार मुकासा दिला असे लावणी संचणी करून तेथील यैवज येईल तो खाऊन व सरदेसमुखीचा हक खाऊन सुखरूप आसणें सदरहु काा सरदेसमुखी व मुकासा गांव दिला असे चलऊन अेकनिस्ठ वर्तणूक करीत जाणे पुत्रपौत्री सरदेसमुखी व मुकासा गांव दिला असे यास कोणी खलेल अगर हिलाहरकत करील त्यास शफत असे तुम्ही सुखरूप असणे [नि*] छ २९ शौवाल [नि*] पाा हुजूर [ल. म. मो.*] ॰ ले॰ खना । वधी

[पाठीवर ब. म. शि.*] ~०। श्रीआई । आदीपुरुष । श्रीराजा सीव । कृपानीधी पर । सराम त्र्यंबक । प्रतीनीधी [जोडावर वरीलप्रमाणे २ मोर्तब व त्याखाली*] सुरू सूद

५६ अ—टीप

या पत्रांत औरंगजेबानें विशाळगडास घातलेल्या वेढ्याचा निर्देश आहे. या वेढ्याविषयीं गदाधर प्रल्हाद शकावलींत श. १६२३ मार्गशीर्ष मासीं (श. १७०१ नोव्हें.–डिसेंबर) औरंगजेबानें खेळण्यास वेढा घातला, दळणवळण चालू राहण्यासाठीं गाझीउद्दीनखानास ब्रह्मपुरीस ठेविलें आणि श. १६२४ ज्येष्ठ वद्य ७ (इ. १७०२ जून ५) रोजीं दोन लाख रुपये देऊन परशुरामपंता (परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी) पासून किल्ला घेतला येवढीच माहिती आहे. ऐतिहासिक पत्रव्यवहार ले. २ यांतही या वेढ्याची कांहीं माहिती आली आहे. या मानानें मासिर–इ–आलमगीरी (मूळ पृ. ४४६–४५७; कै. ज. सरकारकृत इंग्रजी अनुवाद पृ. २६७–२७२) आणि मुन्तखबुत्लुबाब (मूळ खं. २, पृ. ४९१–५०२) या दोन ग्रंथांत पुष्कळ विस्तृत माहिती आली आहे. तीवरून या वेळीं मराठे फार जेरीस आले होते असा ग्रह होतो. पण शकावलींत दोन लाख रुपये घेऊन परशुरामपंतानें किल्ला औरंगजेबाच्या स्वाधीन केला असें नमूद असून मुन्तखबुत्लुबाब मध्यें रकमेचा आकडा नसला तरी किल्ला मिळविण्यासाठीं ती गुप्तपणें द्यावी लागली असें सांगितलें आहेच. औरंगजेबास आदिलशाही राजधानी विजापूर व कुत्बशाही राजधानी गोवळकोंडे हस्तगत करण्यासाठीं अनुक्रमें तीन व आठ महिने लागले, तर मराठ्यांचा एकच किल्ला विशाळगड घेण्यास दोन लाख रुपये लाच देऊन सहा महिन्यांचा खटाटोप करावा लागला. यावरून मराठ्यांच्या प्रखर प्रतिकाराची कल्पना येते.

भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक

शिवचरित्रसाहित्य १२ वा खंड

१ नेर्ली–इनामदार

[(१) बातमी लागल्यावरून सुमारें पांच वर्षांपूर्वी मी नेर्ली (जि. बेळगांव) येथील इनामदार श्री. अनंत बळवंत उपाख्य बापूसाहेब नेर्लीकर यांजकडे जुने कागदपत्र पाहण्यासाठीं गेलों होतों. त्या वेळीं दोन दिवस तेथें राहून सुमारें दहा पोतीं कागद तपासले व त्यांपैकीं साधारण महत्त्वाचे असे ५।१० कागद घेऊन परतलों. त्याच वेळीं त्यांनीं मला सांगितलें होतें कीं, बेळगांवास त्यांजकडे एक ट्रंक भरून कागद आहेत. नंतर एकदां बेळगांवास गेलों असतां त्यांचा शोध घेतला; पण त्या वेळीं ते तेथें नव्हते. पुढें श. १८८१ च्या श्रावणांत (१९५९ चा ऑगस्ट) ते बेळगांवीं आहेत असें पाहून पुनः त्यांजकडे गेलों, तीन दिवस तेथें राहिलों आणि सुमारें पंचाहत्तर दप्तरें तपासून त्यांतून सुमारें एक हजार कागद निवडले व त्यांचीं चारपांच निराळीं दप्तरें बांधून ठेविलीं. त्याच वेळीं त्यांस विनंती केली कीं, आपण हे निवडलेले कागद घेऊन मंडळांत यावें. येतों म्हणून त्यांनीं आश्वासन दिलें. पण अशा आश्वासनांबाबत अनेक संशोधकांप्रमाणें माझाहि अनुभव फार निराशाजनक आहे. शंभर आश्वासनांपैकीं नव्याण्णव आश्वासनें फलद्रूप होत नाहींत. फार वर्षांपूर्वी सातारा व बीड येथें मिळालेल्या अशाच आश्वासनांपायीं एक नवा राष्ट्रकूट ताम्रपट, कित्येक सोन्यारुप्याचीं नाणीं व कांहीं महत्त्वाचे कागदपत्र, अशी सामग्री दृष्टीस पडूनहि दृष्टीआड झाली. पैकीं ताम्रपट अलीकडे प्रा. मांडे यांजकरवीं मराठवाडा विद्यापीठांत येऊन त्याच्या नियतकालिकांत तो प्रकाशित झाला. पण कागदपत्र मात्र कायमचे दृष्टीआड झाले. यामुळें श्री. नेर्लीकरांनीं वचन दिलें तरी ती सामग्री हातीं येते कीं नाहीं याविषयीं मन साशंकच होतें. तथापि त्यांच्या घरांतील सर्वच मंडळी सुशिक्षित व सुसंस्कृत असल्यामुळें त्यांनीं आपलें आश्वासन तंतोतंत पाळलें व मीं निवडलेले बहुतेक सर्व कागद घेऊन ते एक दिवस मंडळांत आले. नंतर श. १८८१ च्या मार्गशीर्षांत (इ. १९५९ डिसेंबर) मीं पुनः नेर्लीस जाऊन एका दिवसभरांत सुमारें दहा पोतीं कागद तपासले. पण त्यांत एक दोन पोथ्यांखेरीज अधिक प्राप्ति झाली नाहीं. नंतर श. १८८४ च्या वैशाखांत पुनः मी व माझे मित्र श्री. गो. त्र्यं. कुलकर्णी असे बेळगांवास गेलों, पूर्वीचीं दप्तरें पुनः एकदां तपासलीं व उरलेसुरले सर्व तात्कालिक किंवा कायम उपयोगाचे कागद येथें घेऊन आलों. अशा रीतीनें आणलेल्या कागदपत्रांत ११४ केवळ फार्सी, ३२ फार्सी–मराठीं व ९३० केवळ मराठी कागद आहेत. पैकीं निवडक फार्सी–मराठी व मराठी पत्रें येथें प्रसिद्ध होत आहेत. फार्सी महाराष्ट्र राज्य व भा. इ. सं. मंडळ यांच्या संयुक्त प्रकाशनांत समाविष्ट होणार आहेत.

(२) कर्नाटकांत मी मागें इ. १९३७ व इ. १९३९ अशा दोन वर्षीं शिवकालीन कागदपत्रांसाठीं संचरण केलें असतां मला पुष्कळ फार्सी, फार्सी–मराठी, मराठी व अगदीं थोडे कानडी कागदपत्र मिळाले. त्यांत महत्त्वाचे कागद पुष्कळ होते. पण या वेळीं महत्त्वपूर्ण कागदांचें जें प्रमाण पडलें आहे तेवढें प्रमाण पूर्वीच्या कागदांत पडलें नव्हतें. यांत पूर्वीप्रमाणेंच फार्सी, फार्सी–मराठी व मराठी कागद मिळाले; पण कानडी कागद औषधालासुद्धा मिळाला नाहीं. याचा अर्थ मागें सोलापूर देसायांच्या कागदांविषयीं लिहितांना जो मीं लावला होता तोच होतो. घरीं बोलण्याची भाषा कोणती का असेना. सार्वजनिक व्यवहारांत पहिल्या प्रतीचे राजकीय हुकूम फार्सी किंवा फार्सी-मराठीमध्यें निघत; आणि बाकी सर्व व्यवहार मराठीमधून चाले. मग त्या व्यवहारासाठीं लिहिलेले कागद सरकारी कामाचे असोत किंवा गांवकीचे होवोत किंवा खाजगी पत्रव्यवहार राहो.

(३) या घराण्याचे कागद तपासल्यावर मला दिसून आलें तें असें – हुकेरी देसायांचा मूळ पुरुष व खंडोबाचा एकनिष्ठ भक्त खंडेराव हा कांहीं कारणानें नळदुर्गच्या किल्ल्यांत कैदेंत खितपत होता. तथापि नळदुर्गचा खंडोबा त्याच्या भक्तीनें त्यावर प्रसन्न झाला व त्यास त्यानें दृष्टान्त दिला कीं, तूं आतां येथून जा; तुझीं सर्व बंधनें तुटतील; तुला दरवाजे उघडतील; आणि मागें न पाहतां जेथवर जाशील तेथवर मी तुझ्याबरोबर येईन. पण मागें पाहशील तेथेंच मी थांबेन. या दृष्टांताप्रमाणें खंडेराव नळदुर्गाहून निघाला तो एकसारखा चालत तडक अथणीजवळच्या मंगसुळी गांवापर्यंत आला. तेथें त्यास मागें पाहण्याची बुद्धि झाली. पण तसें करतांच एका निळ्या घोड्यावर निळा पोशाख केलेला, सांगातीं कुत्रे असलेला एक तेजस्वी पुरुष अंतर्धान पावतांना त्यास दिसला. हा खंडोबाच होता. तेव्हां मागें पाहिल्याबद्दल त्यास दुःख झालें. पण आतां उपाय नव्हता. तथापि तो तसाच पुढें जात राहिला व ऐनापुरास पोंचला. तेथें त्याची व गंगरस नांवाच्या एका ब्राह्मणाची गांठ पडली. त्याची बहीण कोंकणांत प्रभानवल्ली येथें देशमुखांकडे दिली होती. तिचा बाबजी नामक एक हुशार मुलगा या वेळीं गंगरसाच्या घरीं होता. खंडेरावानें हा मला कारभारी देतां का म्हणून विचारिलें. गंगरसानें संमति दिल्यावर खंडेराव त्या मुलाला बरोबर घेऊन हुकेरीस आला. तेथें खंडेरावानें नव्यानें देसगत संपादिली किंवा जुनीच आपल्या ताब्यांत आणली. तेव्हां हा मुलगा त्याचा कारभारी अथवा मुतालीक बनला. हा बाबजीच नेर्लीकरांचा मूळ पुरुष. हे त्यांचे संबंध इंग्रजी आमदनीपर्यंत चालू होते असें वाटतें; पण पुढें दुरावले.

(४) हे हुकेरी देसाई (अ वंशावळ) व नेर्लीकर इनामदार (आ वंशावळ) यांच्या नेर्लीकरांकडील अनेक वंशावळींच्या कागदांवरून तयार होणाऱ्या वंशावळी व त्यांचे त्या कागदांत दिलेले काल येथें दिलेले आहेत. अ वंशावळींत कर्तृत्वाचा

आरंभकाल असून आ वंशावळींतील काळ कालदर्शित पुरुष त्या काळीं जीवमान होते असें दर्शवितात. जाड खिळे मृत्युकालदर्शक आहेत.

(अ) १ खंडेराव–श. १३४२ (इ. १४२०) > २ इम्मडि–श. १३६२ (इ. १४४०) > ३ महादगौडा–श. १३८७ (इ. १४६५) > ४ मलगौडा–श. १४१८ (इ. १४९६) > ५ सिद्दगौडा–श. १४५३ (इ. १५३१) > ६ आलगौडा–श १४९३ (इ. १५७१) > ७ लखमगौडा–श. १५३७ (इ. १६१५) > ८ आलगौडा–श. १५६८ (इ. १६४६) > ९ लखमगौडा–श. १५८७ (इ. १६६५) > १० आलगौडा–श. १६०५ (इ. १६८३) (याचेबरोबर याचा चुलतभाऊ बसप्रभू हाहि वहिवाट करीत होता) > ११ लखमगौडा–श. १६३८ (इ. १७१६) > १२ बसप्रभू–श. १६५५ (इ. १७३३) > १३ लखमगौडा–श. १६९८ (इ. १७७६) > १४ बसप्रभू–श. १७३४ (इ. १८१२) > १५ लखमगौडा–श. १७३९ (इ. १८१७)

(आ) बाबजी–श. १३८७ (इ. १४६५) > २ बापूजी–श. १४५३ (इ. १५३१) > ३ नागोजी–श. १४९३ (इ. १५७१) > ४ यमाजी–श. १४९३ (इ. १५७१) > ५ विरूपाक्ष–श. १६०५ (इ. १६८३) > ६ यमाजी–श. १६०५ (इ. १६८३) > ७ रुद्र–श. १६३८. (इ. १७१६) > ८ शामजी–श. **१६८४** (इ. **१७६२**) > ९ विरूपाक्ष–श. **१७२६** (इ. **१८०४**) > १० अंताजी–श. १७२६ (इ. १८०४) > ११ रघुनाथ > १२ बळवंत > १३ अनंत श. १८८५ (इ. १९६३) > १४ रघुनाथ–श. १८८५ (इ. १९६३).

(५) नेर्लीकरांच्या वंशवृक्षांत (आ) सध्याचे अनंत बळवंत हे १३ वे पुरुष दाखविले आहेत. हा वंशवृक्ष अचूक आहे असें मानिलें आणि प्रत्येक पिढी पंचवीस वर्षांची धरली तरी बाबजी सारा सव्वातीनशें वर्षांपूर्वी (१८८५–३२५ = १५६०) म्हणजे शकाच्या सोळाव्या शतकाच्या तिसऱ्या पावक्यांत हालचाली करीत होता येवढा तर्क होतो. अर्थात् तो शिवकालीन व्यक्ति ठरतो. पण वंशावळींच्या कागदांत तो श. १३४२ पर्यंत म्हणजे सुमारें २२५ वर्षें मागें नेला आहे. म्हणजे प्रत्येक पिढी आणखी १७ वर्षांनीं मोठी अर्थात् सुमारें ४२ वर्षांची मानावी लागेल. देसायांचा शिवकालीन पूर्वज (८) आलगौडा असून खंडेरावापासून त्याची आठवी पिढी येते. यांच्याहि प्रत्येक पिढीस २५ वर्षें धरलीं तर हा (खंडेराव १५६८–२०० = १३६८) श. १३६८ च्या सुमारास हयात होता असें ठरेल. हा काळ वंशावळींत दिलेल्या काळाहून २६ वर्षांनीं मागाहून येत आहे. एका पिढीस २५ वर्षें काळ थोडा अधिकच होतो. पण येथें आणखी सुमारें तीन वर्षांनीं मोठा अर्थात् २८ वर्षांचा धरावा लागतो. नेर्लीकरांच्या घराण्यांत दीर्घजीवन आहे असें मानल्याशिवाय या वंशावळी व त्यांतील काळ यांचा मेळ बसणार नाहीं. ८ व्या पिढीपासून पुढें तसें दीर्घ जीवन असल्याचें दिसतें. पण त्या पूर्वींच्या पिढ्याविषयीं

तसा निर्वाळा देतां येत नाहीं. सारांश वंशावळी व काळ यांत कल्पनेचा अंश असावा. यास आणखी प्रत्यंतर पुरावा असा कीं, या संग्रहांत महत्त्वाचे कागद खूपच मिळाले तरी त्यांत शिवपूर्वकालीन कागदांचा अभाव आहे. मला सोलापूर व नळदुर्ग देसायांकडे शिवपूर्वकालांतील शंभर वर्षांचे कित्येक फार्सी, फार्सी-मराठी व मराठी कागद मिळाले, तसे यांजकडे हीं दोन्ही घराणीं फार जुनीं असतीं तर अवश्य मिळाले असते. पण तसे कागद मिळाले नसल्यानें त्यांच्या शिवपूर्वकालीनत्वाविषयीं शंका येते. कदाचित् हुकेरी देसायांकडे असे कागद असल्यास न कळे. शिवकालीन कागदांतही नेर्लीकर मुतालीक देसायांचे निर्देश न येतां हुकेरी देसायांचे उल्लेख येतात हेंही ध्यानांत घेण्यासारखें आहे.

(६) या कागदांत आलेल्या माहितीचें महत्त्व, त्यांचा खुलासा, इ. त्या त्या कागदावरील टीपेंत निदर्शनास येईल. येथें एवढें सांगितलें असतां पुरें होईलसें वाटतें कीं, फार्सी-मराठीं व मराठी कागदसंभारांत साताराचे छत्रपति व पेशवे यांचे थोडे, पण कोल्हापूरचे छत्रपति, त्यांचे हिंदूराव पिराजी घोरपडे इत्यादि सेनापति, साताऱ्च्या छत्रपतींचे प्रतिनिधि, अमात्य, शृंगेरीमठ, चिंतामणराव आप्पा सांगलीकर इत्यादींचे नानाविध कागद आहेत. याशिवाय नेर्लीकर व हुकेरीकर देसाई यांच्या घराण्यांची उणी-अधिक माहिती देणाऱ्या याद्या, वंशावळी कुळकर्टें, इत्यादि प्रकारचेही कागद आहेत.*]

ले. १ सु. १०८७ मोहरम १६ } **१** हू { श. १६०८ मार्गशीर्ष वद्य ३ इ. १६८६ नोव्हेंबर २३

मो मोघगौंडा देसाई पा हुकेरी दाम मोहबतहू

॥ दं मोहबतशार मुरवतअतुवार [मो. जा.*] आजी मियादांदखा बुजेइ सलाम सुहूर सन सबा समानैन अलफ मोकसूद आं की खाने अजम [मो. जा.*] यामधे व तुम्हामधे इस्प्तदापासोन अहदशर्त की पा मा विलायेतीमधे अपण दरखूर करू नये कर्याती नेसरी व का नूल व का कापसी या तिनीचे सरदेसगती दरगाह होऊन लेहून आणौन देऊ दुतर्फा भाईचारा चालऊ पेस्तर — — बराबर फरक पडों नेदू यैसेसी सिफत अहदशर्त जाहले होते फआमा त्यासारिखी वर्तणूक कितीयेक फरख पडिले हाली आमचे तुमचे मुलाकात जाहलेवख्ती तमाम दिलगिरी जाहीर केली तरी हाली करारदाद केले जे पा मो विलातीस साल मारी येकंदर स्वारी करू नये पेस्तर साली जरी राजेतर्फे पा मा कमावीस आसलिया कर्याती सोलापूर व कर्याती कबूरी दोन्ही कर्यातीचे दस्तमवाफीक चौथाई बेरीज जे होईल ते देणे व पा मारास स्वारी अगर जितल तमा धरू नये या बरहुकूम खाने अजमाचे शर्तनामा करून पाठऊ सदरहू जिकिरेस फरख काडीइतुके पडो देणार नाही जैसे दुतर्फा भाईचारेचे शर्त आहे तैसेच

हर दो तर्फेने चालविने येसे माकूल करून तुम्हात व खाा मशारनुलेत चालत चाले असे करवाऊन देऊ [लं. फा.*] मुरत्तब शुद छ १६ मोहरम [शेवटच्या २ ओळींच्या डावे अंगास वा. फा. शि.*] मियां दादखान इब्न हुसैनखान बन्दह दर्गाह

ले. २ सु. १०८७ मोहरम १७	२ श्री	श. १६०८ मार्गशीर्ष वद्य ४ इ. १६८६ नोव्हेंबर २४

[आरंभीं तिसऱ्या ओळीच्या डावीकडे लं. व. शि.*] विधिरर्थिमनीषीणामवधी-र्नयवर्त्मनां । शेवधिः कार्यसिद्धीनां मुद्रा कलशहस्तगा ॥

र्द अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री मोघेगौडा देसाई पाा हुकेरी यासि कविकलश छंदोगामात्य आसीर्वाद सुहूर सन सबा समानैन व आलफ खान अजम इभराहीम-खान व मुस्तफारखान यानी आपले हेजीब राजश्री वेदाजी केशव येथे पाठऊन राजश्री [मो. जा.*] छत्रपति स्वामीच्या व आपल्या स्नेहाची घटाई करून घेतली त्यानी तुमची कितेक रदबदल केली तरी त्या प्रांतास राजश्री रायाजी सामराज पाठविले आहेत जो आपला मुदा असेली तो त्यांला सांगणे आणि आपली रुजुवात येकनिष्ठता दाखऊन सेवेचा मजरा करून घेणे मािरइले तुमची सेवा व तुमचा मुदा लेहून पाठवितील तो मनास आणून त्या सारखी सरफराजी होईल मोगलास व बाजे हरामखोरास येकंदर सुलूख लावाया गरज नाही माहाराज [मो. जा.*] छत्रपति स्वामीच्या पायासी येकनिष्ठपणे राहोन अपली दौलतखाही जाहीर करणे ये बाबे राा वेदाजी केशव सांगतील त्यावरून कलों येईल [नि.*] जाणिजे छ १७ मोहरम पाा हुजूर [वा. मो.*] राजते लेखनावधि

[पाठीवर*] सुरू सूद

ले. ३ सफर २	३ श्रीशंकर	श. १६०८ पौष शुद्ध ३ इ. १६८६ डिसेंबर ८

राजेश्री मोघेप्रभू देसाई पाा हुकेरी गोसावी यासी

•॥ र्द अखडितलक्ष्मी अळकत राजमान्य [मो. जा.*] स्नेह्यभिळासी तुको धोंडदेव सुभेदार माहालानिहाये अज मोकाम किले इसलामगड कृतानेक असीर्वाद उपरी विशेश दया करून पत्र पाठविले ते अमृतसमई पाऊन परम विश्राती पावलो कितेक स्नह्याची उतरे लिहिली तर उभये पक्षी दुसरा विचार काये अहे अमचे तुमचे बधूपण अजी पावतो चालत अले कोण्हाच्या सागण्यावरून अम्हास कलक लाऊन लिहिले तरी मन जाणे पापा माये जाणे लेकराच्या बापा पापापुण्याचा निर्व्हा करणार श्री [मो. जा.*]

स्वामी अहे अमचे अपले बोलणे काये जाहाले होते ते चिताची साक्ष चितास अहे कबूर बिलकूल अपले अध्यान अहे तुम्ही हजरत [मो. जा.*] खानसाहेबापासी जाऊन काकतीच्या देसाइयास वा हजरत साहेबास बेलगावाहोऊन बोलाऊ पाठवणे याच्या गुजारतीने तहघटाई करून मग कबूर देऊ अैसा तह अम्हासी तुम्ही केला तहानुसार अम्ही हजरत [मो. जा. *] साहेबापासी येऊन रदबदली केली भग प्रयेत्न करून साहेबास राजी केले तव अपण येक पत्र पाठविले की अम्हास काये गरज अहे तुम्हास अगत्ये असिलिया रा। देसाई काकती यास वा हजरत [मो. जा.*] साहेबास बोलाऊ पाठवणे तो कागद परभारे साहेबास पावला } पावला } तरी अतर पडो दिल्हे नव्हते तुमचे लोकीच येऊन दाटून कथला केला अम्हास लिहिले की कमतकटा लुटून नासाडी केली मणून लिहिले तरी कलक चद्रास लागला आहे अम्ही नरदेहे घेतला अहे पामर लोकास कलक न लगे मणिजे जे देहेधारी मणिवतात त्यास येक कलक अहेच तुम्हीही सूज्ञः आहा तुम्ही वतनदार भाग्यवत अपले वैभवावरी द्रिस्टी ठेऊन अम्हासी राजकारण केले येक काम केले येक हे तुमचे पचआत्मा साक्ष देतसेली (?) अम्ही सूक्षम आहो परतू } तू } वशज येक वचनी आहा कालत्री वचनास सहसा अतर पडो देणार नाही तुमचे अमचे भाऊपण मैत्री खरी परतु तुम्ही अैसा खिसा केला की येकोदर मछे मछ गिळिला येक जाळीचे तु वंशवेल वेडी जाळिला येके पिड हस्त } हस्त } खडला यैसे येथार्थ केले तुमचे सखाभाऊ तुम्हास काये कामा येतील आम्ही मैत्रभाऊ होऊन काये कामा नयो हे बरे शोधून पाहाणे बाप भाऊ सोईरे पुत्र कलत्र अवघे अहेती प्रिथिवीचे ठाई मैत्र थोडे अहेत मैत्र मणवणे कठीण अहे लक्ष्मीकरिता आंधाले होता तुम्हास द्रिस्टी कोठून असेली बरे ज्याचे कर्म त्यास कामास येईल तुम्हा अम्हामधे श्री [मो. जा.*] स्वामी अहे ज्याकडून अतर पडिले असेली तोच पाहून घेईल अम्हापासून माघूनही पडिले नाही पुढेही पडो देणार नाही फिरगाचा मजकूर लिहिला की देतील ने दितील हा सदहे असेली तरी आहो मोघेप्रभू द्रव्याची फिरगेची घोडियाची लालुची तुम्हासारिखे भाग्यवतास देहे स्थिर नाही जिवाची लालुची नसेली तेथे इत्यादिकांची काये लालुची असेली ते पाहाणे थोर लालुची श्री [मो. जा. *] स्वामीच्या चरणस्मरणाची अहे यापरते अम्हास काही नाही हा निर्व्हा पूर्ण कलला असावा खेडियाच्या कौलाविशई लिहिले तरी हजरत [मो. जा.*] साहेबास लिहून पाठविले अहे अजीउदिया कौलही पाठऊन देतो मजती कर्यातीच्या खेडियास जे तुम्ही वचन द्याल ते साहेबाचे वा अमचे अहे अतर पडणार नाही ज्याचे अन भक्षावे त्याच्या स्वामिकार्यावरी तत्पर असावे स्वामिकाजी निस्टा असेलिया चतुर्विधा मोक्ष अहे रणघालेपण करितात त्यास रविरवि नरक अहे तुम्हीही बहुश्रोती आहा लोभ असो देणे हे असीर्वाद रा। छ २ माहे सफर [लं. व. बा. अ. मो.*]

[पाठीवर अस्पष्ट वा. बा. शि.*]

लें. ४ सफर ४ | ४ श्रीशकर | श. १६०८ पौष शुद्ध ६ इ. १६८६ डिसेंबर १०

राजेश्री मोघे प्रभू देसाई पा हुकेरी गोसावी यासी

॥ र्द अखडितलक्ष्मी अळकृत राजमान्ये [मो. जा.*] स्नेहअकित तुको धोंडदेव सुभेदार माहालानिहाये अंसीर्वाद उपरी पत्र पाठविले उतम समई पाऊन परम समाधान जाहालो मजती कर्यातीच्या कौलाविशई लिहिले तरी अपल्या लिहिल्यावरून हुजूर हजरत [मो. जा.*] खानसाहेबास लिहून कौल करावाऊन बजिनस कौल पाठविला अहे गावगाना कौलही अम्ही देऊ लोभ असो दीजे घडीघडी { पत्र { पत्रद्वारे परामृश घेत जाणे हे अंसीर्वाद रा छ ४ सफर [लं. व. मो.*]

[पाठीवर वा. बा. अ. शि.*]

लें. ५ पौ सु. [?] १०८७ सफर ५ | ५ | श. १६०८ पौष शुद्ध ७ इ. १६८६ डिसेंबर ११

मो मोघेगौडा देसाई पा हुकेरी दाम मोहु

र्द मोहुबतशारी मुरव अतुवारीं [मो. जा.*] अजी रहीमदादखान वुजेइ सलाम मोहुवल मोकसूद ऊकी तुमचे व हजरत [मो. जा.*] सैद साहेब व खान अजम [मो. जा.*] दिवान साहेबाचे मुलाकात जाहलेवख्ती आपुले दिलिगिरी जाहीर केले जे खाने अजमचे व आमचे करारदाद जाहले होते की काा नेसरी व काा नूल काा कापसी तिनी कर्यातीचे सरदेसगत दरगाहहून सनद अणून देवावे वा आमचे त्याचे भाइचार इप्तिदापासून जैसे चालत होता तैस चालवे म्हणून शर्त जाहले आसे त्यासी कितेक मजकुरासी पारख पडल म्हणून अर्ज केलवरी त्याती तुम्हसी करारदाद केले जे परगणे विलायेतीसी अजार देऊ नये पेस्तर साली जरी राजेतर्फेने परगणे माचे कमावीस जाहलिया काा सोलापूर व काा कबूर दस्तमावाफीक चौथाई बेरीज जे होईल ते देणे बाजे पाा मजकुरासी स्वारी अगर बाजे जितल तमा धरू नये या बरहुकूम खान अजमाचे शर्तनामा करवाऊन देतो सदरहू जकीरासी दरख काड पडू देऊ नये जैस अवलपासून भाइपणा अहदशर्त असे तैसच दुतर्फेन वर्तणूक होवी यैस माकूल करून तुम्हात व खान अजमात चालत चाले म्हणून करार केल असे तरी जे काये करारदाद दिवान साहेब सैद साहेब हुजर दिल्ह अस ते खासेचे अस सदरहू करारदादसी दुतर्फेन परख पडून देऊ नये जाणिजे बाजे मजकूर मीराभाई जबानी जाहीर करता मालूम

होईल या बाबे दराज लिहिणे काये असे जाणिजे हे किा [फा. मो.*] पौा छ ५ माहे सफर दर साल सन सबा समानीन अलफ

[पाठीवर पहिल्या दोन ओळींच्या डाव्या अंगास वा. फा. शि.*]

लें. ६ पौ सु. [?]१०८७ सफर ५ } ६ { श. १६०८ पौष शुद्ध ७ इ. १६८६ डिसेंबर ११

माा मोघेगौडा देसाई पाा हुकेरी दवाम मोहुबतहु

दे मोहुबतशारी मुरवत अतुवारी [मो. जा.*] अजी मियादादखान बुजेई दुवा सलाम मोहुबतअजाम मोहुवल मोकसूद उकी तुम्ही मिराभांई बाा किा पाठविले तेवरून येकबयेक मजकूर माळूम जाहले त्यावरी अमचे व तुमचे काररदाद मावाफीक खान अजमाचे कागद करवाऊन मिराभाई बारबरी पाठविले असे तेवरून माळूम होईल बाजे मजकूर जबानी तु जाहीर करिता आया होईल जाणिजे जे काये काररदाद जाहले असे खोदये तालाचे हुकुमाने उमर बाकीतलग फरख पडणार नाही हे येकदर घट समजणे जाणिजे हे किा [ष. फा. मो.*] मुरत्तब शुद

ताजा कलम घोडे व हशमाचे मजकूर मीराभाईसी सागितले असे त खातिरेस अणून ते मजकुराचे सरबराई करणे जाणिजे हे किा [फा.*] मुरत्तब शुद

[शेवटच्या तीन ओळींच्या डाव्या बाजूस वा. फा. शि.*] मियां दादखान इब्न हुसनखान बन्दह दर्गाह [नि*] पौा छ ५ माहे सफर दरसाल सन सबा समानीन अलफ

लें. ७ सफर १४ } ७ श्री { श. इ.

राजश्री अलगौंडा देसाई पाा हुकेरी गोसावी यांसी

दे अखडितलक्ष्मी अलंकृत राजमान्ये [मो. जा.*] श्रो हंबीरराऊ मोहिते सेनापति जोहार विनति उपरी येथील क्षेम जाणऊन स्वकीये कुशल लेखन करावयास अज्ञा केली पाहिजे विशेश गनीम रोहिला खान व रणमस्तखान येसे मिरजेहून पनालेपावेतो अला होतो अमचे फौजेसी व गनिमासी बरामुकाबला होऊन भांडण जालें ते जागा गनिमाची बहुत खस्ता जाली गनीम खटा होऊन कोल्हापुरावरून बेलगांवचे रोखे जात आहे अम्ही सेनेसमुदायेनसी गनिमाचे पाठीवर अहों गनिमाचा

हिसाब धरीत नाही येक विजापूर जाले तरी काय जालें विजापूर हा जागा पहिलेपासून अमचाच अहे त्याची मदत हर बाबेने अम्हास करणें लागतें असदखान किलेदार मिरजेचा याने उतावली करून गनिमास मिरज घिधली त्याकरितां गनिमास राहावयास जागा होऊन पैस मडिळा अहे हली बेलगावकराने कोट देऊ केला म्हणऊन तिकडे गनीम जातो त्यास अम्ही खानेअजम मुरादखान यांस कागद पाठविलें अहेत की गनिमास असिरा न देणे तुम्हो अम्ही येके जागा होऊन गनिमास सजा पावितों यैसे लिहून पाठविले अहे पहिले या मुलुकांत राजश्री गोपालराऊ होते ते लस्करास सामील जाले आहेत यानी तुमचे विशई कितेक रदबदल केली की अपणासी येक खुसोने चालत अहेत तरी हे गोस्टी बहुतच उतम अहे गनीम वाटेने जात अहे तुम्हास कागदपत्र पाठवील तरी येकंदर गनिमास न भेटणे असिरा न देणे अम्ही लस्करानसी या प्रांते असतां तुम्हस कोण्हे गोस्टीचें कांही भये नाही राजश्री रूपाजी भोसले व राजश्री संताजी जगथाप यासिही बोलाविले अहे येके जागा होऊन गनीम मारून गर्देस मेलवीतच अहो तुम्ही अपले वर्तमान साकळये लिहून पाठविणे बहूत काये लिहिणे रा। छ १४ सफर

ले. ८ सु. १०८७ सफर १५	८	श. १६०८ पौष वद्य २ इ. १६८६ डिसेंबर २१

[आरंभीं उजव्या बाजूस औरंगजेबाच्या अधिकाऱ्याचा वा. फा. शि.*]

मोकदमल इसाल लखमगौडा देसाई पा। हुकेरी बिदानद के हर्चं सुा। सबा समानीन व आलफ दरी विला खाने अजम [मो. जा.*] याचा खा (हा) जीब दतो पंडीत येउनू भेटोन नवाब मुस्तताब [मो जा.*] यांची मुलाजिमत करविली त्याने तुमचे बाबे मालूम केलेवरून कौल करउनू देउनू पाठविला आहे यैसियास देखते सहीफा दर हाल रातोरात येउनू रुजू होणे सरफराजी होईल येक घडी मातल व दिरंग केलिया हैरान होल छ १५ सफर

ले. ९ औ. जु. ३० रवल १९	९	श. १६०८ माघ वद्य ६ इ. १६८७ जानेवारी २४

नकल दस्तक बमोहर नवाब रूहलाखान साहेब

दस्तक बो। देसमूख व जमीदारान परगणे हुकेरी आंकी हाली खिजमत किलेदारी पातशाहपूर व फौजदारी ते प्रांतीची तहवर व जलादतपनाह बसालतदस्तगाह नारोजी राघोजी याचे हवाला केली असे तरी मुशारनइले जेव्हा तुम्हास पातशाही कामाबदल बोलावितील तेव्हा बिलाउजूर येऊनहाजीर होणे व त्याची खिजमती बरी करून रजावंद

राखने व आपले जमीदारीचे माहालीहून रसद गला वगैर वस्त बहूत वानियासी पोहचावीत जाणे व जे आवडीबडी खिजमती कराल त्यामधे आपला मुजरा जाणने ये बावे बहूत ताकीद जाणोन लिहिलेप्रमाने अंतर पडो नेदने तेरीख छ १९ रा।वल सन ३०

ले. १० } १० नवाब { श. १६०८ माघ वद्य ६ इ. १६८७ जानेवारी २४ नंतर

मोघे गौवड देसाई पा हुकेरी दाम मोहुबतहू

॥ ई मोहुब्रतशरी मुरवतअतुवारी [मो. जा.*] अजी रहीमदादखान बूजेइ सालाम मोकसूद ऊकी हजरत साहेब किले इ[स]लामगाड अमा हासिल देऊन सरबराह केली अहे हुजुरून खा। मिरजाखानासी बकिले मजकुरासी पाठविल अहे तुम्ही किले मजकुराचा – – दी अपुणासी कैस कलत अहे तैसे कीजे जकोरा आनाज वादारुगोली जकीरा घालून हुजूर खान मशारनुलेचा कागद येती यैस कीजे दीगर मा। अनाम सखराजी आनंदराऊ यासी पा। मजकूरचे करियातीचा वि।। [मो. जा.*] का। आलते का। दुदगाऊ का। जुगल का। सदलगे का। खडकलाट का।। कवूर यैसा साहा माहाल माहालदारी देऊन पाठविल अहे याचा इतफिकीन करियाती मा।चा कारबार करून साहेबकाम करीत जाणे पेसजीच कुल कैफत दखल करून पेस्तर याचा रजा बा।। अमल करून साहेब काम कीजे हुजूर खर्चाचा अमल चाले यैसे पोख्त रसद देऊन पाठविजे [लं. व. फा. मो.*] मुरत्तब शुद

ले. ११ मु. १०८७ } ११ { श. १६०८–०९ इ. १६८६–८७

तबलक कागद रहीमदाजखान पवित्रगड कावीज करून देणे म्हणून सु।। सन सबा समानीन अलफ परवाना रोहिलाखान

ले. १२ } १२ { श. १६०८ माघ वद्य ६ इ. १६८७ जानेवारी २४

देसमुखानि देसपाडियान परगणे हुकेरी वगैर सुबे विजापूर बिदानंद माफीक तपसील रुजू शाहा बमोहर स्यादत व निकाबतपन्हा इमारत व अयालतमजलत बकसी

अलमुल्क [मो.जा.*] परगणे मजकूर वगैर शाहामतपनाह रहीमदाद याचे उहदां जाले असेती व मुशारनइलेने आपले मोहरेसी कतबा लिहून दिधला आहे जे तीं महिन्या हुजूरून दरगाही सनद आनून देऊन जोवरी दरगाही सनद येऊन पोहचे तोवरी महसूल अमानत ठेऊन यैसियासि सनद दरगाही आलियावरी जे भातेने कैद लिहिली असेल तेनेप्रमाणे तुम्ही अमल करणे.

कतबियाची शेरा.

वा बंदे दरगाह रहीमदाद आकी परगणे हुकेरी वगैर आपले उहदा केले आहेत याबदल आपण करारदाद केला आहे जे ती महिन्या सनद दरगाही आनून देऊन जोवरी सनद येऊन पोहचे तावरी परगणे मजकुरीचा महसूल अमानत ठेऊन

ले. १३ पौ रवल २२	१३ श्रीशकर	श. १६०८ माघ वद्य ९ इ. १६८७ जानेवारी २७

रणमस्त बहादुरखान

नवाब रोहिलाखान साहेब

राजेश्री मोघे प्रभू देसाई पा हुकेरी गोसावी यास

दे अखडित लक्ष्मी आलकत राजमान्य [मो. जा.*] स्नहेअंकित तुको घोडदेघ सुभेदार माहालानिहाये कृतानेक अश्रीवाद उपरी हजरत [मो. जा.*] साहेबापासून पा मा फरमान हजरत [मो. जा.*] खानसाहेबे पाठविले अहे ते घेऊन अजी तुम्हापासी येतो अपण फरसान चौथरेस येऊन दिवाण रवेशप्रमाणे आदरे पत्र पाहून विले मामला करून देविला पाहिजे किले इसलामगड कबिला ठेवणेबदल दिल्हा किलेचे काबिजातीस खा मिर्जाखान खेशकी अले अहेत भेटीनतरे साकल्ये वर्तमान परस्परे कलों येईल स्र्वा गोस्टीने साहेता करणे उचित अहे खानसाहेबाचे सुभेमधे राऊ नागोजी मान्ये पजहजारी वा रा बहिरजी पाढरे पजहजारी खाने अजम मियादादखान आणिकी सातसेहे पठाण खानसाहेबे कटकालवेत छयावणी करावी हजरत नवाब [मो. जा.*] येही नूरखानाचे सिंरोळामधे छयावणी करावी याप्रमाणे घटाई जाहली अहे आठच्यारी दिवसात खानसाहेब येतील पूर्वीपासून येश घेतच अला अहा यासमई येश घेऊन सख वाढऊन परस्परे आदर चालवीत गेले पाहिजे हेगे अम्ही अपल्या भेटीस आलो हे आसीर्वाद [वा. मो.*] हे विनति

पौ छ २२ रबिलोवल

[पाठीवर दुसऱ्या व तिसऱ्या ओळीचे डावे अंगास अ. शि.*]

ल. १४

१४
श्रीशंकर

श. १६०८ माघ
इ. १६८७ जाने-फेब्रुवारी

सकलगुणपरिपूर्ण अखंडित लक्ष्मी प्रसंन राजमान्य राजेश्री आलगौडा देसाई स्वामीचे सेवेसी स्नेहेंकित नरसो सुरो शर्णशर्णार्थी विनती उपरी स्वामीने माहाराज साहेबास पत्र पाठविले परम संतोश पावले रहीमदादखानाचे वर्तमान लिहिले असे त्यावरून विदी [त*] होईल घोडेस्वार व हशम तुर्त संगीनात पाठविले पाहिजे गही न कीजे वरकड वर्तमान रा वडीलपंतास लिहिले आहे त्यावरून अवगत होईल सकलविखी काबू आहे स्वामी सर्वम असा मुजरेचे वेल हाच आसे विशेश लिहिणे नलगे जाणिजे हे विनती

ले. १५

१५
श्रीशंकर

श. १६०८ माघ
इ. १६८७जाने.-फेब्रुवारी

माहाराज राजाधिराजमान्य राजेश्री धोंडोपत स्वामीचे सेवेसी

श्रीचरणरजे नरसो सुरो साष्टाग नमस्कार विनति उपरी स्वामीने पत्र पाठविले त्यावरून विस्तार कलो आले जे काही पाठवाव्याचे यादी लिहिले होते त्यासारिखे सत्वर येतील मणऊन आज्ञा उतम असे सांप्रत रहीमदादखान पलून आला असे यैसेयास घोडे व प्यादे संगीनात अजी तुर्त पाठविले पाहिजे विलंब न कीजे अणि पवित्रगडाचे परामृश असू देणे गोकाकेतुन गडास येणार आहे वाटतिठेस येक होईल तो पाहणे कासिमखान संगीनात घेऊन बेलगाऊ विलाप्रेती सुलीगाव मारून गुरे व नागवण घेऊन येऊन कुंदरगीस आहेती पाठीलाग बहीरजी येऊन आमचे विलायेती सुलदहाल मारून नेले आता त्यामधे अम्हामधे कटाक्ष होत असे तोही येखाद्याकडे येईल येच अर्थी संगीनात जरूर पाठविने यामधे मुजरा असे वडिलाप्रति विशेश लिहिणे न लगे स्वामी सर्वम्न असा चुनाविखी पहिले लिहिले होते आलेले माणुसास नेणे म्हणाऊन बोलिले उसीर होईल मागुती उदिया येऊ घेऊन जाऊ म्हणऊन बोलिले आता पाठवावे तरी जरूर उतर पावावे म्हणऊन पाठविले नाही मागून पाठवितो सेवेसी विदित होये जाणिजे हे विनति माहाराजसाहेबही स्वामीचे पत्रावरून परम संतोश पावले लिहिलेसारिखे तुर्त निर्च्छव पाठवणे हे विनति

राजेश्री अणापास साष्टांग नमस्कार लिखिता अर्थ परिसिले पाहिजे हे विनति

ले. १६ फ. १०९६ }
रखर ७ }

१६
श्री

{ श. १६०८ फाल्गुन शुद्ध ९
{ इ. १६८७ फेब्रुवारी १०

रोहिलाखान

माहाराज राजेश्री स्वामि यांचे सेवेसी

सेवक आज्ञाधारक धोंडो बलाल आजम आलगौडा देसाई पा। हुकेरी सिरसाष्टांग नमस्कार, विनति उपरी हजरत बकसी अलमुलुकी [मो. जा.*] याचा परवाना आम्हास दिल्हा तो अपणास पावला हे विनति छ ७ रविलाखर सन १०९६

ले. १७ फ. १०९६ }
रखर ११ }

१७
[नि*] श्रीमार्तंडप्रसन

{ श. १६०८ फाल्गुन शुद्ध १२
{ इ. १६८७ फेब्रुवारी १४

ई अखंडित लक्ष्मी प्रसन राजश्री धोंडोपत गुमास्ते देसाई पा। हुकेरी सन १०९६ तुम्ही कागद पाठविला पावला तेथे पावलियाचे वर्तमान लिहिले कलो आले रहीमदाद-खानाचे वर्तमान तरी गोकाकेस पलोन आला आहे हे तहकीक असे यैसियास तुम्ही देसाई यास सागोन वाटा जागाजागाच्या बंद करऊन खबरदार राहणे व इसलामगडासही खबरदार असणे वरकड वर्तमान राजश्री नरसिगराऊ लिहितील त्यावरून [कलो येईल मोर्तब] रा। छ ११ माहे रबिलाखर सन १०९६.

ले. १८ फ. १०९६ }
रखर ११ }

१८
[नि*] श्रीमार्तंडप्र (संन) ॥

{ श. १६०८ फाल्गुन शुद्ध १२
{ इ. १६८७ फेब्रुवारी १४

श्रीसकळगुणसपन श्रीशिवधर्मपरायेण राजश्री अलगौडा देसाई पा। हुकेरी सन १०९६ तुम्हीं कागद पाठविला पावला रहीमदादखान गोकाकेस आला आहे त्याची काये हकीकत आहे ते लेहोन पाठवणे म्हणौन लिहिले तरी रहीमदादखान लस्कराहून पलोन आला आहे यैसी खबर असे यैसियास तुम्ही इसलामगडाची वाट व बाजे वाटा असतील त्या कुल बंद करून खबरदार राहणे व इसलामगडासही खबरदार राहणे वरकड हकीकत राजश्री नरसिगराऊ लिहितील त्यावरून कलो येईल व इसलामगड त्याचे हाती आहे तो आपले हातास ये व सभाजीचे लोकाचे दखल नव्हे यैसा उपाये देखणें [नि*] यात तुमचा कुली मजुरा असे मोर्तब तेरीख ११ रबिलाखर.

ले. १९ फ. १०९६ } रखर १३

१९
[नि*] श्रीमार्तंडप्रा

{ श. १६०८ फाल्गुन शुद्ध १४
{ इ. १६८७ फेव्रुवारी १६

सकळगुणसपन राजश्री अलगौडा देसाई पा। हुकेरी सन १०९६ तुम्हापासुनू छ १३ रोजी अणाजिपंत आले वर्तमान सागितले कलो आले आपण तो रहीमदादखानास सिकस्त देऊन परागदा केला आहे याउपरी राहिले कर्म तुमचे आहे यात कशाचा विचार किती येक आणजिपतास सागितला आहे तेणेप्रमाणे लौकरी तलाश करून रहीमदादखान कैद होये अगर मारिला जाए येसे करणे यामध्यें तुमचा कुल मजुरा असे व त्याचा मुलाहिजा केलियां तो गाई व ब्राम्हणास व देशास उपद्रव देईल ते पाप तुमचे सिरी असे येसे जाणोन तो भारी जाला नाही तोपर्यंत लौकरी बेहबूदी देखणे [नि*] मोर्तब

रा। छ १३ रबिलाखर सन १०९६ [नि*] पैा छ मजकूर माहे मजकूर

ले. २० फ. १०९६ } रखर १५

२०
[नि*] श्रीमार्तंडप्रा

{ श. १६०८ फाल्गुन वद्य १
{ इ. १६८७ फेव्रुवारी १८

श्रीसकळगुणसपन राजश्री अलगौडा देसाई पा। हुकेरी सन १०९६ तुम्हापासुनू राजश्री आणाजि धोडो येथे आले होते त्यासि रहीमदादाचे स्विष्टकृत करावयाचे विशई कितीयेक सागितले होते तेही }ही{ कबूल करून गेले की हे काम देसाई यास करणे जरूर आहे या दोचौ दिवसांत याचा सरंजाम करितो यासि दोनी चारी दिवसाही लोटले परतु त्या कामाची काही सुत दिसत नाही गनीम दिवसेदिवस भारी जालियावरी पुढे तुम्हासच अजोरा होणार याकारणे तुम्हापासि राजश्री अंतो सुरो पाठविले आहेती हे जबानि सागतील ते मनास आणोन लौकरी, त्याचा सरंजाम देखणे येविशई सर्वथाह ढील न करणे व अतो सुरो याचा व तुमचा सहवास अहिर्णीस आहे साप्रत येथे सेवेसी ठेविले आहेती ते तुमचेच म्हणौन ठेविले असेती येविशई समाधान असो दीजे [नि*] मोर्तब रा। छ १५ माहे रबिलाखर [नि*] पैा छ १५ रबिलाखर

ले. २१ पै (रा) फ. १०९६ } रखर १८

२१
[नि*] श्रीमार्तंडप्र

{ श. १६०८ फाल्गुन वद्य ४
{ इ. १६८७ फेव्रुवारी २१

सकळगुणसपन राजश्री अलगोडा देसाई पा। हुकेरी सन १०९६ राजश्री अणाजि पंडीत याबराबरी हमीदखान देसाई पाठविला मुलाजमती जाली

तुमचे लिहिलियावरून हमीदखानास निरोप देऊन तुम्हापासि पाठविले असे यासि किती येक जबानि डोगरतरफेचे कार्यभागाचे विशई सागितले आहे तरी जेणेकरून ते गोस्टीचा निर्व्हाह होये ते केले पाहिजे वरकड कितीयेक वर्तमान आणाजिपत सागतील त्यावरून कलो येईल विशेष काये लिहिणे [नि*] मोर्तब

[पाठीवर*] रा छ १८ रविलाखर सन १०९६

ले. २२ [फ*] १०९६ रखर १९ } २२ [नि*] श्रीमार्तंडप्रा. { श. १६०८ फाल्गुन वद्य ५ इ. १६८७ फेब्रुवारी २२

श्रीसकळगुणसपन राजश्री अलगौडा देसाई पा हुकेरी सन १०९६ (?) पातशाहपुरी टाकसाल घातली आहे हर निसबती हुकेरी होन पडताती ते होनास हुकेरीस सराफ दिकती करितील तरी तुम्ही त्यासि ताकीद करून होन चालेती येसे करणे [नि.*] मोर्तब

[पाठीवर*] तेरीख १९ रबिलाखर

ले. २३ [औ*] जु. ३० रखर २० } २३ { श. १६०८ फाल्गुन वद्य ६ इ. १६८७ फेब्रुवारी २३

देसाई परगणे हुकेरी मालूम दानद हाली रहीमदाद आपले कमबख्तीने गुमराह होऊन पातशाही बंदगीची तोफीक न पावला पळून गेला याबदल तुम्हास लिहिले असे जे परगणे मजकूर पहिले माइलेस गीर दिधले होते ते जागीर करून खालिसा केले असे महसूल वाजिवी खालिसामधे वसूल करीत जाणे माइलेस दखल न देने ये बाबे ताकीद जाणने छ २० राखर सन ३०

ले. २४ फ. १०९६ रखर २२ } २४ श्रीमार्तंडप्रसन { श. १६०८ फाल्गुन वद्य ८ इ. १६८७ फेब्रुवारी २५

बकसी यैन मुल्क नवाब रोहिलाखान

श्रीसकळगुणसपन राजश्री अलगौडा देसाई पा हुकेरी सन १०९६ यामध्ये तुम्हाकडील काही खबर येत नाही आता जे हकीकत असेल ते लेहोन पाठवणे व हुजरून [मो. जा.*]

याचा परवाना व तुमचे वकिलाचे लिहिले कागद आले ते तुम्हापासि पाठविले असेती त्याकागदावरून मतलब जाहीर होईल तेणेप्रमाणे सरंजाम करणे [नि *] मोर्तब

राा छ २२ माहे रबिलाखर

ले. २५ सु. १०८७, फ. १०९६ जवल २६	२५ तालीक	श. १६०९ चैत्र वद्य १३ इ. १६८७ मार्च ३१

बादशाहा

देशमुखानी व देशपांडियानी पाा पातशापूर सुाा सन सबा समानीन अलफ सन १०९६ बइस्म रायेगौडा वलद सिदगौडा देसाई काा काकती हिसार मुस्तफबाद येही [मो. जा.*] आमल बैसलियावरी कोट शाहाबाद{र} पाा मजकूर येथे गनीम होता त्यासी सिकस्त देऊन काहाडिले [मो. जा.*] अमल बैसविला पुढे [मो. जा.*] कामासी जाहीर व मखफी सरगरम देखोन लस्कर सभाजी मक्हूर याची तंबी कराव्याचा तलाश व तरदूद अहवालहून जाजती देखोन पाा मजकुरीचे सरदेसगती दिधली असे तरी सरदेसग}ग{तीचे हकलवाजिमा असल तो यासी चालऊन सरदेसगतीच खजमती घेणे व यासी इनाम मौजे नंदी काा अकोल पाा माा दरोबस्त दिधले असे देसाई मजकुराचे दुमाला करणे दर हर साला ताजे सनदेचा उजूर न करणे नकल घेऊन असल देसाई मासी फिराऊन देणे मोा छ २६ जमादिलावल

ले. २६ रमजान १५	२६ श्री	श. इ.

राजश्री अलगौडा देसाई पाा हुकेरी गोसावी यास

ई अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य [मो. जा.*] स्नेहांकित राम दलवी भौसले रामराम विनति येथील क्षेम जाणौन गोसावियानी आपणाकडील स्वकीये कुषल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष गोसावियानी बहुता दिवसी पत्र पाठविले पाऊन लिहिला अभिप्राव कलो आला कितेक आप्तपणाचे उपचरीक गोस्टी लिहिलेत तरी तुमचा आमचा आजचाच श्नेह न्हवे पुरातन श्नेह चालत आला तेथ उपचरीक लिहिणे काये आहे व काा नेसरीचे सरदेसगत वतन आपले आहे त्यासाठी आपले मुतालीक ठेऊन काही लावणी-सचणी करवितो यैसियास आमचे तर्फेचे लोक ते प्राते स्वारीस आहेत त्याकडून कर्यात मजकूरचे खेडेयास आजार पुढा पावेल यासाठी काा मजकूरचे रयेतीस कौल

पाहिजे व आम्हाकडील लोकास येक कागद पाठविला पाहिजे म्हणऊन लिहिले तरी वरघाटीची कुली कार्यातीची खडणिया जाहाल्या आहेत त्याप्रमाणे कर्यात नेसरीची खडणी तिजाईप्रमाणे विल्हे करून आम्हास देवणे कर्यात मजकूरचे खेडेयास आमचे तरफेने आजार होणार नाही कर्यात मजकूरचे खडणीचे उसूलाबदल आम्हाकडील कारकून येक जण पाठवावा की काये ते लिहिणे त्याप्रमाणे पाठऊन देऊ तरी गोसावियानी कर्यात मजकूरचे तिजाई खडणीचे विल्हे करविली पाहिजे त्याप्रमाणे आम्हाकडील येक जण कारकून तुमापासी पाठऊन देऊ आमची तिजाईची खडणीची विल्हे करून देणे आणि सुखे किर्दी लावगीसवगी करून रयेती गावी राहो देणे आमचे तरफेने त्यास काही आजार पावणार नाही घडीघडी क्षेम समाचार लिहून परामर्श केला पाहिजे कृपा निरंतर आसो दिली पाहिजे छ १५ रमजान व लिहिले की ते वतन आपलेच आहे आपलेमधे व आम्हामधे काही इतरता नाही दोनी वतने आपलीच आहेत म्हणऊन लिहिले तरी हे गोष्टी येथार्थच आहे तुम्ही जो बोलचाल रयेतीस दिला तो आम्हीच दिला येसे समजोन किर्दी माहामुरी नेसरी कर्यातीस करऊन आमचा भाग तिजाईचा आहे तो देविला पाहिजे येविसी बहूत काये लिहिणे ते प्राते लोक आमचे तरफेचे आहेत त्यासही आम्ही ताकीद केली असे ते नेसरी कर्याते खेडेयाचे वाटेस नवत जात कलले पाहिजे मुडासे पाठविले ते पावले कलले पाहिजे इतके उपचारीक काये निमित्ये केला होता बरे तुम्हास येक वजा वाटेल म्हणऊन फिराऊन पाठविला नाही कलले पाहिजे [नि*] हे विनति [ष*] मोर तब ता। छ २४ रमजान

[पाठीवर तिसऱ्या ओळीच्या डाव्या अंगास वा. शि.*] श्रीरा । म दळवी । रवळ द । ळवी

ल. २७ [हि*.] १०९८; औ. जु. ३१ रमजान २७ — २७ — श. १६०९ आषाढ वद्य १४; इ. १६८७ जुलै २८

[आरंभीं वा. फा. शि.*] लुत्फ मुहम्मद आलमगीरशाही १०९३, २५

इजतअसार सिदगौडा देसाई का। काकती हिसार अजमनगर माळूम बाद के संन १०९८ दरे विळा अमही पादशापुरासी आलो होतो तुमचे कितेक फइदा केले तुम्ही समज धराला नाही रामदास वकील यासी आमचे हकीकत माळूम आहे मो। अलगौडा देसाई पा। हुकेरी व तुम्ही मसलत करून गधर्वगड घेतलेच मुजरा दरगाहासी केले हाली खान आलीशान याचे हासमल हुकूम तुमाहास पाठविल आहे तुमचे वतन बदस्तूर साबीक देसमुखी का। मा। व सरेदेसगती पा। पादशाहापूर बाहल करून देऊ दीगर आमचे तर्फेने अजमनगराचे सारदेसगत करून देऊन दरगाहास मुजरा करून ज्या कामामधे अमही

पडोन त्याची खुबी होईल येकीन समजणे दीगर माहामदआली व देवजी माहादेऊ यासी पादशाही कामावरी पाठविले अहे ते मजकूर व बाजे मजकूर रामदास वकीले सागता तुमाहास अदा होईल लिहिले बरहुकूम कामाची बेगिमी सिताबी करून रामदाससे हुजूर पाठवणे दरगाहापासी उभे करून तुमची व मोगेपाची व खेम सावत व राम दलवी यैस तुमचे मुदे माफीक रोशेन करून तुमची सरफराजी केली जाईल मोत्रब सुद छ २७ माहे रमजान सन जुलूस वाल ३१

पौा छ ११ शौवाल

ले. २८ [हि*.] १०९८; औ. जु. ३१ रमजान २७ } २८ [ले. २७ प्रमाणें शि.*] { श. १६०९ आषाढ वद्य १४ इ. १६८७ जुलै २८

इजतअसार अलगौडा देसाई पाा हुकेरी मालूम बाद के संन १०९८ दरे विला अमही पहिले पादशापुरासी आलो होतो अमा तुम्ही समज धरला नाही रामदास वकीले यास आमच हकीकत मालूम अहे तुम्ही पातशाही कामावरी दरगाहास मजरा होये यैस मसलत करून गधर्वगड घेतल ते बखैर रामदास अमाहास मालूम केलेवरी खान आलीशान [मो. जा.*] यास मालूम करून रामदासस मुजरा करिविले तुमचे सिपारसी बहूत कामाचे महणोन दरगाहासी रोशान करून सिरपाऊ देविले दीगर दरगाहासी येर (हर) येक काभाचे सुरत दाखुअून वतनदाराचे खूबी करावे अजी सबब तुमाहास खान आलीशान याचे हसमलहुकूम मराहमत केले आहे तुमचे वतन देसमुखी बदस्तूर साबीक जे आहे ते बाहल करून देऊ दीगर अमचे तर्फेन तुमचे सरफराजी चादगडे व अजिरेचे सरदेसगती व मनसबा व येक हती देवाऊन दरगाहासी तुमचे मुजरा करून येकीन समजणे दीगर माहामदआली व देवजी माहादेऊ बराबरी हसमलहुकूम खेम सावत सरदेसाई पाा कुडाल व राम दलवी यास हुकूम देऊन रवाना केले अहे त्याचे राजकारणे आलाहिदा कौहणाचे तर्फेन होऊन नये अमचे तर्फेन तुमचे मारफातीने जाहले यैस दरगाहास जाहीर करून त्याच कामामधे तुमाहास खर्च बहूत काही पडोन नेदिता तुमचे सरजाम करून देऊ येकीन समजणे ज्या कामामधे अमही दिलबराई करून ज्यास हाती धरून त्यास दरगाहापासून सरफराज करून खेम सावत व राम दलवी नजदीक रामदासासी पाठून दरगाहाचे खिजमतेमधे मसुकूल राहणे त्यावरून तुम [ची*] सरफराजी होईल तुम्ही त्यास बराबरी घेऊन येणे या बाबे पेशेआदेशे न करणे दीगर बाजे देसाइयानी तुमचे मारफतीने जे येतील त्यास घेऊन येणे त्याचेही सरफराजी होईल लिहिले बरहुकूम कामाची बेगिमी सिताब करून रामदासास हुजूर पाठवणे दरगाहापासी उभे करून तुमचे व सिदगौडाचे व खेम सावत व राम दलवी यैस तुमचे मुदेमाफीक रोशेन करून

तुमची सरफराजी केली जाईल मोत्रब सूद छ २७ माहे रमजान सन जुलूस वाला ३१ पो छ ११ शौवाल

ले. २९
हि. १०९८ (९); औ. जु. ३१जवल१२ } २९ हुवल { श. १६०९ फाल्गुन शुद्ध. १४ इ. १६८८ मार्च ५ नंतर

अली शाही नकल

मुतसदियान व अमिलान हाल व इस्तकबाल पा हुकेरी मिन अमाल सुभे दारुज्जफर विजापूर बिदानंद के जुबदतुल अकरां अलगोंडा वलद लखमगोंडा देसाई पा मजकूर दरी विला बतारीखे १२ दुवाजदहुं जमादिल अवल सन ३१ जिलूस मोआला मुताबिके सन १०९८ हिजरी मोकदस बसाअदते मुलाजिमते बंदहाये ज्यनाबे फैज माआब [मो. जा*.] मुस्तसैद गश्त वर्मावरीदे इनायात गर्दीद अमर जलीलुल कदर अजीमुंशान करामेत सदूर याफ्त के ता रसीदन सनद बमोहर मुतसदियाने हुजूर पुरनूर बदस्तूर व असनाद साबिक बइनाम देहात व लवाजिमे हक देसमुखी बहाल बुदेः व मुतसरिफ बाशंद व बाअद्रऊ अैलाद व अहफाद मोकरर दारंद नकल गिरिफ्ते असलरा बऊ वा गुजारंद बतारीख शाहर सदर सन इलेः तरकीम याफ्त कमा फसलत

इनाम मिंजुमले का मजती व का सोलापूर मौजे ३॥ इनाम जमीन

मौजे वंटमरी	मौजे कडहतरगः	चावरात
अज का मजती १	का मजती १	बदस्तूर
मौजे हटदकेरे का	मौजे सेदूर नीमः	असनाद साबिके
सोलापूर १	का सोलापूर ॥	

इनाम अज का कवूर वगैरः चाहर मौजे बैजे

मौजे गुडस अज	मौजे नागनूर
का कवूर १	अज का सांवगाऊ १
मौजे न्यामताबाद	मौजे निपाणी
खुर्द का नेर १	अज का लाट १

हक व लवाजिमाः व पटीपछोडी व तैनात वगैरः अज पा मजकूर मुताबीक दस्तूर व असनाद साबीक फी तारीख शाहर सफर सन इले

ले. ३० औ. जु. ३१ जखर २७ } ३० श्री { श. १६१० चैत्र वद्य १४ इ. १६८८ एप्रिल १९

पादशाही राघोजीराजे

ा र्द मा अनाम मोघेपा देसाई पा हुकेरी यास मेलगिरी शकराजी करोडी शरणर्थ उपरी अमही शहाबदरासी येऊन च्यारी दिवस जाहले अमहास तुमचे पाचे करोडीगिरी जाहले आहे वैस्यासी कागद लहेवे तरी तुम्ही दुछित जाहला बरें विस्वार काहर केलेयान मनुश यत्न काही चालत नाही बरे रणानबधा अबाजीपंतासी पाठविले {पाठविले{ होते तेही कितेक मजकूर सागितले अहे त्यावारून कळू येईल कितेक मजकूर भ्योटी अती ठाउके होईल कोणीही गोस्टीविसी काही विचार न कीजे जलादतपनाहाः [मो. जा.*] यासी पा माचे ठाणेचे दस्तक दोनी दिवासामधे येईल अर्जी त्याचे वोकिलान लिहिले होते कितेक मजकूर हुजूर अमही लिहिले आहे अजी जासूद रवाना केले आहे च्यारी दिवासा जवाब येईल तवे पावत पाछपुरासी जाऊन तेथींल बेगमी करून येता कलल पाहिजे विशश काये लहेवे अमच खुलासवार वर्तमान आबाजीपंत सगितील त्यावारोन कळू येईल अम्ही तुम्हा वेगल नाही विशश काये लहवे हुजूरचे परवानचे नकल पांठविले अहे जाणिजे मो तेरीख २७ जमादिलाखर जळूसवाला सन ३१ पो छ २९ जमादिलाखर

ले. ३१ [फ*.] १०९७ रजब २ } ३१ श्री } श. १६१० वैशाख शुद्ध ४ इ. १६८८ एप्रिल २३

श्रीमत आलगोडा. देसाई पा हुकेरी गोसावी यासी

ार्द सकलगुणाकार परोपकारमूर्ती [मो. जा*.] स्नो येबाजी राम गुा करोडी माहालानिहाये मो पा पादशापूर आश्रीवाद सन १०९७ उपरी आम्ही माहारानगरास जाऊन बेलगाऊ तरफेची पजमहाल करोडपण करून साप्रत आलो असो त्यामधे तुमचे परगणेमधील आठ कर्याती बाा काा मजती १ काा मुनोली १ काा कबूर १ काा लाटी १ सोलापूर १ नेसरी १ कापसी १ काा नुली १ येणेप्रमाणे सनद सादीर अहे तरी तुम्हाजवली रा वेकाजीपत पाठविले आसे त्याणी मुखवचनी जे सागतील ते पूर्ण मनी धरून याबाा पत्रदरुषण अपले गुमस्ता देऊन पाठवणे उपरातीक कितीयेक मजकूर विवेक केला जाईल येदद्विशई विशेश लिहिणे लागत नाही तुमचे माहलीचे वर्तमान हुजूर लिहिणे अगत्य अहे तुमचे गुमस्ता येऊन बोलिलेप्रमाणे लिहिले जाईल व किती-येक गोस्टीचा इत्यार्थही होईल कलले पाहिजे तुम्हा अम्हामधे पूर्वीपासून स्नेहे चालोन

अले अहे येणेकरिता अम्ही दुसरेयास सिरो नेदिता तुमचे माहाल स्वाधीन करून घेतले अहे पुढे स्ने [ह*] वृधी करून नामोश केले पाहिजे हे अश्रीवाद छ २ माहे रजब

पौ। छ ८ माहे रजेब

[पाठीवर डाव्या अंगास वा. फा. शि.*] बाबाजी राम बन्दह दरगाह इलाहि ३१

ले. ३२ फ. १०९७; सु. [१०८*] ८ रजब ७	३२ श्री	श. १६१० वैशाख शुद्ध ९ इ. १६८८ एप्रिल २८

[आरंभीं डाव्या अंगास वा. बा. शि.*]

गार्द मा। अनाम राजश्री अलगौडा देसाई पा। हुकेरी यासि माहाराज राजश्री राघोजी राजे साहेबू लेहावया कारणें सुा। समान सन १०९७ मीर हुसैनी दीवान येही तुम्हास सेख फतेमहमद अहदी बोलाऊ पाठविले आहेत तरी तुम्ही यासि रुजू होऊनू आपला हाल अहवाल जाहीर करून कौल घेणे कोन्हे गोस्टीचा अनमान न करणें तमाम गिर्द-नवाईचे देशमूख देशपाडिये बेलगावी रुजू जाले आहेती मिर्जा बहूत नेक आहेती तुम्ही मुरसीचे कागद घेऊनू जाणें आपली हकीकती जाहीर करणे [ष.*] मोर्तब [पाठीवर*] तेरीख ७ माहे रजबू

ले. ३३ पौ। [? *] रजब ८	३३ श्रीमलिकार्जुनप्रसन	श. इ.

॥ र्द श्रीमतु सौजन्येसिंधु सिरोमणी निगर्वी आलगौडा देसाई परगणे हुकेरी यासी प्रति स्नहेकित सिदो लिंगोजी कानगोह शेरणशेरणार्थी येथील क्षेम जाणौन तुम्ही अपुले क्षेम लिहिले पाहिजे याउपरी साप्रती पादशाही दिवान बेलेगावासी आले असे तमाम मुलकाचे देसमूख वा देसपाडेसी बोलाविले असे तुम्ही कदीम मिरासदार अहे पादशाही फिदवी पीरजादे अहे म्हणौन तुमचे सिपारीस बहुत काही केलो असो तेवरून बहूत काही शतोश तुम्हावरी जाहले असे त्याचे मनोगत तुम्हासी नेऊन पादशाहाचे भेटी कराव्या तश्रीफ देव्या बहुत काही समाधान करून पाठऊन देव्या यैसे निस्छे केले असे पत्रदरशण स्वार होऊन आले पाहिजे तुमचे यामधे विवेक असे इत्यादक वर्तमान राजेश्रिया दाजीराम सागता मनासी येईल बहु काये लिहू हे विनति

[पाठीवर*] पौ। छ ८ माहे रजब

ले. ३४
पौ [? *] शाबान १८ } ३४ श्री { श.
इ.

सकलगुणनिधान सौजेन्यासागर माहामेरु राजेश्री मोघेगौडा देसाई पा हुकेरी गोसावी यासि

र्द सिन्हे अकित यादाजीराम सरसेखदार माहाल करोडी माहलानिहाये आश्रीवाद उपरी तुम्हापासी पाच माहालीचे येकदर कौल होता तो दिल्हे होते त्याचे तालीक लिहून घेऊनू कौल दिल्हे नाही अता माहालोमाहालास तकवादिलासा देण्यास धणियाचे कौळ पाहिजे अता कागद पाहाताच तालीक लिहूनू घेऊनू यैन जिनस कौळ पाठऊनू देणे अणी खर्चाचे तगची आहे जकायती व बाजे हर कोठे फेर मोबदला करून होन १०८ दाहा पाठउनू देणे या कामास सेख सिराज पाठविले असे यास होन ·।।· प्रताप देणे जेथे देवाल तेथे मुजरा पडल जाणिजे हे अश्रीवाद अवे काही उतम यैसे अम्हा कारणे पाठविले पाहिजे काही आमचे घरासी गोकाकेसी पाठवणे त्याचे पैका जे काये होईल ते अम्ही देऊन जाणिजे विशेष लिहिणे नलगे हे अश्रीवाद

पौ छ १८ शाबान [पाठीवर ले. ३१ प्रमाणें वा. फा. शि.*]

ले. ३५ [हि.* ?] ११००
सफर १ } ३५ { श. १६१० मार्गशीर्ष शुद्ध २
इ. १६८८ नोव्हेंबर १५

[उजव्या बाजूस औरंगजेबाच्या अधिकाऱ्याचा वा. फा. शि.*]

खान बहादुर बन्दह बादशाह आलमगीर १०९३, २६

जब [द*] तुल येकरान आलगौडा देसाई परगने हुकेरी [द] री विला तुम्हास हुकूम की दोनिसे प्यादे घेऊन [हु]जूर येने त्या हानोज ताह हजूर येऊन पोहचले नाहीत हाली देखत परवाना तुम्ही खुद बजमीयेती हजूर येने आगर तुम्हास आजार असेल तरी आपले भाईचे सो दोनिसे प्यादे देऊन सिताब पाठवने तमाम जमीदार आले असेती दर हाल देखत परवाना येक सायेत मातल न करिता जमीत घेऊन येने याबदल मुजरती चोबदार पाठविला असे दर हाल येने मोर्तबू [चौकोनी फा. मो.*] तेरीख १ सफर सन ११००

[पाठीवर*] पौ छ २ सफर

ले. ३६ [फ* ?] ९८ } ३६ { श. १६१० मार्गशीर्ष शुद्ध १२
सफर १० } { इ. १६८८ नोव्हेंबर २४

[आरंभीं उजव्या बाजूस लं. व. फा. शि*.] रशीद बहादुरखानी १०९८

ताा मोघना देसाई दुवमहु पाा हुकेरी इजहाये अकी दरी विला पेशजी स्याह माा माहालदार पाठविला होता हालीही पाठविला असे तुम्ही अपली खातिरजमा राखोन अबद राहने स्याह माा जबानी सागेल त्याबरहुकूम सरजाम करून देने अपली हकीकती या बराबरी कुली हकीकती हजूर अर्ज करने मोतंबू तेरी [ख] १० सफर सु ९८

[पाठीवर *] पौ छ १२ माहे सफर

ले. ३७ सु. १०८९ } ३७ { श. १६१० पौष शुद्ध १२
रवल १० } { इ. १६८८ डिसेंबर २४

[आरंभीं उजव्या बाजूस औरंगजेबाच्या अधिकाऱ्याचा वा. फा. शि.*]
नुसतखान फिदवी बादशाह आलमगीर

ताा देमणा गुमस्ता देसाई पाा हुकेरी सुाा तिसा समानीन व आलफ बिदानंद के दरी विला हनोज तुम्ही आलां नाही हे कार्य माना अहे आता आपले जमेतीनिसी सिताब स्वार होऊन आले पाहिजे आणिखी लोक मिलतील तरी तेही घेऊन येणे उजूर न करणे परवाना देखताच स्वार होऊन आलें पाहिजे येथे बहूत जरूर काम आहे दिरंग न करिता आले पाहिजे छ १० माहे रबिलौवल [चौ. फा. मो.*]

ले. ३८ फ. १०९९ (८); } ३८ { श. १६१० पौष शुद्ध १५
सु. १०८९; औ. जु. ३२ } { इ. १६८८ डिसेंबर २६
रवल १२

[आरंभीं उजव्या बाजूस औरंगजेबाच्या अधिकाऱ्याचा वा. फा. शि*.]

मोकदमल इमसाल देमणा गुमस्ता अलगोडा देसाई पाा हुकेरी माळूम बाद सुहूर सन तिसा समानीन अलफ दरी विले तुज येक दोनी नौबत बोलाऊ पाठविले अला नाही हुजरून तलब परवाना सादीर असता अला नाही हे काये माना असे हाली हुजरील परवाना सादीर अहे तरी देखत परवाना स्वार होऊन दर हाल कोल्हापुरास येणे मिया-

शाकिर माहामद येथे मोकाम अहेत तू हुजूर अलेवेरी लस्करास जातील तरी दर हाल हुजूर येणे येक घडी दिरंग न करणें काही जरूर काम असे मुलाजिमत जाहालेवरी मजमून माळूम होईल दर हाल स्वार होऊन येणे या कामाबदल पाठविले असें यास मसाला रुपया बिा

सिवजी अबाजी
रुपये २
येमाजी बरमाजी
रुपया २

अत्माजी रवलोजी
रुपये २
नरसोजी बिन
—हा २

मिठू बिन
—२ रुपये
सताजी रामजी
—हा २

येकून रुपये बारा देविले असे अदा करून हुजूर येणे अणीक काही जमेत मिलेल ते घेऊन येणे जरूर काम असे सिताब येणे छ १२ रबिलौवल सन हजार १०९९ जळूस ३२

ले. ३९ [फ. ? १०*] ९८
रवळ २२

३९

श. १६१० पौष वद्य ९
इ. १६८९ जानेवारी ५

[आरंभीं उजव्या बाजूस ले. ३६ प्रमाणें शि*.]

तांं अलगौड देसमूख पा हुकेरी माळूम बूदे बिदानद चू हासनखान वलद मियामाण यासी मौजे हडगल पा माा इनाम आस्त तरी देहे माा बाबे खसमान करू माातुलेच हक पोचते बेउजूर कीजे कोणाच हरकती फसादी हो ने दीजे तुम्हीं कुमक करू बेउजूर हक मौजे माा इनाम पोचत (ते) कीजे दरी बाब फरामोश ना होने छ २२ माहे रबिलौवल स ९८

ले. ४० [हि*.]
११०० जखर २७

४०
[ले. ३५ प्रमाणें शि. व मो.*]

श. १६११ चैत्र वद्य १४
इ. १६८९ एप्रिल ८

ताा आलगौडा देसाइ पा हुकेरी दरी विला तुलजोजी देसाइ पा खानापूर याचा कबिला तुम्हापासी असे तरी आपले लोक हमराहा देऊन कबिला आम्हा नजदीक गावास पोहोचावने ये बाबे येक सायत मातल न करने मोर्तबू [चौ. फा. मो.*] बिलतेरीख २७ जमादिलाखर सन ११००

[पाठीवर*] पो छ २८ मिाा

ले. ४१ [हि*.] }
११०० रजब ११ }

४१
[ले. ३५ प्रमाणें फा. शि. व मो.*]

{ श. १६११ वैशाख शुद्ध १३
{ इ. १६८९ एप्रिल २२

जबदुतुल अमासिल अलगोडा देसाई हुकेरी दरी विला सुजाअतशर रामोजी राजे घोरपडी यास भूधरगड तरपेस रवाना केल असे येसियासी तुमही अपले जमावानिसी त्यासी रुजू होणे ये बाबे मतल न करने दर हाल भूधरगडास पोहचोन हजूर अर्दस करने ये बाबे येक साइत मतल न करने दरी बाब ताकीद तमाम दानद [चौ. फा. मो.*] तेरीख ११ रजब सन हजार ११०० [पाठीवर*] पौ छ १३ रजेबू

ले. ४२ पौ सु. १०८९ }
रजब २० }

४२
[ले. ३५प्रमाणें फा.शि.व मो.*]

{ श. १६११ वैशाख वद्य ७
{ इ. १६८९ मे १

जब्रदुतुल अमासिल अलगोडी देसाई पाा हुकेरीं दरी विला इजत असार मातमेदराऊ वकील अदलखानी यास कौवल देऊन ये जागा अनिले असे येसियास पाा मजकुरी जागा घर देऊन त्याचे हर येक बाबे खसमाना करने कोने बाबे अजार होऊन न देने [पाठीवर*] पौ छ २० रजेबू दर साल सन तिसा समानीन अलफ

ले. ४३[फ ? १०*]९९ }
सवाल ४ }

४३
[ले.३५ प्रमाणें फा.शि. व मो.*]

{ श. १६११ श्रावण शुद्ध ६
{ इ. १६८९ जुलै १२

अलगौडा देसाई हुकेरी व सिदगौडा देसाई कागजी (काकती) दरी विला तुम्ही अर्जदास पाठविली हकीकति माळूम जाली तुम्ही वलभगडची हकीकती लिहिली त्यावरून किलेदार मजकुरास कौल पाठविला असे त्याची निशा दिलासा करून किला खाली करून सुजायेतशार सेख अबदुलअली याचे हवाले किला करनें व आपले पयादे येतमादी नफर से येक किले मजकुरी ठेवणे किलेदार मजकुराची मालमता बिसात कुली माफ केली असे हजूर आलियावरी घोडा सिरपाव देऊन दिगर अडीचसेह होन नकद याचे बाबे लिहिले तरी सरकारचा गला येन जिनस आहे त्यापैकी निस्प किलेदार मजकुरास देन निस्प अबदुल आली याचे हवाले करनें [नि*] तेरीख ४ सवाल सन ९९

लें. ४४ [फ*]
१०९९ जिल्काद २१

४४

श. १६११ भाद्रपद वद्य ७
इ. १६८९ ऑगस्ट २७

[लें. ३५ प्रमाणें शि. व मो.*]

ता अलगावडा देसाई हुकेरी व सिदगावडा देसाई काकती इजहाये आकी दरी विला अर्जदास पाठविली पोहचोन मजमून माळूम जाला तोफचे बाबे लिहिले तरी सुजायेतशार अबदुलआली यासि परवाना लिहीला असे तोफा आनऊन घेने मो तेरीख २१ जिल्काद सन १०९९ [पाठीवर*] पौ छ २४ माहे जिल्काद

लें. ४५ [फ* ?] ११००
मोहरम ६

४५

श. १६१२ आश्विन शुद्ध ७
इ. १६९० सप्टेंबर २९

[आरंभीं उजव्या अंगास औरंगजेबाच्या अधिकाऱ्याचा अ. ब. फा. शि.*]

जबदतुल येकरान आलगौडा देसाई परगने हुकेरी दरी विला अर्जदास पाठविली पोहचोन मजमून माळूम जाला आपले आयेमियाबदल लिहिले तरी तुमचे गुमास्ते हजूर अमीन व करोडी मजकुरास बोलाऊन ताकीद केली तेही आपले गुमास्तियास लिहिले असे की देसाई मजकुराचे अयेमियास मुजाहींम न होने तुम्ही त्या दखल न देने व आपले प्यादे ना ५० हजूर हवेलीस चौकीबदल पाठवने ये बाबे हजूरचा हुकूम असे की देसाई याचे प्यादे चौकीस बोलावने दर हाल पाठवने मातल न करने मोर्तब तो ६ मोहरम सन १०१००

[पाठीवर*] पा छ ७ मोहरम आाा माहार काकती

लें. ४६ [फ*. ?]
११०० जखर १८

४६

[लें. ३५ प्रमाणें शि. व मो.*]

श. १६१२ फाल्गुन वद्य ५
इ. १६९१ मार्च ९

ताा आलगौडा देसाई पाा हुकेरी दरी विला अर्जदास पाठविली पोहचोन मजमून माळूम जाला आम्ही छ १९ रोजी हुकेरीस दाखल होऊन तुम्हीही येऊन मुलाजमी करने दीगर हजूर खबर जाहीर जाली की भूदरगड गनीम सोडून गेला किला खाली असे म्हनऊन जाहीर जाले तरी तेथे मानूस पाठऊन तहकीक खबर अनऊन हजूर लिहिने ये बाबे मातल न करने दर हाल खबर पोहचावने माा

तो १८ जमादिलाखर सन ११००

[पाठीवर*] अलगौडा देसाई हुकेरी

पौ छ २० जमादिलाखर

ले. ४७ [फ* ?] ११०० जखर २४
४७
[ले. ३५ प्रमाणें शि. व मो*.]
श. १६१२ फाल्गुन वद्य ११
इ. १६९१ मार्च १५

ता अलगोडा देसमूख पो हुकेरी माळूम वूदे चू दरी विला अनदराऊ नैकर सरकार वाल्याचे गोरू चोरीने गेले होते तेपैकी हाली मौजे मललहोलीचे मोकदम सखगौडाचे येथे माद गाऊ येक तलास जाहले म्हणोन हुजरू जाहीर जाहाले तुम्ही मोकदम मजकुरास ताकीद बजोर पोहचाऊन गाई राऊ मोांनुलेस देविले पाहिजे दीगर परगणे मजकूर जफ्त रुसूम ताळूक खालसा सरकार वाला ताळूक अहे ते खिजमत बहुदे राऊ मोांनुले जमे अहे तरी तुम्ही हर येक बाबे खसमान करीत जाणे काा मजती पो मजकूर तेथील अमल शफवाद (?) होत नाही म्हणौन हुजुरू जाहीर जाहाले हे अमल खालसा ताळूक अहे तेथील आमलास हरकत होणे मुनासीब नाही जागीरदारचे उजुरू न करिता खालसाचे अमल बिला उजुरू चालवीत जाणे तारीख { तारीख } छ २४ माहे जमादिलाखर सन ११००

पो छ २४ माहे जमादिलाखर

ले. ४८ सु. १०९२ रमजान ७
४८
श. १६१३ ज्येष्ठ शुद्ध १०
इ. १६९१ मे २६

[दुसऱ्या ओळीच्या डाव्या अंगास लं. व. अ. फा. शि.*]

॥ र्द माा वीरनाईक दि॥ आलगौडा देसाई पाा हुकेरी माळूम बाद स्रुाा इसने तिसैन आलफ दरी विला तुम्ही गेले बादज काही खबर बखैर पाठविले नाही अतां अपले खबर बयांवार लिहून पाठविले पाहिजे येथील मजकूर तरी आम्हापाशी येक भाला अदमी मोख्तसर आले होते त्यानी सागत होता की रायाजी सामराज येथे काही राहात नाही रामदुर्गासी जाणार मणून तहकीक खबर सागत होता चैसयास त्यासी जे राजकारण करणे असले तरी दोनी रोज जरा सबूरी करून राजकारणे करणे या तर्फेसी तो काही राहात नाही म्हणौन खबर अहे {आहे} येथून भला आदमीसी त्याजपासी पाठविले असे आजी निमाश मासी अगर सबा – – – खबर येईल आलियांबाद जे जे काये खबर येईल ते – – ऊन देऊ आणि सदलापूर सेटियाजीचे मजकूर तरी या तर्फेसी मोगलाचे बहूत जोर जाहाले मणून अपले कबिला घेऊन नागर मुनोलीसी येऊन बैसून राम[चं*]द्र पडितासी कागद पाठविले की आपले कबिलासी कोठे ठेवावे मणून लिहिले असे त्याचे जवाब येणे तलग वा[illegible] जवाब आलियां बादज

कोठे तरी कबिला ठेऊन हर कोठे तरी जाईल हली तो रायाजी सामराज त्याचे मुला-कातेसी सामानगडासी जाणार असे आणि आम्ही काये सागितल होते त्याचे जवाब पाठविले नाही आणि जी जमा गोरु ३ राहिले असे तरी ते गोरु कोठे अहेत – – त्याचे तलास करून देवणे जियादा लिहिजे तरी अदिल फर्जंद असती [नि*] पाा हुजूर [फा. मो.*] मुरत्तब शुद [नि*] तोा छ ७ रमजान

ले. ४९ सु. १०९२ मोहरम २६ } ४९ पादशाही { श. १६१३ आश्विन वद्य १३ इ. १६९१ आक्टोबर ९

मशुरुलदौलत मफरुलहतबत सादतुलइनायेत नेकनाम भाई अलपा देसाई पाा हुकेरी सरकार अजमनगर मालूम बाद बिदानद सुाा इसने तिसैन अलफ दरी विले तुम्ही किताबतीनामा मरसूल केले त्यावरून लिहिले मजकूर मालूम जाहाले गनिमानी जोरावरी करून चिकुडी काबीज केले घोडी व मालमता लुटून नेले म्हणून लिहिले तरी तुमचे यानी तुम्हांसाधाते हरामजादगी केलिया पशमान होतील तुमचे हकीकत परभारेही मालूम जाहाले तुम्ही अपला खातिरजमा राखणे हर येक बाबे तुमचे भलेबुरेमधे आम्ही शेरीख असो आपले हाती जे काये उपराला होईल त्यास फरक पडणार नाही तुमची हकीकत कुल हुजूर लिहून रवाना केले आहे इनशा अलाहु ताला थोडे रोजा[... न*] मची फौज येणार आहे आलेवरी तुम्हांसावाते जे कोण हरामजादगी करितील त्यास सजा दिल्हे जाईल अम्हास यैसे मालूम होत आहे जे तुमचे बाजीने आजेब येकरंग धरिले आहे यैसियांस तुम्हीं [मो. जा.*] अलमपना साहेबाची मुलाजमत घेणेचे तजवीज करणे तुम्ही भाई अशा खातरजमा राखणे जाणिजे मोा सूद राा छ २६ माहे मोहरम

तबलक कागद यादवराऊ रामचेद्रपंत सेटीबाजी ढपलापूर

पौा छ २ माहे सफर

ले. ५० सु. १०९२ सफर ७ } ५० श्री { श. १६१३ कार्तिक शुद्ध ८ इ. १६९१ आक्टोबर १९

राजेश्री अलगौडा सरदेसाई प्रांत हुकेरी गोसावी यांसि

दं अखडितलक्षुमी अलकृत राजमान्य [मो. जा*.] श्री रामचद्र नीलकंठ असीर्वाद सुाा इसने तिसैन अलफ राजेश्री त्र्यबक गोपाल सुभेदार प्रांत अजरे हे हुजूर अले होते येही कितेक तुमच्या निस्ठेचे वर्तमान विदीत केले त्यावरून तुमचा मजुरा झाला

तुम्ही पूर्वीपासून अजीपावेतो निस्ठेस अंतर केले नाही याजचनिमित्य आमची कृपा तुम्हावरी पुर्ती अहे पुढे तुम्ही कोणेविसी चिंता न करिता अपले समाधान असो देणे ताम्राच्या व बेरडाच्या गळबल्यानिमित्य अजराचा सुभा खराब झाला अहे ये गोस्टीचा उपाये जो करणे तो करून देशकते तुमचा मजुरा होऊन ये असी गोस्टी करणे हुजुरून वराता व यासी अमची वरात तुमचे कर्यातीवरी सुभाहून झाली अहे त्याचा यैवज झाडून पावता करणे राजेश्री यादवराऊ सरसुभेदार प्रांत अजरे याचे अज्ञेने स्वामीकार्य करीत जाणे वरकड कितेक वर्तमान राजेश्री त्र्यबक गोपाल सुभेदार सागता कलो येईल सारांश तुम्हापासून निस्ठेस अतर न पडे तें गोस्टी करणे छ ७ सफर [नि.*] निदेश समक्ष [लं. व.*] लेखन । सीमा समु । ल्रसती [पाठीवर लं. व. शि.*] श्रीरामचं । द्रचरण नील । कंठ सोनदे । व शरण ।

सुरू सूद पौा छ १४ रबिलाखर

लें. ५१ सु. १०९२
रखर ११

५१
श्री

श. १६१३ पौष शुद्ध १२
इ. १६९१ डिसेंबर २२

राजेश्री अलगोंडा देसाई पाा हुकेरी गोसावी यासी

र्द अखंडितलक्ष्मुमी अलंकृत राजमान्य [मो. जा.*] स्नो यादवराऊ सरसुभेदार प्रो कोल्हापूर असीर्वाद सुाा इसने तिसैन अलफ पूर्वी येक दोनी पत्रे पाठविली व मुत्गा कितेक तुम्हास सांगोन पाठविले परतू उतर पाठविले नाही फौज त्या प्रांते येणार होती म्हणौन प्रसंग पाहून दर गुदर केला उतमच केले येसियासी तेही गोस्टी वारून गेली प्रस्तूत राजेश्री [मो. जा.*] पंत भूधरगडास येताती तुमचे गोमटे करावे यैसा अमचा हेत आहे त्यास कितेक विचार मुत्गा सांगोन पाठविले असे तेणेप्राा मनी धरून अपले उर्जीत करून घेणे राजेश्री [मो. जा.*] येणार तरी अगोदर अम्हाजवली अपले ब्राम्हण पाठऊन देणे भेटी करऊन नीटनेटका विचार करून घेऊन येविशी समाधान असो देणे पत्राचे प्रतिउतर पाठविणे बहूत काये लिहिणे राा छ ११ रबिलाखर [आपल्याच्या पानाच्या आकारांत बालबोधींत*] राजते ले । खनावधि

[पाठीवर लं. व. अ. बा. शि.*] श्रीरामपदी । सदाभाव सर । सुभे यादवराव
पौ छ १४ रबिलाखर

ले. ५२ सु. १०९२
रखर २०

५२
श्री

श. १६१३ पौष वद्य ७
इ. १६९१ डिसेंबर ३१

[ले. ५१ प्रमाणें शि. व मो.*]

राजेश्री अलगौडा देसाई पा हुकेरी गोसावी यासी

ई अखडितलक्षुमी अलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्नो यादवराऊ सरसुभेदार प्रो कोल्हापूर असीरवाद सुा इसने तिसैन अलफ तुम्हास दोनी च्यारी वेळा पत्रें पाठविली परंतू उतर पाठविले नाही हली राजेश्री नागोजीपंत तुम्हाकडे पाठविले अहेती कितेक वर्तमान सांगता कलो येईल यैसियासी राजेश्री [मो. जा.*] पंत स्वार होऊन मजल दर मजल येताती येका दों दिवसां साऊगाव प्राते येणार येसमई तुमचे उर्जीत व्हावयाचा प्रसंग अहे तरी अपला सभ्य व्राम्हण व पोख्ती भेटी व वस्त्रे पाठऊन देणे राजेश्रीची भेटी करऊन तुमचा नीटनेटका प्रसंग करून घेऊन अजीपावेतो वेचखर्च केला अतां जो कराल तो सार्थक होईल जाणिजे रा छ २० रबिलाखर

[पाठीवर*] पौ छ २४ माहे रबिलाखर

ले. ५३ पौ सु १०९२
रखर २२

५३
श्री

श. १६१३ पौष वद्य ९
इ. १६९२ जानेवारी २

[ले. ५१ प्रमाणें शि. व मो.*]

राजेश्री अलगोडा देसाई पा हुकेरी

ई अखडितलक्षुमी अलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्नो यादवराऊ सरसुभेदार व कारकून प्रा कोल्हापुर असीर्वाद सुा इसने तिसैन अलफ तुम्ही पत्र पाठविले पाऊन वर्तमान कलो अले व नरसगौडा व अणाजीपंती मुखवचने सांगितले यैसियासी कितेक विचार राजेश्री नागोजी तुकदेऊ सभासद सेवक राजमडल यासी सांगोन तुम्हाकडे पाठविले अहेती तरी निश्चये करून पाठविणे तुमचा अभिमान पूर्ण अहे कोणेविशी चिंता न करणे समाधान असो देणे पंत मोनिले तह करितील तेणेप्रा निर्वंह करून सत्वर अम्हाकडे पाठवणे बहुत लिहिणे नलगे रा छ २२ रबिलाखर

पौछ २९ माहे रबिलाखर

ले. ५४ सु १०९२ }
रखर २३ }

५४

[ले.५५ प्रमाणे फा. शि. व मो.*]

{ श. १६१३ पौष वद्य १०
{ इ. १६९२ जानेवारी ३

फौजदार

मोकदमइमसाल अलगौडा देसाई पाा हुकेरी माळूम बाद सुाा इसन तिसैन अलफ अम्ही तुम्हापासोन अलियावरी [मो. जा.*] याची कितेक गोस्टीची रदबदल केली अहे आम्हापास तुमचे गोस्टीचा इतबार होत नाही पेसजी येक दोघास मधेस्त घाळून भेटीस येतो म्हणौन इतबार दाखऊन गुरे घेऊन गेला तैसच हाही अमल होईल याची इतबार काये म्हणौन बोलताती यैसियास रदबदलीस येकदोनी दिवस लागलिया गूर फाकून वा ढोरे गुरे गेलिया तुमचा इतबार नाही व अम्ही तह दिल्हा तोही वेवार होणार नाही बदलामी दूर पावेतो होते इतबार तुटतो यैसे हरगिज न करणे अमचे जाब्र ये पावतो येक गुरू फरक होऊ न देणे येथोल अमल हर येक गोस्टीची घटाई करून लिहून पाठवितो उतावली न करणे भेटींचा तह करून घेऊन येत अहो याचा जाब सबानिमाताजा वख्ती पाठऊन देतो छ २३ रबिलाखर मोर्तब सूद [नि*] पौ छ २४ माहे रबिलाखर

ले. ५५ पौ सु. १०९२ }
रखर २८ }

५५

{ श. १६१३ पौष वद्य ३०
{ इ. १६९२ जानेवारी ८

[मजकुराच्या उजव्या अंगास वा. फा. शि.*]

मोकदमइमसाल अलगौडा देसाई पाा हुकेरी माळूम बाद सुाा इसने तिसैन अलफ दरी विला तुम्ही बैल सोडायाचा तह करून वाइदा केला होता यावरून बकालास दिलसा करून राहविले होतें त्यावरी येथे हर येक तुम्हासी रदबदल करून गुरे वा बैल सोडायाचा इलाज करावा तलग तातडीने स्वार होऊन गेलेंत बादज घोडगरीस यावयाचा मतलब धरिला होता खबर अली की तुम्ही वटमरीस गेलेती तेथे अम्ही अलिया बदलाम होईल याबदल भिक नाईक व सात नाईक पाठविले अहेत बैल सोडू देविले पाहिजे खलकामधे आम्हच बदलामी जाहली अहे दूर दराज होईल तीरदलकर बकालाचे पाई दोनी पेठाची बदलामी येते यैस न करणे यावख्ती हर इलाजे बैल सोडून देविले पाहिजे पेस्तर भाईबदाचे कचाट तुम्हास मानल तैसे करणे त्यास मानल ते करितील अम्हावरील बदलामी चुके यैसे करणे कितेक खबर मीरा (भीक) नाईक व सात नाईक सागता कलो येईल [लं. व. फा. मो.*] मुरत्तब । शुद दीगर फौजदार यानी अम्हास तगादा लाविला आहे की तुम्ही सलास गेलेत म्हणौन अम्ही उगेच होतो नाही तरी येक घडीचा उजूर न करिता गुरे घेतो यैसे फार तगादा लाविला आहे जग होणार अहे अम्हावरी येहसान करणे की बैल सोडून ये व कि द बा द रा चे तु र ज मा ध र ती - - - - [वरील प्रो फा. मो.*] [नि*] पौ छ २८ रबिलाखर

ले. ५६ सु. १०९२ रखर २८ | ५६ श्री | श. १६१३ पौष वद्य ३० इ. १६९२ जानेवारी ८

[ले. ५१ श्रो शि. व मो.*]

राजेश्री अलगौडा देसाई पाा हुकेरी गोसावी यासी

ईं अखडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य [मो. जा*.] श्रो यादवराऊ सरसुभेदार व कारकून प्रो कोल्हापूर सुाा इसने तिसैन अलफ तुम्ही पत्र पाठविले पाऊन वर्तमान कलो अले यैसियासी दर्शनाचा भावार्थ पूर्वी तुम्हास लिहिला होता त्यावरून कलले असेल प्रस्तुत लस्करचा येकदोनी दिवस विचार अहे त्यासारखे तुम्हास लिहून पाठऊन जाणिजे राा छ २८ रबिलाखर [समासांत*] पौ छ २९ रबिलाखर

ले. ५७ सु. १११६ जिल्काद २९ | ५७ श्री | श. १६३७ कार्तिक वद्य ३० इ. १७१५ नोव्हेंबर १५

[पाठीवर शेवटून चौथ्या ओळीच्या डाव्या अंगास लं. व. शि.*] श्रीरामचं । द्रचरण नील । कंठ सोनदे । व शरण

राजश्री लखमगौडा वलद बसप्रभू देसाई पाा हुकेरी व सरदेसाई काा कापसी व काा नुली गाो

दं अखडितलक्ष्मीअलक्रत राजमान्य [मो. जा*.] श्रो रामचंद्र नीलकंठ हुकूमतपन्हा आसीर्वाद सुहूर सन सीत असर मया अलफ तुम्ही हुजूर चिकोडीचे मुकामी येऊन विनति केली की आपण वतनदार पुरातन निष्ठेने या राज्यात श्रमसाहास करून शेवा केली पुढेही सेवेची उमेद धरीतं आहो यैसियासि आपले पूर्व वतन. काा कापसी व कर्यात नुली येथील सरदेसगतीचे आहे ते सांप्रत कालवैशम्येकरून चालत नाही यैशास स्वामीनी कृपाळू होऊन वतन आपले दुमालां करावे म्हणून विदीत केले त्यावरून मनास आणितां तुम्ही राजश्री [मो. जा*] छत्रपति स्वामीच्या राज्यांत सेवा केली व पुढेही निष्ठेने शेवा कराल येदर्निमित्य सदरहू वतन सरदेसमुखीचे दोनी कर्यातीचे तुम्हास करून दिल्हे असे वतनास गावगना हकलाजिमा कानुवात राबता बेगारी इनाम व फसकी बाा निा माहाल देसाई याप्राा करून दिल्हे असे दिवाणात पानमान तश्रीफ माहाल देसाई या अगोधर तुम्ही घ्यावी तुम्ही घेतल्यावर माहाल देसाई याणी घ्यावी याप्रमाणे वतन करून दिल्हे असे सदरहू वतनास इनाम गाव करून दिल्हे

मौजे मादेहाल काा कापसी १ मौजे हसूर - - - नुली १

येकूण दोन गाव दोही कर्यातीस इना [म] खेरीज हकदार व इनामदार करून

दिल्हे असेत सदरहू वतन देखील गाव तुम्ही व तुमच्या पुत्रपौत्रादी वौशपरपरेने अनभऊन सुखरूप राहाणे जाणिजे छ २९ जिल्काद [नि*] निदेश समक्ष [लं. व*.]
लेखन । सीमा समु । लसती बार सुरू सूद बार
[कागदाच्या जोडावर मोर्तबाचे २ ठसे*]

ले. ५८ सु १११६ जिल्काद २९	५८ श्री	श. १६३७ कार्तिक वद्य ३० इ. १७१५ नोव्हेंबर १५

[आरंभीं मध्यावर ५७ प्रमाणें शिक्का *]

आज्ञापत्र समस्त राजकार्यधुरधर विस्वासनिधी राजमान्य राजश्री रामचंद्र पंडीत हुकूमतपन्हा ताा मोकदमानी देहाये काा कापसी

कसबा मार १	मौजे हमीदवाडा १	मौजे कासारी १	मौजे मुरकूट १	मौजे आरलगोडी १
मौजे मुगली १	मौजे भेडवडे १	मौजे वडगाव १	मौजे करडेहाल १	
मौजे बेलकी १	मौजें हलदी १	मौजे दुणिकेरे १	मौजे मागनूर १	
मौजे नागरगाव १	मौजे बेलेवाडी १	मौजे लिगनूर १	मौजे खोडवे १	
मौजे बेलेवाडी १	मौजे नागणवाडा १	मौजे आलाबाद १	मौजे बेगवडे १	
मौजे मानवले १	मौजे अर्जुनवाडी १	मौजे जेनेहाल १	मौजे बालेघोल १	
मौजे १	मौजे बेलावी १	मौजे पाली १	मौजे धामणी १	
मौजे नदेहाल १	मौजे गलगले १	मौजे करजवणे १	मौजे पिपलगाव १	
मौजे पागेरी १	मौजे हासूरखुर्द १	मौजे १	मौजे चिमणे १	
मौजे मतंगे १	मौजे मादेहाल १	मौजे हालीकेरे १	मौजे बारचे १	चणाके ॥

सुहूरसन सीत असर मया अलफ राजश्री लखमगौडा वलद बसप्रभू देसाई पाा हुकेरी सरदेसाई काा मजकूर याणी हुजूर चिक्रोडीचे मुकामी येऊन विनति केली की आपण पुरातन वतनदार या राज्यात श्रमसाहास करून सेवा कली पुढेही निष्ठेने वर्तोन स्वामीकार्य करावे हे उमेद धरीत आहो यैशास आपले वतन काा मजकूरचे सरदेसगतीचे आहे ते कालवैशम्ये करून चालत नाही तरी स्वामीनी कृपाळू होऊन सदरहू वतन आपल दुमाला करावे म्हणौन विदीत केले त्यावरुन मनास आणितां हे पुरातन वतनदार राजश्री [मो. जा.*] छत्रपति स्वामीच्या राज्यात निष्ठेने वर्तोन श्रम साहास केले याचे चालवणे आवशक यदंनिमित्य काा मजकूरचे सरदेसगतीचे वतन अजरामऱ्हामत करून दिल्हे असे सदरहू वतनास गावगना बाा निा माहालदेसाई हक्क व इनाम व कानुवाती फसकी राबता बेगारी याप्रा करून दिल्हे असे पानमान तश्रीफ दिवाणात याणी आधी घ्यावी याचे पाठीमागे माहाल देसाई याणी घ्यावी याप्राा वतन याचे दुमाला केले आहे तरी

सदरहू वतन यास व याचे पुत्रपौत्रादि वौशपरंपरेने चालवीत जाणे या पत्राची प्रती लेहून घेऊन असलपत्र परतोन मारनिलेयासी भोगवटियास देणे जाणिजे छ २९ ज़िल्काद [नि.*] निदेश समक्ष [वा. मो.*] लेखन । सीमा समु । ल्लसती

बार सुरु सुद बार

[कागदाच्या जोडावर मोर्तबाचे २ ठसे*]

ले. ५९ फ. ११३३ (?); सु ११२०; मु. जु. २ सवाल २९ — **५९** — श. १६४१ अ. आश्विन शुद्ध २; इ. १७१९ सप्टेंबर ४

[आरंभीं उजव्या अंगास वा. फा. शि.*] सय्यिद मुहम्मदखान फिद्वी मुहम्मदशाह बादशाह गाझी ११३७ [ले. ६१ प्रमाणें शेरा*]

जुबदे अमासिल लायेकुल वल येकसान लखमगोडा देसाई पां हुकेरी सरकार अजमनगर सुभे दारुलजफर विज्यापूर सुा सन ११३३ असरैन मया अलफ दरी विला अं जुबदे अमासिल दिनरात बादशांही कामावरी सरगरम राहून मुल्क सरकारीचें लावनीसचणीवास्ते बाजमियेत खस्त करून मोफसदास बवाके तंबी करून सरकार कामावरी सरगरम राहातां येकीन सरकार कामाचे फिदवी जाणून पेस्तर खिजमतेवरी नजर देऊन मौजे बारवांड अमल तपे सदलगा पाा मजकूर हा गांव कुल बाब कुल कानू जाहगीर व फौजदारी देखील सरकार तर्फेन मोकासा करून दिल्हे अहे तरी अ जुबदे अमासिल अपले पुस्तपुस्त भोगोटा करून घेऊन बादशांही कामावरी रुजू असत जाणे जाणिजे बतारीख २९ माहे शेवाल सन २ जलूस वाला कलमी सूद [फा.*] बैजा

ले. ६० फ. ११३३ (?); सु. ११२० सवाल २९ — **६०** [ले.५९प्रमाणें शि.व शेरा*] — श.१६४१अ.आश्विन शुद्ध२; इ. १७१९ सप्टेंबर ४

तांा मोकदमानी मौजे बारवाड तांा सदलगे पांा हुकेरी सरकार अजमनगर सुभे दारुलजफर विज्यापूर सनं ११३३ सुा। असरैन मया अलफ दरी विला मौजे मजकूर जुबदे आमासिल लखमगौडा देसाई पां मजकूर बादशाही कामावरी रातदिन सरगरम राहून बाजमियेत रयेत बादशाहीचे हरियांत कस्त मेहनत करितो यावास्ते मेहरवान होऊन सरकारतर्फेन जाहगीर व फौजदारी कुल बाब कुल कानू देखील मोकासा करून दिल्हे अहे अं जुबदे अमासिलास रुजू होऊन लावणीसंचणी करून अकार बमोजीब वसूल पोन्हचावीत जाणे हर साला ताजा सनदेचा उजूर न करणे नकल घेऊन असल सनद अं

जुबदे अमासिलासी देणे जाणिजे रा। छ २९ माहे शेवाल सन जुलूस वाला कलमी सूद [फा.*] बैजा

ले. ६१ फ. ११२९; }
सु. जु. १ मोहरम २९ } ६१ { श. १६४१ मार्गशीर्ष शुद्ध १
{ इ. १७१९ डिसेंबर १

[आरंभीं उजव्या अंगास २ वा. फा. शि.*] सय्यिद मुहम्मद फिद्वी मुहम्मद फर्रुखसियर बादशाह गाझी ११२६ ३ [आणि*] हस्बुल मस्तुर बअमल आरंद ∆ [असा शेरा*]

ता। शामजी कृष्ण पटेल मोजे सिरगाऊ बेटद ता। येकसत्रे आमले पा। रायेबाग सरकार मजकूर सुहूर सन ११२९ माळूम नुमायेद दर विला मौजे मजकूर गनिमाचे वगैरे फितरतेकरिता कै मुदती खराब बेचिराख पडल होत गाव. बसात होऊन जमीनही लावणी होइना देखून तुज फर्वाविलेवरून खस्त करून गाव बसात करून जमीन किर्दीही केली आणि हमेशा दिवाण कामावरी रुजुवातीन राहतोस काम कबाकबाना गाव बसाती व जमीन किर्दी होये जे तोटा नादारही (?) जाहालास देखून मेहरवान होऊन पटेलगीचे इनाम पेसजी खेरीज हाली गावानजदीक ०५ पाच विघे बा। धुरग पैकी मला व जमीन विघे ०१५ आज रास मन्हामत करून परवाना सादर केला आहे तुवा लेकराचे लेकरी सदरहू इनाम भोगटा करून खुशाहाल राहाण ये बाबा गाववालेसही सनद सादर केल आहे जाणिजे छ २९ माहे मोहरम जुलूस सन १ [फा.*] बैजा

ले. ६२ [फ ? *] ११३३; जु. ३ }
सफर २ } ६२ { श. १६४३ मार्गशीर्ष शुद्ध ३
{ इ. १७२१ नोव्हेंबर ११

जुब्रतुल अमासिल वल येकरान लायेकुल इनायेत वल येहसान लखमगोडा देसाई नाडगोडा प्रा। हुकेरी व गैरा ब इलतिफत उमेदवार बूदा बिदानद सूर सन ११३३ रा। जुब्रतुल अमासिळ दौलतखोहा व रासखुल येतिकाद हमेशा पादशाई कामावरी बरहसब मेहुद व जाफिशानी मुकसिदासी तंब्री पोहचाऊन अपुले मुजरा करीत अहा व दरी विला पा। हवेली सरकार अजमनगर माहाल जागीर सरकार याच अमल व पादशाही कामाचे बंदोबस्तबदल पा। मजकूरवरी सरकारी स्वारी जाहाली त्यासैमैया तुम्ही अपुले जमावानसी खुद सरकारचे फौजबराबरी गेले तिकडून हारामनिमक व बागियाची फौज येऊन मुकाबला केला तेवखती तुम्ही शर्त रिफाकत व हद सिपाईगरीचे जे होते ते करून जाफिशानी व

सदरहू वतन यास व याचे पुत्रपौत्रादि वौशपरंपरेने चालवीत जाणे या पत्राची प्रती लेहून घेऊन असलपत्र परतोन मारनिलेपासी भोगवटियास देणे जाणिजे छ २९ ज़िल्काद [नि.*] निदेश समक्ष [वा. मो.*] लेखन । सीमा समु । लसती

बार सुरू सुद बार

[कागदाच्या जोडावर मोर्तबाचे २ ठसे*]

ले. ५९ फ. ११२३ (?); सु ११२०; मु. जु. २ सवाल २९ — ५९ — श. १६४१ अ. आश्विन शुद्ध २, इ. १७१९ सप्टेंबर ४

[आरंभीं उजव्या अंगास वा. फा. शि.*] सय्यिद मुहम्मदखान फिद्वी मुहम्मदशाह बादशाह गाझी ११३७ [ले. ६१ प्रमाणें शेरा*]

जुबदे अमासिल लायेकुल वल येकसान लखमगोडा देसाई पां हुकेरी सरकार अजमनगंर सुभे दारुलजफर विज्यापूर सुा सन ११२३ असरैन मया अलफ दरी विला अं जुबदे अमासिल दिनरात बादशांही कामावंरी सरगरम राहून मुळूक सरकारीचे लावनी-सचणीवास्ते बाजमियेत खस्त करून मोफसदास बवाके तबी करून सरकार कामावरी सरगरम राहातां येकीन सरकार कामाचे फिदवी जाणून पेस्तर खिजमतेवरी नजर देऊन मौजे बारवांड अमल तपे सदलगा पाा मजकूर हा गांव कुल बाब कुल कानू जाहगीर व फौजदारी देखील सरकार तर्फेन मोकासा करून दिल्हे अहे तरी अ जुबदे अमासिल अपले पुस्तपुस्त भोगोटा करून घेऊन बादशांही कामावंरी रुजू असत जाणे जाणिजे. बतारीख २९ माहे शेवाल सन २ जलूस वाला कलमी सूद [फा.*] बैजा

ले. ६० फ. ११२३ (?); सु. ११२० सवाल २९ — ६० [ले.५९प्रमाणें शि.व शेरा*] — श.१६४१अ.आश्विन शुद्ध२, इ. १७१९ सप्टेंबर ४

ताा मोकदमानी मौजे बारवाड ताा सदलगे पां हुकेरी सरकार अजमनगर सुभे दारुलजफर विज्यापूर सनं ११३३ सु॥ असरैन मया अलफ दरी विला मौजे मजकूर जुबदे आमासिल लखमगौडा देसाई पां मजकूर बादशाही कामावरी रातदिन सरगरम राहून बाजमियेत रयेत बादशाहीचे हरियांत कस्त मेहनत करितो यावास्ते मेहरवान होऊन सरकारतर्फेन जाहगीर व फौजदारी कुल बाब कुल कानू देखील मोकासा करून दिल्हे अहे अं जुबदे अमासिलास रुजू होऊन लावणीसंचणी करून अकार बमोजीब वसूल पोव्हचावीत जाणे हर साला ताजा सनदेचा उजूर न करणे नकल घेऊन असल सनद अं

जुबदे अमासिलासी देणे जाणिजे रा। छ २९ माहे शेवाल सन जुलूस वाला कलमी सूद [फा.*] बैजा

ले. ६१ फ. ११२९; मु. जु. १ मोहरम २९ } ६१ { श. १६४१ मार्गशीर्ष शुद्ध १ इ. १७१९ डिसेंबर १

[आरंभीं उजव्या अंगास २ वा. फा. शि.*] सय्यिद मुहम्मद फिद्वी मुहम्मद फर्रुखसियर बादशाह गाझी ११२६ ३ [आणि*] हस्बुल मस्तुर बअमल आरंद ८ [असा शेरा*]

ता। शामजी कृस्ण पटेल मोजे सिरगाऊ बेदद ता। ये कसबे आमले पा। रायेबाग सरकार मजकूर सुहूर सन ११२९ मालूम नुमायेद दर विला मौजे मजकूर गनिमाचे वगैरे फितरतेकरिता कै मुदती खराब बेचिराख पडल होत गाव बसात होऊन जमीनही लावणी होईना देखून तुज फर्वाविलेवरून खस्त करून गाव बसात करून जमीन किर्दीही केली आणि हमेशा दिवाण कामावरी रुजुवातीन राहतोस काम कबाकबाना गाव बसाती व जमीन किर्दी होये जे तोटा नादारही (?) जाहालास देखून मेहरवान होऊन पटेलगीचे इनाम पेसजी खेरीज हाली गावानजदीक ०५ पाच बिघे बा।। धुरग पैकी मला व जमीन बिघे ०१५ आज रास मऱ्हामत करून परवाना सादर केला आहे तुवा लेकराचे लेकरी सदरहू इनाम भोगटा करून खुशाहाल राहाण ये बाबा गाववालेसही सनद सादर केल आहे जाणिजे छ २९ माहे मोहरम जुलूस सन १ [फा.*] बैजा

ले. ६२ [फ ? *] ११३३; जु. ३ सफर २ } ६२ { श. १६४३ मार्गशीर्ष शुद्ध ३ इ. १७२१ नोव्हेंबर ११

जुब्रतुल अमासिल वल येकरान लायेकुल इनायेत वल येहसान लखमगोडा देसाई व नाडगोडा प्रा। हुकेरी व गैरा ब इलतिफत उमेदवार बूदा बिदानद सूर सन ११३३ आ। जुब्रतुल अमासिल दौलतखोहा व रासखुल येतिकाद हमेशा पादशाई कामावरी बरहसब त्रदुद व जाफिशानी मुकसिदासी तंबी पोहचाऊन अपुले मुजरा करीत अहा व दरी विला पा। हवेली सरकार अजमनगर माहाल जागीर सरकार याच अमल व पादशाही कामाचे बंदोबस्तबदल पा। मजकूरवरी सरकारी स्वारी जाहाली त्यासैमैया तुम्ही अपुले जमावानसी खुद सरकारचे फौजबराबरी गेले तिकडून हारामनिमक व बागियाची फौज येऊन मुकाबला केला तेवखती तुम्ही शर्त रिफाकत व हद सिपाईगरीचे जे होते ते करून जाफिशानी व

त्रदूद केले व गनिमासी सिकस्त दिल्हे तुमचे कितियेक स्वोर अशराफ व घोडे व पेयादे (कार अमदनी) कामासी आले याकरितां लोकाचे नानपरवेसीबदल

मौजे गडहिंगलेज अमले   मौजे कारदगा अमले

ताा सालापूर १   ताा सदलगा १

ये दोनी गाव तुम्हासी इनाम मरहमत केले असे तरी हे दोनी गावचे हासील व माहासूल साल बसाल पिडी दर पिडी अपुले सरफमाश करून पादशाई कामावरी सरगरम राहणे तेरीख छ २ माहे सफर सन ३ जुलूस वाला [फा.*] बैजा

ले. ६३ सु ११२९; मु. जु. १० जिल्काद २२ } ६३ [वा. फा. शि. व मज.]* { श. १६५० ज्येष्ठ वद्य ९ इ. १७२८ जून २०

ताा मोकदमानी व रयानी व मुजेरियानी मौजे येहूर अमल तपे जुग्ल पाा हुकेरी सरकार अजमनगर सुभे दारुलजफर विज्यापूर सूर सन ११ [मो. जा.*] तिसा असरैन मयेत अलफ दरीं विला जुबदे अमासिल वल येकरा लायेकुल येहसान इनामत लखमगोडा वलद बस्वप्रभू देसाई नाडगोडा पाा मोा सरदेसाई माहालानिहाये नाडगोडा मामले मुर्तजाबाद यानी दिनरात बादशाही कामावरी रुजुवात राहून पाा मोा लावणी-सचणी अबादानी करून यैन देसही सरगरम राहात अहे पेसजी बफैज इजानेबाच हमराह फैल होऊन नवाब अबदुलकरीमखान व अबदुलगफारखानजीच लडाईमधे शेर्तनामा खस्त मेह [न*] त करून मुजरा करून घेतल बेलगावीच लडाईमधेही लडाई करून घोड अदमी सिपाई लोकाच पडोन तगादा पडिल बादशाई कामाचा पाहून मौजे मजकूर पेसजी पटी व हाली पटी देखील कुल बाब कुल कानू इनाम दिल्हे अहे जुबदे अमासिलाच रुजुवातीन राहून लावणीसंचणी करून अकार होईल त्याप्रमाणे पोहचावीत जाणे हर साला ताजा सनदेचे उजूर न करिता हे सनद परतून दीजे बतारीख २२ माहे जिल्काद सन १० जुलूस वाला [फा.*] बैजा

ले. ६४ मु. जु. १०; सु. ११२९ जिल्काद २२ } ६४ { श. १६५० जेष्ठ वद्य ९ इ. १७२८ जून २०

[ले. ६३ प्रमाणें शि. व निराळा मजकूर*]

जुबदे अमासिल वल येकरान लायेकुल वल येसान लखमगोडा वलद बस्वप्रभू देसाई नाडगोडा पाा हुकेरी सरदेसाई माहालानिहाये नाडगोडा मामले मुर्तजाबाद माळूम

जुमायेद सूर सन }सन{ ११ [मो. जा.*] तिसा असरैन मयेत अलफ दरी विला जुबदे अमासिल पाछाई कामावरी दिनरात रुजुवात राहाता ईजानेब अमारतपन्हा अबदुल-करीमखानकडे गेला असता तुम्ही व जमेयेत हमरा येऊन लडाईमधे शेर्त केले येसच अजमनगरीच लडाईच वख्ती लडाई केल घोडे सिपाई भले अदमी पडिल यावास्ते मेहेर-वानगी होऊन मौजे येडूर अमल तपे जुगल पा। मो हा गाव बिलकुल जुबदे अमासिलासी अज राहा मराहामत इनाम करून दिल्हे असे तरी लावणीसंचणी करून तुम्ही वसूलच पुस्त दर पुस्त खाऊन साहेब कामावरी सरगरम राहाण बतारीख २२ माहे जिल्काद सन १० जुलूस वाला [फा.*] बैजा

ले.६५ मु. जु. १०; सु. ११२८ (९) ? रवल १ } ६५ { श. १६५० आश्विन शुद्ध २ इ. १७२८ सप्टेंबर २४

[आरंभीं उजव्या अंगास ले. ५९ प्रमाणें शि.*] हस्बुल मस्तूर कौल शनासंद ᪅ [असा शेरा*]

जुबदतुल अमासिल वल येकरान लायेकुल इनायेत वल येहेसान लखमगोडा देसाई व नाडगोडा पा। हुकरी सूर सन समान असरीन मया अलफ दरी विला साल हालच जमा-बंदीवास्ते फर्माविले असतां तुम्ही माहालीचे हकीकत जाहीर केले की पा। मजकुरी दुसाला मेहूबूदी नाही नापिकीमुळे दुकालाचे पाई कुल रयेत व मुजारेयानी उठून गले किती येक मरून गेले त्याहीवरी माहगाईचे बीज पेरले अस्तां येक दण खरीफ जाहाले नाही जुजवी कोठे कोठे जोरी जाहाली त्यासी उदाजी चवाण व राणोजी घोरपडे व माहमद दिलेलखान किलेदार मिर्ज यैसे चरीपाच हजार फौजसहित पा। मजकुरी राहून गावच गाव लुटून फना केले त्यावरी श्रीपतराऊ व सिदोजी थोरात यैसे येऊन सावगावत्रफेसी लुटून सफा केले हाल कोणे गोस्टीचे नाही मुलूख बेचिराख पडले अहे साहेबी मेहेरवान होऊन जीवनमाफीक जमाबंदी चुकाऊन कौल सादर केलेयाने उगवणी साल हालीचे व पेस्तर सालचे सचणी करूं बराये अर्ज खातिरेसी आणतां हाल कोणी गोस्टी राहिले नाही याकरिता जागीरदारी व फौजदारी व कुल बाब कुल कानू देखील रु॥ २५०१८ अडीच हजारवरी चुकविले अहे वसूल देऊन पेस्तर सालीचे लावणे करणे दरी बाब कौल असे तेरीख छ १ माहे रबिलौवल सन १० जुलूस वाला [फा.*] बैजा

ले. ६६ सु. ११५२ } ६६ { श. १६७३ फाल्गुन वद्य १
रखर १४ } श्री { इ. १७५२ फेब्रुवारी १९

श्रीमंत माहाराज मातुश्री [मो. जा.*] आईसाहेब याणी मोकदमानी मौजे सिरगोपी कर्यात म्हैसाल प्रा। मिरज सु॥ इसने खमसैन मया अलफ राजश्री. बसप्रभू वलद लखमगौंडा देसाई व नाडगौंडा पा। हुकेरी व सरदेसाई माहालानिहाये व नाडगौंडा पा। मिरज याणी विनंति केली जे मौजे मार आपणास पा। मजकूरचे नाडगौंडीचे वतनास इनाम गांव आहे येविसी चिरंजीव कैलासवासी राजश्रीची पत्रें आहेत तेणेंप्रा साहेबीं भोगवटीयास पत्रे देऊन चालवावे म्हणोन निवेदन केलें त्याजवरून मौजे मार पूर्ववतप्रा इनाम करार करून दिल्हा असे तर यासि रुजू होऊन यांस व यांचे पुत्रपौत्रादि वौंशपरंपरेने चालवणे [नि.*] जाणिजे छ १४ राकर [नि.*] लेखनावधी [वा. मो.*] लेखन । शुध [पाठीवर नि*] बार

ले. ६७ सु. ११५२ } ६७ { श. १६७३ फाल्गुन वद्य १
रखर १४ } श्री { इ. १७५२ फेब्रुवारी १९

श्रीमंत माहाराज मातुश्री [मो. जा.*] आईसाहेब याणी राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान भावी प्रा। मिरज यांसि आज्ञा केली येसी जे प्रा। मारची नाडगौडीचे वतन चिंतो चिमणाजी यांचे पुरातन मोगलाईकडून राजश्री बसप्रभु देसाई पा। हुकेरी यांजकडे दिल्हें होतें आलीकडे चिरंजीव राजश्री शाहूराजे कैलासवासीं याणी मिरज घेतली तेव्हां हुजूर ठेविलें त्यास रा। येमाजी रुद्र याणी हुजूर येऊन येकनिस्ठेने सेवा केली त्याजवर कृपाळू होऊन नाडगौडीचे वतन रा। बसप्रभू वलद लखमगौडा यांजकडे बावीस कर्याती प्रा। मार करार करून दिल्हें आसे गांवगना नाडगौडीचे इनाम व हकरुसूम व इनाम गांव कानूकायदे बा। जमीदार देविले त्याप्रा साहेबीं नाडगौडीचे वतन देविलें आसे तर चालवणें [नि.*] जाणिजे छ १४ राखर सु॥ इसने खमसैन मया अलफ [नि.*] बहुत काये लिहिणे [वा.*] लेखन शुध [नि.*] बार

ले. ६८ रखर १६ } ६८ { श.
श्री { इ.

नकल परवाना बमोहर नवाब नारोजी राघोजी

देसाई परगणे हुकेरी बिदानंद तहवर व जलादतपनाह [मो. जा.*] रसद गला

जो तुम्हापासि तलब करितील तो सितार्चीने सरबराह करून परगने मजकुरीहून विला-उजूर पाठवीत जाणे व जे फर्मावितील व पातशाही काम सागतील त्यासि उजूर न करणे व तुमचे बाबे माइले जे बरे लिहितील त्याचा नतीजा बरा जाणने जे वाईट लिहितील त्याचा नतीजा वाईट होईल ये बाबे ताकीद बहूत जाणने [पाठीवर*] तेरीख १६ राखर

ले. ६९ } पौ रखर २५ } ६९ श्रीशंकर { श. इ.

तीर्थस्वरूप राजेश्री धोंडोपंत बाबा स्वामीचे सेवेस

श्रीचरणरजे नरसो गुरो साष्टाग नमस्कार विनति उपरी स्वामीने पत्र पाठविले त्यावरून कलो आले मद माहाराजसाहेबास पावते केले शाहाबंदराकडील वर्तमानही सांगितले यास उतर दिल्हे जे कबिला थोडकेनसी आहे आम्ही उपराला देऊ यामधेच याचे कृत्य करावे यैसेयास याचे परियाये त्वरेने केला पाहिजे वडीलाप्रति विशेश लिहिणे नलगे आणि भंडारीविखी आग्ना लिहिले यावरून भेटीस होन २८० दोनी करून सोडविले त्यांचे गुरे व सेली आणवीत होते स्वामीचे पत्रावरून तौखूप करिविले विदित होये जाणिजे हे विनति

[नि.*] पौ छ २५ रबिलाखर देसा

ले ७० } पौ रखर २९ } ७० श्री { श. इ.

राजश्री अलगोडा देसाई पाा हुकेरी

स्नहेकीत नागोजी तुकदेव सभासद सेवक राजमडल अश्रीवाद विनति उपरी रा रायाजीपंत सेवेसी पाठविले असेती मुखवचने किती येक वर्तमान सांगतील त्यावरून कलो येईल राजेश्री [मो. जा. *] राऊयानी तुम्हास लिहिले असे तेही पत्र पाठविले असे त्यावरून कलो येईल त्यासारिखें प्रतिउतर पाठविजे त्यावरून जो विवक करणे तो करून अणाजीपंतही अपले सेवेसी विनति करितील त्यावरून कलो येईल विशंश काये लिहिणे हर येक गोस्टीचा अभिमान आम्हास व राऊ स्वामीस अहे ते वर्तमान उभयेता सागता कलल गोसावियाचे मनी असेल तरी हे उभयेता सागतील तैसे प्रतिउतर पाठविजे त्यासारिखे अवघेच अभीस्ट होईल बहूत काये लिहिणे [नि*] हे विनति

पौ छ २९ माहे रबिलाखर

ले. ७१ } पौ. रखर २९ }

७१
श्रीवेंकटेशप्रसन्न

{श. {इ.

राम राम

राजाधिराजमान्ये राजश्री आलगौंडा देसाई पा हुकेरी गोसावी यासी

·ाा दे श्रीमतु सौजेन्ये [मो. जा.*] श्नेहांकित वेकटराऊ व देवजी जाधवराऊ कृतानेक विनति उपरी येथील क्षेम जाणौन तुम्ही अपले वैभव लिहीत गेले पाहिजे याउपरी स्वामीचे निरोप घेऊन श्वार जाहालो ते गावावाटे जात होतो मागुती तजवीज करून अंदाज केला जे देसाइयासी शरत केली अहे जे रा सटऊजी तुम्ही जाणते अहा लस्कर कुल सगराकडे जात होते तूमचे अभिमानाकारणे कुल लस्कर फिराऊन अणिले अहे रा देसाइयाची भीड रा सताजी घोरपडे सैनापतीस व माहाराज राजेश्री [मो. जा.*] पंतास सर्वास आहे इत्यादिक अहोत तरी कार्यवादी आहेत रा देसाई माहाक्रियावंत आहेत तुम्ही कोणे गोस्टीचे अनमान न धरिता भेटी घेणे नाही तरी लस्कर लांब जाईल मग आटोपेनासारिखे होईल

पा छ २९ रबिलाखर

ले. ७२ जवल १ }

७२
श्री

{श. {इ.

राजश्री अलगौडा देसाई हस हजारी गोसावी यासि

दे अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्य [मो. जा.*] श्नेहांकित कृष्णाजी मोहिते हवालदार व कारकून किले समानगड रामराम विनति येथील क्षेम जाणऊन श्वकीयें क्षेम साकल्य लिहिती अज्ञा केली पाहिजे विशेश बहूत दिवस जाहले परंतु कागदपत्री परामर्श घेतला नहवता याउपरी सांप्रत पत्र पाठविले उतम समई पावोन आदरें परिसोन चितव्रती समाधान जाहाली याउपरी लिहिले कीं राजश्री रामोजी घोरपडे पंचसहश्री व रा सिदोजी इगवले आपणाकडे आले होतें त्यांचें आपले दर्शन जाहाले कितीक बोलणें चालणे जाहाले तो प्रसंग सविस्तर उभयेतांनी लिहिलें आहे त्यावरून कलो येईल म्हणऊन लिहिलें व उभयेतांही कितीक तुमी या राज्यासीं येकनिस्ठतेचा प्रसंग धरिला म्हणऊन लिहिलें तरी हे गोस्ट बहुतची उतम जाहाली तुमी पूर्वीपासून माहाराज साहेबांचे नावांजीस त्याहीवरी सेवाप्रसंग सनिधान केवल इछून बहुतची येकनिस्ठता दाखविली आधीच सोनें त्यावरी सुगंध यैसा प्रसंग जाहाला त्याहून उतम तें काये आहे आम्हासही ये गोस्टीचे बहूत समाधान वाटले स्वारी करून किलांसमीप आलियां साह्यता करावी जाणिजे

उभयेपक्षीं इतरता न पाहावी म्हणऊन तरी हा जागाही आपळाच आहे कोणेविसी अंतर पडणार नाही आणि किलाचे तनखे कर्याती कर्यातीवरी यैवज आहेत त्यास मुतालिकां-कडून ताकीद रोखे लिहिले आहेत कोठे कोठे काये असतील ते उसूल करून घेतले पाहिजे म्हणऊन तरी त्याविसी मागून पत्र लिहून तपसीलवार यैवजाचें जेथें जेथे आहे ते लिहून पाठऊन देऊ तेणेप्रमाणे वजा करून देऊन किलास यैवज पावणे हें गोसावियांस अगत्य आहे विशेश लिहिणें न लगे कृपा असों दिली पाहिजे रा। छ १ जमादिलौवल हे विनति [ष. बा. मो. व समासामधें पाठीवर अष्ट. बा. शि.*] पौ छ ४ जमादिलौवल

ले. ७३ } ७३ { श.

श्रीशंकर { उ.

सकलगुणपरिपूर्ण अखंडितलक्ष्मी प्रसंन परउपकारमूर्ती राजमान्य राजेश्री अलगोंडा देसाई स्वामीचे सेवेसी

स्नेहेंकित नरसो सुरो शर्णशर्णार्थी विनती उपरी रो अणाजीपंत गेलेवरी कांही समाचार आलेची नाही कितियेक प्रसंग माहाराज साहेब सांगितले होते परंतु कांही कार्येभागाचे सुरत दिसत नाही म्हणऊन लिहिले आहे तियांवरून विदित होईल दोनी दिवसा फौजा येतील मग होणार भविश होईलेच अगोधर कार्येभाग होईल (?) त्यावरून स्वामीचे नामोष वाढवावे म्हणऊन माहाराज साहेबाचे पूर्ण वासना आहे यैसेयास स्वामी सर्वज्ञ असा विस्तार लिहिणे लागत नाही रा। धोंडोपंत स्वामीजवली यादीबंद लिहून दिल्हे असे आडीनोडी वरकड जिनस व भाजी यैसे पाठवाव्या निरोपिले पाहिजे आणि रो। अणा येथें आलेवरी कोटात येक घोडा पाहाव्या कारणे आले असता माहाराज साहेबाचे दर्शण जाहले बहूत स्नेहेकरून सेवेस राहाविले दौलतवंदाचे गोस्टी मोडिता नये स्वामीचेंच स्थापित होऊन ४ दिवस राहिले आहेती विदित होये चिकल-दिनीकाराचे अनसुंधान होईल तरी येक घडी लागत नाहीं काकतीकार व चिकलदिनी-कार कांही मदत पैसे दिल्हे म्हणऊन आइकतो हे वर्तमान त्यांचे विस्तार वर्तमान लिहून पाठविले पाहिजे व जोंधले अगत्य पाहिजे पैके पाठऊन देऊ तेथील ८ खंडीचे निर्ख लिहून पाठवणे व येथे हुकेरो निशानी प्रो। होन करिविले असे स्वामीचे स्थली व हुकेरीस चाले सारिखे ताकीद करवणे टंकसाल घातले आहे सुत होये हे विनती

[आरंभीं डाव्या बाजूस समासांत*] वरकड वर्तमान रो। अणा विनति करिता विदित होईल हे विनति व पवित्रगडाचे वर्तमानही लिहून पाठविने हे मोर [तब*]

ले. ७४ } ७४ हु { श. इ.

इलाही

देसाई अजम अलगौडा देसाई पाा हुकेरी दाम मोहबतहू

ई सुज्याअत व शाहमतपनाः शौकतदस्तगाः अजी दिल येखलास दावलखान राजगुरू सलाम बादज सलाम मोहबत अज्याम नेकी बनजर [मो. जा.*] जाणौन खुसीसलामत कलमे इशारा फर्मावणे महूवल मुराद ऊकी मोहिवी किताबती बहुता रोजी पाठविली ते नेक सात पैचून दिल ताजा जाहाला कितेक मकसूद लिहिला माळूम जाहाला काा नेसरी विलायेतीस आजार नव्हे सारीखे कागद करून पाठवणे म्हणऊन लिहिले व दलवी अजम यास किताबती लिहिले वरून तमाम मकसूद अया जाहाले त्यावरून दलवी अजम याही मोहिबास जवाब कागदाचा लिहिला आहे त्यावरून माळूम होईल हरवख्त खुसी शादमानी लिहून मोहबत जियादा करीत गेले पाहिजे प्यार मामूर राखणे दराज लिहिणे लागत नाही [नि*] हे किताबती [पाठीवर*] हे किताबती

ले, ७५ } ७५ श्रीशंकर { श. इ.

पुरवणी राजश्री आऊगौडा देसाई गोसावी यास

उपरी अम्हीं या प्रांतें आलियावरी तुम्हाकडील वर्तमान कांही कलले नाही सांप्रत माा सिदणा अम्हापासिं येऊन कितीयेक वर्तमान श्रुत केलें असियास अमचा जो मामला आहे तो केवल तुमचाच आहे वतन जें आहे तें अमचे अहे यामध्यें कांही विनाभावनाही हें मऱ्हाष्ट राज्य जे आहे ते तुम्हा लोकाचे आहे तुम्हीं लोकीं हर भात राज्याची आनकूलता आंतःकरण पुरसरकरावी येणेच करून तुम्हा लोकाचे उतरोतर उर्जित आहे तुम्ही हे गोस्टी करीतच आहा तेथे लेहाचे हा भाव कांही नाही कितेक वर्तमान माा सिदणा मुखवचने सांगतां कळों येईल बहूत काये लिहिणे [ले. ७१ प्रमाणें मो.*]

ले. ७६ } ७६ श्रीराम { श. इ.

श्रीमत राजेश्री [मो. जा.*] पंतस्वामीचे सेवेसी

विनति सेवेसी सिवगोडा पटेल मौजे भोज दोनी कर कमल जोडून दडायेमान विनति विज्ञापना येसी जे राजेश्री अंणाजीपंतास कुडुनूरासी पाठविले त्यास कुडुनूरकर व राजेश्री देवराळ ब्रिरजे व गगाजी जाधव पदाजी मदने व बिरबल व बिरापा ना। हुसैन-खान जमातदार हे थला विश्माने स्वामीपासी तहनामा केला होता त्याप्रमाणे हे धनी } धनी { जाहाले होऊन गावास घेऊन अले स्वामीचे प्रतापे करून अलो त्यास अपला वतनाचा अभिमान स्वामीस पूर्ण अहे सेवेसी श्रुत होये विज्ञापना

ले. ७७ } ७७ श्री { श. इ.

महामेरुराये राजमान्य राजेश्री अलगौडा देसाई परगणे हुकेरी गोसावी यास

दें स्नेहपूर्वक रामाजी तुकदेव आशीर्वाद उपरी तुम्ही पत्र पाठविले पावोन वर्तमान विदित जाहाले बहूत उपचारवृति अत्माभिमानविसी लिहिले तरी हे मोगल दरबार वृत्ति-वंताचे हित आहे पूर्वी पैस होवेचेच मुश्कील तुमचे क्रियासुध होता म्हणौन या दरबारी तुमचे पैस येमणाने पाडिले तुमचे नावरूप जाहाले यैसे समई तुम्ही कोणा गोस्टीचे उजूर न पाहता अपुले नामोश करून घेवे तरीच वृत्ती राहतो कबूर काही जात नव्हता परतु न आले पाहून हजरत [मो. जा.*] दिवान साहेब बहूत रागास येऊन देसगत अमानत करवीत होते त्या समई अम्ही तुमचेविसी त्यासाघाते रदबदल करून समाधान केले त सविस्तर येमणा लिहिलेवरून कलो येईल या दरबारी येक वेळे कमी पडिलियावरी मग हर येक तजवीज सिडी चडत नाही कमी पडिली म्हणौन येमणानें अपुले जिवानसी उधार होऊन पडीच यावा या समई राखिले आता मागुती तुम्हासी हजरती [मो. जा.*] साहेबी खुर्दखत लिहिले आहेती यैसेयास हाजार गोस्टीस येक गोस्टी की अधी पत्रदरुषणे त्याचे काबिजाती उठऊन याची काबिजाती बैसवणे झाकली मुठी सवा लाख तुमचे गला काये निमित्ये पडिते तुम्ही लिहिले व येमणाचे रदबदलवरून गला पडिले अता चुकाविता कामा नये यावरी तुम्ही सर्व विवेकी असा वरकड वर्तमान येमणा लिहिले आहे त्यावरून कलेल फडी अम्ही असो मणाल तरी आजीकाली ईश्वर सतेने सर्व गोस्टी अनकूल जाहाली अहे यामधे तुम्ही अपले मोखतसर माणूस फडास पाठऊन येमणा लिहिलेप्रमाणे वर्तणूक करणे [नि*] असीर्वाद

ले. ७८ } ७८ { श.
श्री { इ.

अखडितलक्षुमी अलकृत राजमान्या राजेश्री अलगोडा देसाई गो

स्न्हेकित त्रिंमराऊ बाा निा तुबाजी बहिरव अशीवाद उपरी आम्ही हजरत नवाब जवली अम्ही असतो तुम्हासी परवाना पाठविले आहे तरी तुम्ही अपुले वर्तमान लिहून पाठविने आम्ही तुमचे चाकरी करून दाखऊ तुम्ही अहविसी गहो करिता पण अम्ही तुमचे ठाई निस्टा धरिले अहे अतां जे सेवा असल ते अम्हासी फर्माविने गही न कीजे रा तुबाजी बहिरव अहे बहूत साभाल करीत जाणे अम्ही तुमचे असो कृपा असोन दीजे येक दोनीं वेल पत्र आम्ही तुम्हासी लिहिले पण उतर अले नाही जाणिजे हे अशीवाद शाहमहमद तुमचे तारीफ केले अहे नवाबसाहेब कुशल अहे हे हूजराती अहे याचे तारतीम करणे मातबू (मोरतबू)

---

२ जयपूर-हिंदी पत्रें

[कै. सर जदुनाथ सरकार यांस इ. १९३९ मध्यें जयपूरच्या दप्तरखान्यांत मिळालेल्या कित्येक डिंगल बोली पत्रांचे इंग्रजी सारांश त्यांनीं आपल्या 'हाउस ऑफ शिवाजी' या लेखसंग्रहांत प्रकाशित केले आहेत. तीं पत्रें शिवाजी महाराजांच्या आग्रावारीची माहिती देण्याचे दृष्टीनें अतिशय उपयुक्त असल्यानें त्यांच्या पाठांच्या नकला मिळविण्याचा श. १८७६ (इ. १९५४) मध्यें मी प्रयत्न केला. फलतः मला श. १५८७ वैशाख वद्य १४ (इ. १६६५ मे ३, ४) ते श. १५८८ भाद्रपद शुद्ध १५ (इ. १६६६ सप्टेंबर ३) या काळांतील सहा पत्रांच्या नकला मिळाल्या. आतां तो दप्तरखाना सर्वांस खुला झाला आहे. मात्र तो बिकानेरला गेला आहे. यांतील फक्त श. १५८८ भाद्रपद शु. ७ (इ. १६६६ ऑगस्ट २६) या काळचें पत्र – ज्यांत शिवाजीच्या पलायनाची पहिल्या प्रथम बातमी दिली आहे – प्रो. सरकार यांस कसें मिळालें नाहीं याचें आश्चर्य वाटतें. कां तें त्यांनीं दिलेल्या आग्रावारीच्या हकीकतीच्या विरुद्ध जात असल्यानें न सांपडल्याचा बहाणा केला आहे ? कांहीं असो त्यांनीं सार न दिलेलें असें एक पत्र या संग्रहांत आहे येवढें खरें. हा दप्तरखाना तपासला तर मराठी इतिहासाभ्यासास उपयुक्त शेंकडों फार्सी, डिंगल व मराठी पत्रें उपलब्ध होतील. नव्हे कै. सरकार, राजकुमार रघुवीरसिंह इत्यादि परप्रांतीयांनीं स्वप्रयत्नानें उपलब्ध करून घेऊन प्रसंगवशात् त्यांचा उपयोगही केला आहे. पण आम्हा महाराष्ट्रीयांपैकीं कोणीही येवढी झेप घेण्याचा प्रयत्नही अद्याप केला नाहीं याची खंत वाटते. मी स्वतः

श्री. न. वि. उपाख्य काकासो गाडगीळ यांच्या मध्यस्थीनें जयपूरचें दप्तर तपासण्याची परवानगी एकदां मिळविली होती पण मी तिचा लाभ घेऊं शकलों नाहीं.

महाराष्ट्रांत नागरी लिपींत व मराठीतर भाषांत लिहिलेले कागदपत्र मोठ्या प्रमाणांत मिळाले नसल्यानें ते छापण्याविषयीं निश्चित पद्धति अद्याप विकसित झालेली नाहीं. म्हणून येथें पत्रांचा पाठ मजकडे आला तसाच दिला आहे. कानामात्रा-ऱ्हस्वदीर्घ यांत कोणताच फरक केलेला नाहीं. विभक्ति प्रत्यय मात्र मराठी लेखनपद्धतीप्रमाणें मूळ शब्दास जोडून लिहिले आहेत.*]

ले. १ सं. १७२२ ज्येष्ठ वद्य १४	७९ ॥ श्रीरामजी ॥	श. १५८७ वैशाख वद्य १४ इ. १६६५ मे ३,४

॥ सिधि श्रीसरववोपमांजोगी संगहीजी श्रीकल्याणदासजी जोगी लिषतं डूंगरसी सीहमल जींवराजकेनी जुहार औधारीजौ जी अैठाका समाचार भला छै राजीका सदा भला घडोघडीका आरोग्य चाहीजे जी अपरं ची राजीको कागज ईनाईत नं हुवो सो कोणवासतै जी कागज समाचार यादी करी देवो कीजौ जी अरजदासत भेजी थी सो मालूम हुई तीका जवावको प्रवानौ ईनाईत हुवौ छै सारा समाचार पावोला जी ओर राजी ता. २४ मा. रमजान सन १०७५ गढ पुन्यधर वा रुद्रमाल लागा था ता. ९ सवाल गड रुद्रमाल फते हुवौ पुनांधरकी वुरज तोवाका गोलास्यो सीकसत हुई छै पणी गेलो वडो नं हुवो छै तीथे ओजौ तोवकारी होती छै जी श्रीप्रमेसुरजी कीयो तो वेगीही फते होसी जी ओर स्मांचार होसै सो पाछाथे लिषांला जी प्रगनांको काम भलिभांती पोहची कीजौ जी अैठा सारु कांम होई सो लिषवो कीजौ जी मीती जेठ वदी १४ संवत १७२२ मुकाम पुनाधर

[आरंभीं डाव्या बाजूच्या समासांत*] सा. गेगराज वा ठा. केसोराईथे राम राम [पाठीवर*] ॥ ७४ ॥ संगहीजी श्रीकला

ले. २ सं. १७२२ श्रावण वद्य १०	८० श्रीरामजी	श. १५८७ अ. श्रावण वद्य १० इ. १६६५ जुलै २७

सिधिश्री संगहीजी श्रीकल्येणदासजी जोग्यि लिषतं राजीश्री महासंघजीकेनी रामराम वंच्यीजौह जी अैठाका स्मांचार भला छै राजीका सदा भला चाहीजेह जी अप्र ची कागल राजीकौ आयौ स्मांचार जाणा और राजी लीषौ छौ जु श्रीजीकी फतेह हुई पुनाधरगढ

आणि हंबीरराव मोहिते यांमध्यें मिरज व पन्हाळा किंवा अधिक अचूक बोलावयाचें तर कोल्हापूर व पन्हाळा यांच्या दरम्यान झालेला बरा मुकाबला त्या वर्षाच्या वैशाख ते मार्गशीर्ष (मे ते नोव्हेंबर) यांच्या दरम्यान झाला असला पाहिजे. यावेळीं बेळगांवचा किल्लेदार मुरादखान होता. श. १६०५ (इ. १६८३) च्या एका पत्रांत (शिचसा २।३७) गोपाळराव निा राजेसाहेब असा निर्देश आहे. तो व या पत्रांतील गोपाळराव एकच असतील कां ? रूपाजी भोसले व संताजी जगथाप हे दोन मराठे सरदार या समयाच्या आगेमागें कर्नाटकांत वावरत होते याविषयीं शंकाच नाहीं (शिचसा ६।१००; शिचवृसं १।६६; राजारामचरितम् ४।५१, ५२,५६,६१,६२,६६-६९ इ.). पण या पत्रांतील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा औरंगजेब दक्षिणेंत आल्यानंतर शिवशाही, आदिलशाही व कुत्बशाही यांचे परस्पर संबंध कसे होते यावर पडणारा प्रकाश हा होय. औरंगजेबाचें संकट तिघांच्या मुळावर आलें होतें हें दिसतांच तिन्ही शाह्या एकमेकांस साह्य करूं लागल्या होत्या हें प्रस्तुत पत्र व जेधे शकावली (शिचप्र ३३) यांवरून चांगलें ध्यानांत येतें. हें पत्र वाचलें म्हणजे शिवाजी महाराजांच्या तालमींत तयार झालेल्या लोकांचा आत्मविश्वास कोणत्या इयत्तेचा होता हेंही चांगलें समजतें. आदिलशाही व कुत्बशाही बुडाल्यावर मराठे व मुघल असे दोनच प्रतिस्पर्धी दक्षिणेंत उरले. प्रत्येक पक्ष वतनदार देसायांना आपल्या पक्षांत ओढण्याचा सतत प्रयत्न करीत होता हें या खंडांत व इतरत्र छापलेल्या शेकडों पत्रांवरून चांगलें स्पष्ट होतें.

१०

या खंडांत ले. २, ५, १०–१२, १४, १५, १७–२०, २३ व ९० अशा तेरा पत्रांत रहीमदादखान या मुख्यतः एकाच व्यक्तीच्या हालचालींचा निर्देश आला आहे. यांतील शेवटचें निपाणी–देसायांकडील व उरलेलीं नेर्ली–इनामदारांकडील आहेत. इनामदारांच्या फार्सी पत्रांपैकीं क्र. ५२ च्या पत्रांत याचा उल्लेख आहे. या पत्रांच्या वाचनानें माझी या मनुष्याविषयीं कल्पना झाली आहे ती अशी:—हा मूलतः आदिलशाही जमान्यांत पातशाहपुराचा (पाच्छापूर, बेळगांव) मोकासदार किंवा जागीरदार होता (९०). आदिलशाही बुडाल्यावर हा स्वाभाविकपणें मुघलांकडे गेला. मुघली अधिकारी आरंभीं यास खान म्हणण्यासही तयार नव्हते व तोही स्वतःस चाचपडतच खान म्हणवी. पण त्यास, त्यानें तीन महिन्यांत बादशाही सनद आणून द्यावी अशा अटीवर, हुकेरी परगण्यांतील व दुसरीकडच्या मिळून सहा कर्याती आणि इस्लामगड अथवा पवित्रगड यांचा अधिकार देण्यांत आला (ले. १३). तेव्हां त्यास मुघल खान म्हणून संबोधूं लागले. नेर्ली–इनामदार फार्सी ५२ या पत्राचा काल औरंगजेबी जुलूस ३० रवल १९ (श. १६०८ माघ वद्य ६, इ. १६८७ जानेवारी २४) हा असून यांत औरंगजेबाचा या वेळचा मीर बक्षी रूहुल्लाहखान यानें इस्लामगड उर्फ पवित्रगड याच्या रक्षणाचें काम रहीमदादखानावर सोपविलें आहे व हुकेरी परगण्यांत यास दिलेल्या जागीरीचा योग्य जो वसूल योग्य वेळीं (म्हणजे यानें बादशाही सनद आणून दिल्यानंतर) यास द्यावा

असें हुकेरीच्या देसायांना आज्ञापिलें आहे. सनद येईतों वसूल अनामत ठेवावयाचा आहे (ले. १२). या अधिकारप्राप्तीप्रमाणें रहीमदादखानानें देसायांस कळविलें (ले. १०). तसेंच त्यानें मिर्झाखान खेशगी या आपल्या नोकरास गड घेण्यासाठीं पाठविलें (ले. १०, १३). गड त्याच्या हातीं आल्यावर त्यानें मुघली सत्तेविरुद्ध बंड केलें. पण त्यांत त्याचा टिकाव न लागल्यानें त्यानें पळ काढला. तेव्हां त्याचा बंदोबस्त करणें भागच होतें. त्याप्रमाणें प्रथम सावधानतेच्या सूचना व नंतर त्याच्या विरुद्ध कृति केली गेली व त्याची जागीर जप्त झाली (ले. १४, १५, १७–२०, २३, ९०). ही सावधानता व कृति यांचा तपशील सांगणारीं पत्रें कोणी लिहिलीं ? ले. ९० मराठ्यांचा आहे. पण त्याचा काल आदिलशाही बुडण्यापूर्वीचा असल्यानें त्यांत रहीमदादखानाविरुद्ध केलेल्या कृतीची माहिती असली तरी तिचा उर्वरित पत्रांत सांगितलेल्या कृतीशीं कांहीं संबंध नाहीं. ले. १९ मध्यें रहीमदादखानास सिकस्त देऊन परागंदा केलें असलें तरी तो ' कैद होये अगर मारिला जाए येसे करणे ' म्हणून आज्ञापिलें आहे. येवढेंच नव्हे तर ' त्याचा मुलाहिजा केलियां तो गाई व ब्राह्मणास व देशास उपद्रव देईल ते पाप तुमचे सिरी असे ' अशी भीतीही घातली आहे. ले. १७ ते २२ व २४ हीं सात पत्रें एकाच हिंदू मनुष्यानें लिहिलीं आहेत हें आरंभींच्या श्रीमार्तंडप्रसन्न या मंगलवाक्यांशावरून स्पष्ट होतें. त्यास गाय, ब्राह्मण व देश यांच्या कुशलाची काळजीही आहे असें दिसतें. पण येवढ्यावरून तो मराठ्यांच्या पक्षाचा होता असें म्हणवत नाहीं. ले. १८ मध्यें ' इस्लामगड त्याचे (रहीमदादखानाचे) हाती आहे तो आपले हातास ये व संभाजीचे लोकाचे दखल नव्हे यैसा उपाय देखणे ' असें करण्यास सुचविलें असल्यानें लेखक मराठ्यांच्या पक्षाचा नाहीं हें उघड होतें. या वेळीं तो व तत्संबद्ध हुकेरीचा देसाई आलगौडा मुघली पक्षाचेच दिसतात. या पत्रांतील माहितीवरून रहीमदादखानाविषयीं येवढें सांगितल्यावर यांतील इतर निर्देशाकडे वळूं. ले. १३ मध्यें नागोजी माने, बहिरजी पांढरे व सातशे पठाणांसह मियादादखान व रणमस्तबहादुरखान यांनीं कटकालवे येथें आणि रुहुल्लाहखान यानें नूरखानाचें शिरोळ येथें छावणी करण्याचा ठराव झाल्याचें सांगितलें आहे. हे सर्व मुघली पक्षाचे आहेत. यांची ही छावणी पावसाळी नसून हालचालींच्या दृष्टीनें सोयीच्या मुक्कामाची आहे. ले. १५ मध्यें कासिमखान व बहिरजी (पांढरे) यांनीं केलेल्या पायमल्लीचें वर्णन आहे. यांपैकीं बहिरजी व या पत्राचा लेखक नरसो सुरो यांमध्यें कटाक्ष किंवा सैनिकी भांडण सुरू झालें होतें. बहिरजी, कासिमखान व नरसो सुरो हे सर्व एकाच मुघली पक्षाचे असतांही त्यांचें आपसांत कटाक्ष लागलें यावरून तत्कालीन लोकांच्या बेलगामी वृत्तीची कल्पना येते. अंताजी सुरो, नरसो सुरो, अण्णाजी पंडित–धोंडो–पंत इत्यादि लोकांचे नेमके अधिकार कोणते हें समजतें तर आणखी कित्येक गोष्टींचा उलगडा झाला असता. २२ वा लेखांक अगदींच निराळा आहे. पाच्छापुरास नवीन टांकसाळ घालून तेथें विविध व्यक्तींकडून सोनें घेऊन त्याचे हुकेरी होन पाडावयास सुरवात झाली होती. पण हे होन (बहुधा

हिणकसामुळें) बाजारांत चालू देण्यास सराफ अडचणी उत्पन्न करतील; तरी तसें होऊं न देतां नवे होन बाजारांत सहज चालतील असें करण्याविषयीं फर्माविलें आहे.

२५

या लेखांत निर्देशिलेलीं हिसार मुस्तफाबाद व कोट शाहाबाद हीं गावें कोणतीं हें समजत नाहीं. छत्रपति संभाजीच्या सैन्यास तंबी देण्याबाबत काकती कर्यातीचा देसाई रायगौडा हा अपेक्षेहून अधिक उपयुक्त असल्याचें व त्यानें पाच्छापूर येथें असलेल्या शत्रूस मोडून काढल्याचें दिसल्यावरून त्यास पाच्छापूर परगण्याची सरदेशमुखी व नणदी हें गाव इनाम दिलें आहे. येथें गनीम म्हणजे रहीमदादखान असावा. यालाच ९० व्या लेखांत पाच्छापूरकर म्हटलें आहे.

२६

येथें आलेला राम दळवी हा सावंतवाडीकरांचा अधिकारी आहे हें त्यांजसंबंधीं मंडळांत आलेल्या कित्येक फार्सी व मराठी कागदांवरून समजून येतें.

२७,२८

हे दोन्ही लेख एकाच अधिकाऱ्यानें लिहिलेले व सामान्यतः एकाच आशयाचे आहेत. फक्त २७ वा लेख काकती कर्यातीचा देसाई सिदगौडा यास तर २८ वा लेख हुकेरी परगण्याचा देसाई आलगौडा यास उद्देशून आहे. २५ व्या लेखानुसार काकती कर्यात मुस्तफाबाद किल्ल्याखालीं होती तर आणखी चार महिन्यांनीं लिहिलेल्या २८ व्या लेखांत हीच कर्यात अजमनगर किल्ल्याखालीं गेली. उपर्युक्त दोन देसायांनीं गंधर्वगड घेतल्याचें सत्कृत्य येथें नमूद आहे. तो गड एकतर आदिलशाहीच्या नाहींतर मराठ्यांच्या ताब्यांत असावा. तो गड नाग सावंतानें इ. १७२४ मध्यें बांधला असें शिवाजी सोविनीरमध्यें विधान आहे (मराठी विभाग पृ. ७२). पण तें या लेखानें चूक ठरतें. या कामाबद्दल दोघांचीं पूर्वींचीं वतनें त्यांस बहाल करून देईनच; पण काकती देसायांना अजमनगर अथवा बेळगांवची आणि हुकेरी देसायांना चांदगड व आजरें (या तर्फांची) सरदेशमुखी, मनसब व एक हत्ती येवढें देवविण्याचें प्रलोभन पत्रलेखक अधिकारी दाखवीत आहे. या लेखांत आलेला रामदास वकील सावंतवाडीकरांच्या कागदांत निर्दिष्ट आहे. पण मुहम्मद अली व देवजी महादेव या व्यक्ती नवीन दिसतात.

२९

हा लेख मोडी लिपींत असला तरी याची भाषा फार्सी आहे. यांत हुकेरी परगण्याचा आलगोंडा वलद लखमगोंडा याजकडे नवीन सनद येईतों पूर्वीच्या सनदानुसार गावें व जमीन विविध हकलवाज़िम्यासह इनाम दिल्याचें सांगितलें आहे त्याचा तपशील असा—

कर्यातीपैकीं गांव

मजती	वंटमरी १	
,,	काडहत्तरगे १	
सोलापूर	हट्टदकेरे १	
,,	निम्मे सेंदूर ·॥·	या शिवाय जमीन
कवूर	गुडस १	
सावगाव	नागनूर १	
नेर	न्यामताबाद खुर्द १	
लाट	निपाणी १	

३०,३१

हीं पत्रें जवळ जवळ एकाच कालाचीं आणि मेलगिरी करोडी व त्याचा गुमास्ता यांनीं हुकेरी परगण्याचे देसाई यांस लिहिलेलीं व बेळगांव तर्फेच्या पाच महालांची करोडगिरी स्वतःस मिळाल्याचें सांगणारीं आहेत. ३० व ३२ लेखांत आलेला राघोजी राजे कोण असावा बरें ?

३२,३३

हीं पत्रें एकाच विषयासंबंधीं असून ३३ व्या पत्रांत ' तमाम मुलकाचे देसमूख व देसपाडेसी बेलगावासी बोलाविले असें विधान आहे तर ३२ व्या पत्रांत तमाम गिर्दनवाईचे देशमूख व देशपांडिये बेलगावी रुजू जाले आहेती असें नमूद आहे. तेव्हां ३३ वें पत्र ३२ व्या पत्राचें अगोदर घातले पाहिजे. ३३ व्या पत्रांतील दाजीराम कोण असावा ?

३४

या पत्रांत साल नाहीं तरी ३० व ३१ पत्रांत आलेल्या विषयाची प्रगति यांत सांगितली असल्यानें हें पत्र श. १६१० (इ. १६८८) मध्येंच पडते व याचा पूर्ण काल श. १६१० ज्येष्ठ वद्य ४, इ. १६८८ जून ७ हा ठरतो. ३१ व्या पत्रांतील येबाजी राम व प्रस्तुत पत्रांतील यादाजी राम हे एकच असतील कां ? येबाजी व यादाजी हीं नांवें यमाजी व यादवजी यांचीं सोपी रूपें असण्याची जेवढी शक्यता तेवढीच येबाजी व यादाजी एकरूप असण्याची शक्यता. तारीख > तेरीख, तसें याबाजी > येबाजी. शिवकालीन मोडींत द, प, ब, ह या चार वर्णांपैकीं कोणत्याही एका वर्णाबद्दल दुसरा वर्ण येऊं शकतो. तेव्हां याबाजी = यादाजी. दोघांच्या बापाचें नाव राम व दोघेही एकाच ठिकाणच्या करोडगिरीशीं संबद्ध; म्हणून दोघे एक असण्याची शक्यता. पत्रलेखनाच्या सुमारास आंब्यांचे दिवस नक्की होते. या दोन्ही पत्रांतील फार्सी शिक्यावरून येथें याबाजी विवक्षित असावा असें भासतें.

३५–३८

या चारी पत्रांत औरंगजेबाच्या अधिकाऱ्यांचा हुकेरीच्या देसायांना आपले पक्षास ओढण्याचा प्रयत्न दिसत आहे.

३९,४०

दोन्ही पत्रें मुघली अधिकाऱ्यांचीं आहेत.

४१–४३

क्र. ४१ मधील रामोजी घोरपड्याची भूधरगडाविषयीं हालचाल, मला वाटतें, प्रथमच समजत आहे. येथील मुअतमिदराव वकील कोणत्या कामगिरीवर आला होता हें समजत नाहीं. क्र. ४३ वरून वल्लभगडचा मराठा किल्लेदार मुघलांस शरण गेल्यामुळें त्यास थोड्या सन्मानानें वागवून सोडून दिलें आणि त्याऐवजीं अब्दुल-अलीची नेमणूक केल्याचें समजतें. ले. ३५, ४०–४४, ४६, ४७ या पत्रांत मुसलमानी कालांचे निर्देश अगदीं वेगवेगळया पद्धतींनीं केले आहेत. यामुळें फसली, शुहूर व हिजरी या कालगणनांपैकीं कोणती कोठें धरावी याविषयीं प्रश्न उत्पन्न झाला. पण या सर्व पत्रांवर बहादुरखानाचा शिक्का असल्यानें हीं सर्व जवळजवळ यावी अशा धोरणानें कालगणना धरल्या आहेत. पण अधिक पुराव्यानें व अभ्यासानें यांच्या कालांत बदल होण्याचा व पत्रें अधिक जवळ येण्याचा संभव आहे. उ. ले. ४१ व ४६ यांचे कालनिर्देश हिजरी सनाचे धरले तर ४६ वें पत्र ४१ व्या पत्राच्या अगोदर सुमारें २२ दिवस लिहिल्याचें ठरतें. ले. ४६ मध्यें भूधरगड गनीम म्हणजे मराठे सोडून गेल्याची बातमी आहे; तर ले. ४१ मध्यें रामोजी घोरपड्यास तो व्यापण्यासाठीं पाठविल्याचें नमूद आहे. बातमीचा पडताळा घेतल्यावर घोरपड्याची पाठवणी केली असावी.

४८

यांत आलेले रायाजी सामराज व रामचंद्र पंडित (अमात्य) दोन्ही मराठी पक्षाचे आहेत. संदलापूर म्हणजे सोलापूर; पण हें प्रसिद्ध सोलापूर नसून कर्नाटकांतील क्र. २९ मध्यें उल्लेखिलेलें सोलापूर आहे. रायाजी सामराज या वेळीं सामानगडास आहे. पण तो लवकरच रामदुर्गाकडे जाणार अशी बातमी आहे.

४९

यांतील गनीम म्हणजे मराठे. संभाजीच्या वधानंतर कांहीं महिने मराठे भयचकित झाले होते. पण थोड्याच दिवसांत त्यांनीं आपणांस सावरलें व औरंगजेबाशीं महाराष्ट्र व कर्नाटक दोन्ही प्रदेशांत लढा देण्यास प्रारंभ केला. त्याचा एक भाग म्हणजे मराठ्यांनीं चिकोडी काबीज केली. पत्रलेखक देसायाचें समाधान पादशाही फौज लौकरच तिकडे येणार आहे असें सांगून करीत आहे.

५०–५३,५६

हीं पाच पत्रें मराठ्यांचीं आहेत. सर्वांचा आशय हुकेरी परगण्याच्या देसायानें

मराठ्यांशीं एकनिष्ठ रहावें म्हणजे त्याचें उर्जित होईल असा आहे. क्र. ५० चें पत्र त्या प्रदेशाचा सर्वोच्च मराठा अधिकारी रामचंद्रपंत अमात्य याचें तर बाकीचीं कोल्हापूर परगण्याचा सरसुभेदार यादवराव याचीं आहेत. क्र. ५१ मध्यें पंत अमात्य भूधरगडास येत आहेत म्हणून नमूद आहे. क्र. ४६ व ४१ वरून कल्पना होते कीं, भूधरगड मुघलांच्या ताब्यांत गेला असावा. पण यावेळीं तो पुन्हा मराठ्यांच्या कब्जांत आला होता असें दिसतें. क्र. ५२, क्र. ५१ नंतर नऊ दिवसांनीं लिहिलें आहे. यांत अमात्य सावगाव तर्फेस येणार म्हणून बातमी आहे. याचा अर्थ अमात्य कर्नाटकाच्या फिरतीवर होता असें दिसतें.

५७,५८

हीं दोन्ही पत्रें एकाच कालाचीं व रामचंद्रपंत अमात्याचीं आहेत. ५७ मध्यें कापसी व तुली या दोन कर्यातींच्या सरदेशमुखीचें जुनेंच पण न चालणारें वतन व त्या कर्यातींपैकीं मादेहाळ व हसूर या दोन गावांचें इनाम दिल्याचें सांगितलें आहे; तर ५८ मध्यें कापसी कर्यातीमधील गावांची नोंद केली आहे.

५९–६२

पहिलीं दोन पत्रें एकाच मुघली अधिकाऱ्यानें हुकेरीच्या देसायास बारवाड हें गांव बंडखोरांस शिक्षा केल्याच्या चाकरीबद्दल इनाम दिल्याचें सांगत आहेत. येथील बंडखोर म्हणजे कोण आणि त्यास केव्हां, कोठें व कशी तंबी दिली हें या दोन पत्रांवरून समजत नाहीं. कदाचित् ले. ६२ मधील घटनांशीं यांचा संबंध असेल. पण तें पत्र व हीं दोन पत्रें यांत दोन वर्षांचें अंतर आहे. तथापि ५९ ते ६२ या चार पत्रांत उल्लेखिलेले गनीम किंवा मुफसिद किंवा बागी म्हणजे मराठे आहेत. मग ते सातारकर छत्रपति असतील किंवा कोल्हापूरकर. पण कोल्हापूरकर छत्रपति असणेंच अधिक शक्य. पहा शिचसा ६।४०. किंवा कदाचित् उदाजी चव्हाणासारखे स्वतंत्र मराठे सरदार असतील. ६२ व्या पत्रांत तर गनिमाशी लढाई होऊन त्याचा मोड केला म्हणून सांगितलें आहे.

६३,६४

हीं दोन्ही पत्रें एकाच कालाचीं, एकाच प्रेषकग्राहकांचीं व सामान्यतः एकाच आशयाचीं आहेत. यांत अब्दुल करीमखान व अब्दुल गफ्फारखान यांमध्यें तसेंच बेळगांव म्हणजेच अजमनगर येथें झालेल्या दोन लढायांचा निर्देश आहे. सध्या मंडळांत दिलेर-जंगी नांवाचें मोडी लिपींतील एक १९७ पृष्ठांचें पुस्तक आहे. तें इ. १८६० मध्यें धारवाड येथें सुपरिंटेंडेंट रिविन्यु सर्वे दक्षिण मराठा कंत्री याचे छापखान्यांत अबदुल दलेलखां दलेलजंग बाहादूर यांनीं दिलेले बुकावरून छापलें आहे. याचा सचित्र फार्सी पाठ मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयांत आहे. या पुस्तकांत सावनूर नवाबाचा मूळ पुरुष अब्दुर्रौफ़खान ता. १६ शाबान हि. ११३२ (श. १६४२ ज्येष्ठ वद्य ३=इ. १७२० जून १२) रोजीं मेला असतां त्यास असलेल्या बारा मुलांपैकीं चौथा मुलगा अब्दुर्रसूलखान

च पाचवा मुलगा अब्दुलकरीमखान हे भाऊबंदकीमुळें बागलकोटच्या लढाईंत मेल्यावर सहावा मुलगा अब्दुल गफ्फारखान गादीवर आला म्हणून सांगितलें आहे (पृ. ७, ८). या दोन्ही पत्रांत आलेले अब्दुलकरीम व अब्दुलगफ्फार हे उपर्युक्त दोघे असावे. दिलेरजंगीमध्यें करीम व रसूल यांत भाऊबंदकी लढाई झाल्याचें सांगितलें तर येथें करीम व गफ्फार यांत झाल्याचें नमूद आहे. हा गफ्फार दिलेरजंगीप्रमाणें ता. ४ शाबान हि. ११३८ (इ. १७२६ मार्च २७ = श. १६४८ चैत्र शुद्ध ५) रोजीं मरण पावला. हा काल अचूक असेल तर भाऊबंदकी लढाई इ. १७२० ते २६ च्या दरम्यान झाली असली पाहिजे. बेळगावच्या लढाईचा अजून मला पत्ता लागत नाहीं. पहिल्या बाजीराव पेशव्याच्या इ. १७२५ व १७२६ सालीं कर्नाटकांत दोन स्वाऱ्या झाल्या. त्यांपैकीं दुसऱ्या स्वारींत सु. ११२७ रखर ४ ते ८ (श. १६४८ मार्गशीर्ष शु. ५–९ = इ. १७२६ नोव्हेंबर १८–२२) या दिवसांत बाजीराव बेळगांव किंवा त्याच्या आसपास मुक्कामास होता (बाबापेरो २।२२७). त्या सुमारास बेळगांवीं एखादी लढाई झाली म्हणावें तर त्या वेळचे बेळगांवचे सत्ताधारी, सावनूरकर नबाब अब्दुल गफ्फार-खान याचा अल्पवयी मुलगा अब्दुलमजीद व त्याचा चुलता अब्दुलसत्तार, हे होते. गफ्फारच्या मृत्यूमुळें नुकतीच सत्ता यांच्या हातीं आली होती आणि गफ्फार आपल्या हयातीच्या अखेरीस बाजीरावाच्या कर्नाटकावरील पहिल्या स्वारींत सु. ११२६ जखर २२ (श. १६४७ माघ वद्य ९ = इ. १७२६ फेब्रुवारी १४) रोजीं बाजीरावास बेदवटी येथें भेटला होता. यामुळें सावनूर नवाब व बाजीराव यांची लढाई झाली असण्याची शक्यता फार कमी वाटते.

६५

या पत्रांत उदाजी चव्हाण, राणोजी घोरपडे, मिरजेचा किल्लेदार मुहम्मद दिलेर-खान, श्रीपतराव व सिदोजी थोरात अशा पाच लोकांनीं हुकेरी परगण्यास त्रास दिल्याची माहिती आहे. उदाजी चव्हाण व राणोजी घोरपडे हे वतनामुळें मिरजेशीं संबद्ध होते. कोल्हापूरच्या छत्रपति संभाजीनें या दोघांस न भांडतां एकत्र येऊन कार्य करण्यास सांगितलें होतें (कछवइसा १।३४). श्रीपतराव बहुधा प्रतिनिधि असावा. सिदोजी थोरात अष्टयाच्या थोरातांपैकीं आहे. उदाजी व राणोजी यांस संगनमतानें काम करण्यास सांगितलें तेव्हां हे छत्रपति शाहूच्या प्रदेशावर चालून गेले असल्याचें वर्तमान सिदोजी थोरातानें कळवितांच त्याच्या साह्यास शाहूनें श्रीपतराव प्रतिनिधीच्या हाताखालीं फौज पाठविल्याचें कळतें. तसेंच या पत्रांतील लखमगौडानें साह्यार्थ याचना केल्यामुळें सिदोजी थोरातास साह्य करण्याविषयीं आज्ञा झाली होती (कछवइसा १ पृ. ५६). या दोन्ही आज्ञा अनुक्रमें सु. ११२८ रखर ११ व २१ (श. १६४९ मार्गशीर्ष शुद्ध १२ व वद्य ७ = इ. १७२७ नोव्हेंबर १४ व २४) च्या म्हणजे प्रस्तुत पत्राच्या पूर्वींच्या आहेत. तेव्हां दिसतें तें असें कीं, पहिले तिघे संभाजीतर्फे लखमगौडाच्या हुकेरी परगण्यावर

चालून गेले तर दुसरे दोघे लखमगौडाच्या साह्यार्थ गेले. पण प्रदेशाची पायमल्ली झाली सर्वांच्या कडून.

६७

पुरंदरे रोजनिशीप्रमाणें मिरज सु. ११४०, फ. ११४९, श. १६६१ आश्विन शुद्ध १२ = इ. १७३९ आक्टोबर २ रोजीं मराठ्यांच्या हातीं आली.

६८

यांत आलेला नारोजी राघोजी येथीळ पदव्यांसह ९ व्या पत्रांत निर्दिष्ट आहे. त्या पत्राचा काल श. १६०८ माघ वद्य ६ = इ. १६८७ जानेवारी २४ हा आहे. हेंही पत्र त्याच सुमाराचें असावें.

६९

या पत्रांतील नरसो सुरोच १४, १५ पत्रांत आला आहे. धोंडोपंत दोन आहेत. एकास नरसो सुरोनें तीर्थस्वरूप तर दुसऱ्यास महाराज–महाराजसाहेब इत्यादींनीं संबोधिलें आहे. या पत्रावर काल नसला तरी हें १४,१५ च्या सुमाराचेंच असलें पाहिजे.

७०

या पत्रांतील नागोजी तुकदेवच क. ५३ मध्यें आहे. यांत कालाचा पूर्ण निर्देश नसला तरी हा व ले. ५३ यांची पैवस्ती एकच आहे. येवढेंच नव्हे तर ५३ व्या पत्रांतील आदेशाप्रमाणें करावयाच्या कृतीचा तपशील या पत्रांत आहे. तेव्हां याचा काल ५३ च्या नंतर लागलीच असला पाहिजे.

७१

या पत्राच्या काळीं संताजी घोरपडे जिवंत आहे. तो जेधे शकावलीप्रमाणें श. १६१९ आषाढ (इ. १६९७ जून–जुलै) मध्यें मारला गेला. तेव्हां हें पत्र त्या पूर्वीचें आहे. ले. ५३ व ७० प्रमाणें याची पैवस्ती २९ रबर हीच आहे. तेव्हां ५३ व्या पत्राच्या सुमाराचा काल याचाही असावा.

७२

यांत सिदोजी इंगवले या व्यक्तीचा निर्देश आहे. हा रा. श. २७ पौष शुद्ध १ (इ. १७०० डिसेंबर ३०) पूर्वी केव्हां तरी सज्जनगडावर कामास आला असें त्याच्या मुलास मिळालेल्या एका इनामाच्या सनदेवरून समजतें (कछवइसा ११). मासिर–इ–आलमगीरींत सज्जनगड औरंगजेबानें जिंकल्याची विस्तृत हकीकत आली आहे. तीवरून तो गड औरंगजेबी जु. ४४ मोहरम ३ (इ. १७०० जून १०) रोजीं त्याच्या हातीं आला असें ठरतें (फार्सी मूळ पृ. ४२५–४२८, शिचप्र ६७). सिदोजी या वेढ्यांत मेळा असें समजलें तरी कालविपर्यय होत नाहीं. यांत आलेळा रामोजी घोरपडे ४१ व्या पत्रांतही आला आहे. पण तेथें तो मुघली पक्षाचा वाटतो. येथें तो मराठ्यांच्या बाजूस असलेला दिसतो. श. १६६३ च्या आश्विनांत (इ. १७०१ सप्टेंबर

–आक्टोबर) बीदारबख्तानें वर्धन व कलानिधि या दोन गडांसह सामानगड जिंकल्याचें गदाधर प्रल्हाद शकावलींत सांगितलें आहे (शिचप्र ६७). तेव्हां हें पत्र या कालाच्या अगोदरचें असण्याची शक्यता आहे. यांत तो गड मराठ्यांकडे असल्याचें स्पष्ट दिसतें.

७३

या पत्रांतील नरसो सुरो क्र. १४, १५ व ६९ या पत्रांतही आला आहे. तरीही याविषयीं अधिक माहिती मिळत नाहीं. १५ व्या पत्रावरून तो मुळदहाळचा असावा व या वेळीं आलगोंडा हुकेरीहून अन्य स्थळीं राहात होता असें दिसतें. नरसो सुरोनें आपल्या गांवीं हुकेरी होनासारखे होन पाडण्याची टांकसाळ घातली आहे हें सांगून ते होन हुकेरी व इतरत्र चालू करण्याबद्दल विनंति केली आहे. तसेंच पवित्रगडाचें वर्तमानही कळविण्यास सांगितलें आहे.

७४

यांतील दावलखान राजगुरु कोण बरें असावा? राजगुरु त्याचे आडनांव की धंद्याचें नांव? दळवी अजम हा सावंताकडील याविषयीं शंकाच नाहीं.

७५

आशयाचा विचार करतां हें पत्र राजारामकालीन मराठी पक्षांतील उच्च श्रेणीच्या अधिकाऱ्यानें व मोर्तबाचा विचार करतां कोल्हापूर आजरें इ. प्रदेशाचा सरसुभेदार यादवराव यानें लिहिलें आहे असें ठरतें. हें महाराष्ट्र राज्य आहे, हें तुम्हा लोकांचें आहे, हें देवा-ब्राह्मणांचें आहे किंवा त्यांच्या आशीर्वादाचें आहे अशा प्रकारचे विचार आणखीही कांहीं ठिकाणीं व्यक्त झाले आहेत. उ. रा १५।२८२; श्रीसंप्रदायाचीं कागदपत्रें ले. ८०, ८२, ८४, ८६, ८८; शिचसा ४।७२६, ७२८; ५।७६७, ८२७, ८४५, ८४६, ८।४७; सप १६६।३, १६८।११, १७३।१६ इ.

७६

हें पत्र मराठी पक्षाचें व बहुधा रामचंद्रपंत अमात्यास लिहिलें आहे असें वाटतें. तथापि निश्चयानें सांगवत नाहीं.

७७

हें मुघली पक्षाचें असून यांत आलेला यमण्णा नेर्लीकरांच्या पूर्वजांपैकीं सहावा पुरुष यमाजी हा आहे.

७९–८४

हीं पत्रें मला केव्हां मिळालीं हें त्यांच्या प्रस्तावनेंत दिलें आहे. त्यानंतर गेल्या डिसेंबरमध्यें इंडियन हिस्ट्री काँग्रेसतर्फे या पत्रांसह एकूण ६८ पत्रें Shivaji's visit to Aurangzeb at Agra या पुस्तकांत प्रकाशित झालीं आहेत. या पत्रांचे तेथील क्रमांक ५,९,१६,१७,३५,४४ असे आहेत. मी हीं पत्रें स्वतः पाहून नकललेलीं नाहींत. मला १९५४ सालीं तेथील पुरातत्त्व खात्याचे अधिकारी श्री. सत्यप्रकाश यांनीं

पुरविलेल्या नकलांवरून मीं प्रस्तुत पाठ छापले आहेत. पत्रांच्या श्री. सत्यप्रकाश यांनीं पुरविलेल्या पाठांमध्यें हीं पत्रें प्रकाशित करतांना कानामात्रांचाही फरक होऊं न देण्याची मीं शक्य ती काळजी घेतली आहे. मीं दिलेले पाठ व उपर्युक्त पुस्तकांत छापलेले पाठ यांमध्यें पुष्कळ ठिकाणीं फरक आहेत. वरील पुस्तकांत क्रमांक २१ च्या पत्राची प्रतिमा दिली आहे. ती क्र. २१ च्या पत्राच्या पाठाशीं ताडून पाहिली तर पुष्कळ ठिकाणीं प्रतिमा व पाठ यांमध्यें अंतर पडलेलें स्पष्ट दिसतें. यामुळें मला अजूनही असें वाटतें कीं, श्री. सत्यप्रकाश यांनीं मला पुरविलेले पाठ अधिक अचूक आहेत. यामुळें केवळ पाठांचा विचार केला तरीही शिवचरित्रसाहित्याच्या या १२ व्या खंडांत केलेल्या या सहा पत्रांच्या मुद्रणाचें समर्थन होऊं शकेल असें वाटतें. क्रमांक ७९ व्या पत्रांत जयसिंहानें पुरंदर व रुद्रमाळ या किल्ल्यांस लगट केली तिची तारीख हि. १०७५ रमजान २४ (श. १५८७ चैत्र वद्य १०, इ. १६६५ मार्च ३१) अशी दिली आहे. ही तारीख आलमगीरनामा, मासिर-इ-आलमगीरी किंवा मुन्तखबुल्लुबाब यांपैकीं कोणत्याही ग्रंथांत नाहीं. या पत्रांत रुद्रमाळ तारीख ९ शव्वाल (श. १५८७ वैशाख शुद्ध १०-इ. १६६५ एप्रिल १४) या दिवशीं जयसिंहाच्या ताब्यांत आला असें नमूद आहे. पण आलमगीरनाम्यांतील माहितीप्रमाणें रुद्रमाळ ७ शव्वालला जयसिंहाच्या ताब्यांत आला. तेव्हां रुद्रमाळ हस्तगत केल्याच्या ज्या दोन तारखा मिळतात त्यांत दोन दिवसांचा फरक पडत आहे. ७९ व्या पत्रांत दिलेली तारीख अचूक असावी असें वाटतें. पुरंदर या नावाचा उच्चार प्रस्तुत पत्रें व आलमगीरनामा यांत पुन्यधर, पुनांन्धर, पुलंधर इ. विविध प्रकारांनीं केलेला आढळतो. पुरंदर, रुद्रमाळ व सिंहगड या तीन किल्ल्यांविषयीं औरंगजेबानें दिलेलीं फर्मानें जयपूरच्या (आतां विकानेरच्या) लेख्यशालेंत आहेत. तीं मीं स्वतः पाहिलीं आहेत. उपर्युक्त पुस्तकाप्रमाणें तीं फार्सी फर्मानें व जयपूरच्या दप्तरखान्यांतील मराठी इतिहासाभ्यासास उपयुक्त इतर फार्सी कागदपत्र प्रसिद्ध होणें अगत्याचें आहे. प्रसिद्ध होतील तेव्हां खरें. ८० व्या पत्रांत पुरंदर घेतला आणि शिवाजी येऊन भेटला या दोन घटना सांगितल्या आहेत. या पत्राची मिति श्रावण वद्य १० संवत् १७२२ (श. १५८७ अधिक श्रावण वद्य १० = इ. १६६५ जुलै २७) ही येते. उपर्युक्त पुस्तकांत प्रथम श्रावण वद्य ९ ला २६ जून ही तारीख दिली आहे. या दिवशीं ही तारीख असल्यास श्रावण म्हणजे द्वितीय-निज श्रावण वद्य १० ला २७ जून ही तारीख येणें अशक्यच आहे. ८१ व्या पत्राच्या पोटांत २१ जिल्काद ही तारीख आली आहे. अर्थात् हें पत्र २१ जिल्कादनंतर लागलीच लिहिलें असावें. २१ जिल्कादला लिहिलें असें समजणें कठीण आहे. २१ जिल्कादला १५ मे येत नसून १६ मे येत आहे. या पत्रांत शिवाजी व औरंगजेब यांची भेट दीवाने आम किंवा दीवाने खास यांमध्यें न होतां घुसलखान्यांत झाली, त्या वेळीं त्यास ताहिरखानाच्या जागीं व राजा रामसिंगाच्या समोर उभें करण्यांत आलें, सर्वांना विडे दिले तसाच शिवाजीस दिला, पण इतरांना मानाचा पोशाख दिला तसा शिवाजीस मात्र दिला नाहीं. तेव्हां शिवाजी प्रक्षुब्ध झाला आणि म्हणाला, " मी काय सामान्य

मनुष्य आहे कीं मला बादशाहानें उभें करावें ?" इत्यादि बोलून शिवाजी तेथून निघाला. तेव्हां बादशाहानें आज्ञापिलें कीं, शिवाजीला पोशाख व दिलासा देऊन परत आणावें. पण हें करणाऱ्या मुल्तफितखान, आकिलखान व मुखलिसखान यांना शिवाजी म्हणाला, " घेत नाहीं पोशाख मी. मी काय असा मनुष्य आहे कीं, ज्यास बादशाहानें जसवंतसिंगाच्या खालीं उभें करावें ?" इ. प्रकारचें भाषण करून शिवाजी बादशाहाला न भेटतांच तेथून परत फिरला. या पत्रांत भेटीविषयीं आलेला तपशील फार महत्त्वाचा आहे. ८२ व्या पत्रास मी इ. १६६६ मे १७ अशी तारीख दिली आहे. उपर्युक्त पुस्तकांत १६ मे दिली आहे. पिल्ले किंवा खरे यांपैकीं कोणत्याही जंत्रीप्रमाणें ज्येष्ठ वद्य ९ ला १७ मे व ज़िल्काद २२, अर्थात् जिल्काद २१ ला १६ मे हीच तारीख येईल. म्हणजे उपर्युक्त पुस्तकांत या दोन पत्रांच्या इंग्रजी तारखा एक एक दिवसानें अलीकडे ओढल्या गेल्या आहेत. क्रमांक ८३ च्या पत्रांत सांगितलें आहे कीं, ' नलवरहून वाका आल्याप्रमाणें शिवाजी पळून गेल्यानंतर ३–४ दिवसांनीं ३०० लोकांसह नलवरची घाटी उतरून गेला. मी (नलवरच्या फौजदारानें) त्यास अडविलें. तेव्हां त्यानें बादशाहानें मला बिदा केलें म्हणून मी जात आहे असें सांगून तशा प्रकारचें दस्तकही दाखविलें. म्हणून मी त्यांस जाऊं दिलें ' इत्यादि माहिती आहे. ही माहिती खोटी असल्याचें व शिवाजी चंबळेची घाटी नावाड्यांच्या साह्यानें उतरल्याची बातमी होती तीही खोटी असल्याचें उपर्युक्त पुस्तकांतील क्र. ३६ व ४४ या पत्रांवरून समजतें. पण आपणांवर कलंक येऊं नये म्हणून या बातम्या खोट्या असल्याचें या पत्रांत नमूद केलें असावें. एरवीं शिवाजी सुमारें ४० दिवसांत महाराष्ट्रांत कसा येईल ? (शिव्हिआओआ इंग्रजी पृ. ५५) हेंही पत्र शिवाजीच्या पलायनाच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. ८४ व्या पत्रांत शिवाजी पेटाऱ्यांत बसून निसटला हें स्पष्टपणें नमूद केलें आहे.

८६

हें शिवाजी महाराजांनीं मुरगूडचा देसाई रुद्रप्पा नाईक यास लिहिलें आहे. यांत या देसायानें नागणगौडा याच्याबरोबर भुजबलगडाच्या सहाय्यासाठीं साहित्य पाठविलें असतां तोरगलकरांनीं वाटेंत गाठून त्यास ठार केलें. म्हणून शिवाजी महाराजांच्या इच्छेप्रमाणें रुद्रप्पा त्यांच्या लोकांस सहाय्य करूं शकला नाहीं याबद्दल त्यास वाईट वाटल्यामुळें शिवाजी महाराजांनीं हें अभयपत्र त्यास धाडलें आहे. यांत सहाय्य करतां आलें नाहीं याबद्दल वाईट वाटून घेऊं नये, चालू सालची खंडणी तुमच्याकडून घेणार नाहीं, कडकोली व इतर शत्रूचीं ठाणीं उठवून लावावीं आणि भुजबलगडाचें सहाय्य करण्याची खटपट करावी म्हणजे शिवाजी महाराज त्यावर समाधानी राहतील असें सांगितलें आहे. यांत आलेला भुजबलगड म्हणजे विजापूर जिल्ह्यांतील रामदुर्ग असावें. शिवाजी सोविनीर मध्यें रामदुर्ग उर्फ भुजबलगड रायचूरच्या वायव्येस २० मैलांवर असल्याचें सांगितलें आहे. ही माहिती एक तर चुकली असावी किंवा आणखी

एक रामदुर्ग अथवा भुजबलगड असेल. येथें आलेलें मुरगूड बेळगांव जिल्ह्यांतील बैलहोंगलच्या ईशान्येस ७ मैलांवर आहे. तेथून रामदुर्गाला जावयाचें म्हणजे तोरगल वाटेवरच आहे. कडकोली तोरगलच्या वायव्येस सुमारें ८ मैलांवर आहे. शिवाजी महाराज श. १५९८ च्या विजयादशमीस दक्षिण दिग्विजयास निघाले त्या वेळीं त्यांनीं कर्नाटकांतील हा प्रदेश जिंकला, आपलीं ठाणीं बसविलीं व शत्रूचीं उठविण्याचा तिकडील देसायांच्या साह्यानें प्रयत्न केला असें दिसतें.

८७,८८

या दोन पत्रांवर संभाजीची मुद्रा आहे. पण मुख्य प्रधानाच्या मुद्रेची जागा मोकळी सोडली आहे. शिवाजी महाराज श. १६०२ चैत्र शुद्ध पौर्णिमेस (इ. १६८० एप्रिल ३) वारले. त्यांनीं राज्याच्या व्यवस्थेविषयीं प्रधानादि मंडळीस सांगितलें होतें त्याचा विचार करतां त्यांच्या पश्चात् तत्काल संभाजीच्या हातांत मराठी राज्य येणें शक्यच नव्हतें; म्हणून ८८ व्या पत्राच्या वेळीं अर्थात श. १६०२ ज्येष्ठ शु. ११ (इ. १६८० मे २८) म्हणजे शिवाजी महाराज वारून जवळ जवळ दोन महिने होत आले तरीही संभाजीचा मुख्य प्रधान ठरलेला नव्हता. यामुळें या दोन्ही कागदांवर मुख्य प्रधानाच्या मुद्रेची जागा मोकळी सोडली आहे. यांतही मुरगूडचा देसाई रुद्रप्पा याचा उल्लेख असून शिवाय कटोरगडचा हवालदार देवजी श्रीखंडे याचाही उल्लेख आहे. हा कटोरगड मुरगूडच्या जवळच ईशान्येस आहे. या पत्रांत संभाजीनें शिवाजी महाराजांनीं जी कांहीं खंडणी ठरविली असेल तेवढीच घेईन असें आश्वासन दिलें आहे. ८८ व्या पत्रावरून खंडणीची एकंदर रक्कम वार्षिक १०,००० होन ठरवली होती असें दिसतें.

८९

या पत्रावर मजकुराच्या डाव्या बाजूच्या समासांत प्रल्हाद निराजीची मुद्रा आहे व लेखांक ८४ व ८७ प्रमाणें मर्यादा आहे. या पत्राची मिति श. १६०२ भाद्रपद शुद्ध १४ (इ. १६८० ऑगस्ट २८) आहे. या वेळीं प्रल्हाद निराजी नेमका कोणत्या हुद्द्यावर होता हें समजत नाहीं. पण एव्हां तो बहुधा संभाजीचा मुख्य प्रधान असावा. या पत्रांत रुद्रप्पानें एक तक्रार केली आहे कीं, आज्ञेप्रमाणें मुरगूड परगण्याची खंडणी वसूल करून कटोरगडचा तनखा व इमारती यांसाठीं देत असतां मराठी अधिकारी विठ्ठल हरी या बाजूस आला तेव्हां तो पैशाबद्दल किरकोळ वराता करूं लागल्यामुळें कटोरगडास पैसे पाठविण्यामध्यें व्यत्यय येऊं लागला. यावर संभाजीनें आज्ञा केली कीं, कटोरगडास तनखा व इमारती यांसाठीं आज्ञेप्रमाणें पैसा द्यावा. रुद्रप्पानें दुसरी तक्रार केली कीं, बेटगिरीचा सुभेदार बाबाजी रखमांगद यानें दोन गांव मारले व गुरेंढोरें मारून पेवांतील धान्यही नेलें. यामुळें रयतेस दहशत बसली आहे. याच्या उत्तरीं संभाजीनें आश्वासन दिलें कीं, बाबाजी रखमांगदानें जें कांहीं नेलें असेल तें सर्व तो सोडून देईल, तुम्ही रयतेस धीर द्यावा. रुद्रप्पानें तिसरी तक्रार ही केली कीं, संतेगिरेकरांनीं गांव

मारून गुरें व शेळ्या पळवून नेल्या असतां सुभेदार नारो अंबाजी हा त्याची पाठ राखतो. त्याच्या उत्तरीं संभाजीनें सांगितलें आहे कीं, नारो अंबाजीस ताकीद केली आहे, तो संतेगिरेकरांना योग्य तें करावयास लावील.

९०

यामध्यें धारवाडकर गनीम व पादशाहपूरकर गनीम रहीमदादखान अशा दोघांचा निर्देश आला आहे. पैकीं रहीमदादखानाविषयीं १० व्या पत्राच्या टीपेंत माहिती दिली आहे. या वेळीं धारवाडकर गनीम कोण होता हें समजत नाहीं. भगवंतपुराचाही पत्ता लागत नाहीं. तळ्ळूर मुरगूडजवळच आहे. या वेळीं रुद्रप्पा देसाई बहुधा मरून त्याचा वारस मनाप्पा देसाई हा काम करूं लागला होता. भोंवतालचे इतर देसाई विजापूरकर किंवा मुघल यांस सामील झाले असतां रुद्रप्पाप्रमाणें हाही मराठ्यांशीं एकनिष्ठ राहिला होता.

९२

या पत्राच्या समयास मनप्पा देशमूख मरून रुद्रप्पा देशमुखीच्या कामावर आलेला दिसतो. मात्र या वेळीं हा मराठ्यांच्या बाजूनें नसून मुघलांच्या बाजूनें मराठ्यांशीं लढतांना आढळत आहे. या पत्रांत धनाजी जाधव व हिंदूराव घोरपडे असे दोघे मराठे सरदार निर्दिष्ट आहेत. धनाजी जाधव सहज लक्षांत येतो. पण हिंदूराव घोरपडे म्हणजे कोण असावा ? तो प्रसिद्ध संताजी घोरपड्याचा भाऊ बहिरजी घोरपडे असावा. या बहिरजी घोरपड्यानें केलेल्या अनेक गोष्टी इतिहासांत नमूद आहेत (राजारामचरितम् १।५०, ४।४२–५०,५ वा सर्ग, शिचप्र ३६,३७).

९३

या पत्रांत अंबाजी विरूपाक्ष नांवाचा मुतालीक देसाई आला आहे. पृ. ३ वरील वंशावळींत यमाजी विरूपाक्ष नांवाचा एक मनुष्य ६ व्या पिढींत आहे. अंबाजी हा त्याचा भाऊ असल्यास न कळे. या पत्रावरून शिवेचें भांडण कसें चाले व सरकारी अधिकारी त्यांत कशी दांडगाई व दडपेगिरी करीत हें चांगलें समजतें.

९४

छत्रपति शाहू मुघलांच्या कैदेंतून सुटून महाराष्ट्रांत येतांच वारसा हक्काचें आपलें राज्य आपल्या ताब्यांत आणण्यासाठीं लांबलांबच्या देसायांना राजपत्रें लिहूं लागला. त्यांपैकीं एक हें आहे. यांत उल्लेखिलेला बसप्रभू म्हणजे पृ. ३ वर सांगितलेला व १० व्या पिढींतील आलगौडाचा चुलतभाऊ बसप्रभू हा असावा. या पत्रांत दिलेल्या २१ गांवांचा वसूल पवित्रगडाच्या योगक्षेमासाठीं देण्यास सांगितलें आहे. तेव्हां या पत्राच्या काळापूर्वीं केव्हां तरी पवित्रगड मराठ्यांच्या ताब्यांत आला होता.

९५

या पत्राच्या मुद्रेवरून हें बहिरजी घोरपड्यानें पाठविलें आहे हें स्पष्ट होतें.

९६

हें पत्र बहिरजीचा मुलगा सिधोजी यानें पाठविलें आहे. ९५ चें पत्र श. १६३४ मधील तर ९६ वें श. १६३६ मधील (इ. १७१२ व इ. १७१४) आहे. तेव्हां बहिरजी घोरपडे या दोन वर्षांच्या दरम्यान केव्हां तरी मेला असावा. या व क्र. ९७ च्या पत्रांत लिंगप्पा या नांवाचा एक हुकेरीचा देसाई निर्दिष्ट आहे. त्याचा पृ. ३ वरील वंशावळींत उल्लेख नाहीं. याचा अर्थ ती वंशावळ केवळ वारस दाखविणारी आहे. तीमध्यें वारसाचे भाऊबंद निर्दिष्ट नाहींत. ९६ व ९७ या पत्रांच्या काळीं नणदी गांवाचा देसाई कोण असावा ? सध्याचे नणदीकर देसाई निपाणीकर देसायांची वस्तुतः थोरली शाखा आहे; पण पेशवाईच्या शेवटीं निपाणीस होऊन गेलेल्या आपाजीराव निपाण-करांमुळें तेथें असलेल्या धाकट्या शाखेस महत्त्व आलें. मी माझे मित्र श्री. मा. द. आपटे यांसह नणदीकर देसायांकडे गेलों होतों, त्यांजकडे कागदपत्रेंही आहेत; पण आम्ही त्यांकडे गेलों त्या वेळीं ते कागदपत्र पहावयास मिळण्याचा योग जमून आला नाहीं.

९८

हें पत्र नकल आहे. याच्या कालांत गोंधळ झालेला आहे. त्यावरून या पत्रा-विषयीं संशय उत्पन्न होतो. पण यांत फोंड्याची मसलत निर्दिष्ट आहे म्हणून येथें छापलें आहे.

९९

हें पत्र निपाणीच्या देसायांचा पूर्वज सिधोजी निंबाळकर याचें आहे. याजकडे हुकेरी परगण्याची सरनाइकी होती.

१००

पेशवाईंत सावकारीच्या धंद्यांत व्याजाचा दर प्रतिमास १० आणे ते ३ रुपये-पर्यंत असल्याचें अनेक पत्रांत आढळतें; पण या पत्रांत तोच प्रतिमास ५ एवढा भारी सांगितला आहे.

१०१–१०२

हें पत्र कोल्हापूरच्या छत्रपतींचा प्रतिनिधि कृष्णाजी परशुराम यानें निपाणीचा देसाई व हुकेरीचा सरनाईक तमाजी परवगौडा यास धाडलें आहे. यांत कोंकणांतील कुडाळच्या किल्ल्यास सावंतवाडीच्या सावंतानें वेढा घातला असतां प्रतिनिधि पन्हाळ्याहून कोंकणांत कसा उतरला, त्यानें तमाजी परवगौडा देसायास साह्यासाठीं बोलाविलें असतां तमाजीनें

बयादी लावून गांव इनाम कसें मिळविलें आणि छत्रपति शाहूकडील फौजांचा शह बसल असतां निपाणीच्या देसायांनीं कांहीं कामगिरी केली एवढें सांगितलें आहे. या पत्रावरून सिधोजी निंबाळकर तमाजी परवगौडाचा चुलता ठरतो. १०२ वें पत्र म्हणजे १०० व १०१ या पत्रांचा थोडक्यांत पुनरुच्चार आहे. कुडाळच्या वेढ्यांत सहाय्यासाठीं गेलेला सिधोजी निंबाळकर हाच निपाणी देसायांच्या सैन्याचा प्रमुख होता.

१०४

या पत्रांत उल्लेखिलेला पराक्रमगड किल्ला कोठें आहे? हें कोप्पळ किंवा बहादुरभंडा या दोन किल्ल्यांपैकीं एकाचें नाव नसेल ना? हे दोन किल्ले जवळ जवळ असून बहादुरभंडा कोप्पळ परगण्यांतच मोडत असावा.

१०५

या पत्रांत आलेला दौलतराव घोरपडे हा सिधोजी हिंदूराव घोरपड्याचा मुलगा व सुप्रसिद्ध गुत्तीकर घोरपडे मुरारराव याचा धाकटा भाऊ. दौलतराव घोरपड्यास सुभानजी शिंदे याची मुलगी दिली होती.

१०६

या पत्रांत एका स्वारीवर सुरूरखानाची नेमणूक करून हातनूलीच्या बाजूस पाठविल्याचें सांगितलें आहे. या स्वारीची अधिक माहिती कोंकण प्रदेशांतील चौकच्या आसपासचे कागद मिळाल्यासच समजणार आहे.

१०७

देशावरच्या मानानें मावळ व कोंकण भागांतले देशमूख संपत्ति, प्रदेश इ. दृष्टींनीं फार लहान; पण मानमरातबांत मात्र कमी नव्हते. चौक ते पनवेल किंवा कल्याण-मुरंजन येथपर्यंतचा प्रदेश आहे तो केवढा व त्याचें उत्पन्न तें काय असणार? पण या लहानशा प्रदेशांत अदटराव, अभंगराव, चंद्रराव, झुंझारराव, दलपतराव दिनकरराव, बागराव, महिपतराव, यशवंतराव, विश्वासराव, सावंतराव, सूर्यराव, हैबतराव, इत्यादि पदव्या धारण करणारे देशमूख होते. या सर्व रावांचे झाडून सारे कागद हस्तगत झाले तर किती तरी नवी माहिती प्रकाशांत येईल.

१०८

हें पत्र औरंगजेबाच्या अधिकाऱ्यानें धाडलेलें आहे. याच्या फार्सी मजकुरांत जुलूसचा निर्देश आहे. यांत शिवाजीची अफझलखान प्रसंगापूर्वीची एक हालचाल नमूद आहे. तीमध्यें शिवाजी माहुली किल्ल्याची बेगमी करण्यासाठीं मुघली सत्तेखालच्या लोकांना त्रास देऊन आणि पैसे व निरनिराळे जिन्नस त्यांजपासून जबरदस्तीनें घेऊन त्यांचा भरणा करीत आहे असें सांगितलें आहे. हें मुघली अधिकाऱ्यानें लिहिलें असल्यानें यांत मकहूर हें विशेषण लावून व इतर प्रकारांनीं शिवाजीची नालस्ती केली आहे.

१०९

या पत्रांत महाराजा व नवाबजी अशा दोन मोठ्या व्यक्ति उल्लिखित आहेत. श. १५८५ चैत्र शुद्ध ८ (इ. १६६३ एप्रिल ५) ला शिवाजीनें शायिस्तेखानावर छापा घातल्यानंतर लवकरच खान येथून बदली होऊन उत्तरेकडे गेला. पण त्याचा सहकारी महाराजा जसवंतसिंग येथेंच सुभेदार म्हणून होता. त्यानें या पत्राच्या तारखेनंतर एक महिन्यानें सिंहगडास वेढा घातला. पण लोकांस धीर देणें किंवा भिवविणें यांपैकीं कोणत्याही हेतूनें कां होईना पण जसवंतसिंग कोंकणांत उतरणार असल्याची आवाई उठविली जाणें शक्य आहे. पण नवाब म्हणजे कोण हें अजून मला उमगत नाहीं.

११२

औरंगजेबाच्या स्वारीच्या जोरामुळें छत्रपति राजाराम निर्वासित होऊन जिंजीस गेला व महाराष्ट्राची दाणादाण झाली. तेव्हां महाराष्ट्रांतील लोकांना औरंगजेबाविरुद्ध लढा देण्यास उद्युक्त करण्यासाठीं आपण ताब्यांत आणल्यास वंशपरंपरेनें चालणारें आणि आपणांस नाहीं तरी आपल्या मुलांबाळांस उपयोगी पडणारें इनाम, जागीर, वतन, इत्यादींचें प्रलोभन दाखविणें आवश्यकच होतें. त्याप्रमाणें राजाराम व त्याचे अधिकारी यांनीं केल्याचे शेंकडों दाखले आहेत (रा. १५।२८२; १६।२८; १७।२०, २१; शिवसा २।२२५; ४।७२६, ७२८; ५।७६७, ८४५, ८४६, ९३६; ६।११३, ११४, ११६). पण या धोरणाचा उपक्रम संभाजीचा खजिना रिकामा झाल्यामुळें त्याच्या कालांतच झाला असें या व अशा प्रकारच्या इतर पत्रांवरून दिसून येतें.

११४–११६

हे तिन्ही कागद अभयपत्रें आहेत. तिहींचाही हेतू हातनोली अथवा वनखल व तुंगारतन या तप्यांतील गांवें उत्तम रीतीनें वहीतीस आणण्यासाठीं प्रोत्साहन देणें हा आहे. वनखल तप्यांतील ४९ गांवांपैकीं २० गांवें वहितीखालीं होतींच. पण त्यांची अधिक भरभराट करावयाची होती (ले. ११४). उरलेलीं २९ गांवें वैराण होतीं तीं वहितीस आणण्यासाठीं पांच वर्षांच्या चढत्या–वाढत्या वसुलाचा कौल दिला आहे. (ले. ११५) आणि तुंगारतन तप्यांतील ३४ वैराण गांवांबद्दलचें अभय क्र. ११६ मध्यें आहे. हीं गावें वैराण पडण्याचें कारण ११४ व ११५ मध्यें नमूद केलेलें नाहीं. पण ११६ मध्यें 'तसवीस गनीम लईम' अर्थात् शत्रूचा म्हणजे मराठ्यांचा त्रास हें कारण गांव उद्ध्वस्त होण्याचें सांगितलें आहे. क्र. ११४ व ११५ मध्यें ईंथ (यूंत), कोये, पेचे, तरवाको, ईत (त), ईतगोज (तंगोज) इल, असे अगदीं अपरिचित शब्द आले आहेत. तुर्की द्वादशवर्षचक्रापैकीं शेवटच्या सहा वर्षांना यून्त, कूई, वीची, तरवाकू, ईत, तन्गूझ हीं तुर्की नांवें असून त्यांचे अपभ्रष्ट उच्चार येथें आले आहेत. इल या तुर्की शब्दाचा अर्थ वर्ष. या कालगणनेविषयीं माहिती नसल्यानें अनेक देशी–विदेशी विद्वानांनीं याच्या

निर्देशांच्या वाचनांत विलक्षण चुका केल्या आहेत. या वर्षवकाच्या सायंत माहितीसाठीं पहा खरे–संशोधकाचा मित्र भाग १ पृ. ८०, इस्लामिक कल्वर रौप्यमहोत्सवी अंक भाग २ पृ. ६५ आणि आशियाई पुरातत्त्व परिषद् व प्राच्यविद्या विश्वसंमेलन यांच्या दिल्ली अधिवेशनांत वाचलेले पण अप्रकाशित लेख. येथें आलेलीं तुर्की वर्षे १६९० ते १६९४ या इसवी वर्षांशीं जुळणारीं आहेत. यांत रुपयाच्या खालचें नाणें म्हणून आण्याचा उल्लेख आला आहे. पण त्या वेळीं आण्याचें खरोखरीं नाणें होतें कीं केवळ हिशेबासाठीं त्याचा उपयोग करीत ?

११७

या पत्रांत फ. ११०० (श. १६१२ = इ. १६९०) मध्यें गनीम म्हणजे येथें मराठे यांनीं हातनोली गांव जाळला असें सांगितलें आहे. क. ११६ व ११७ मधील हालचाली एकच असतील किंवा एकामागून एक झाल्या असतील.

११८

हें कान्होजी आंग्र्यानें दिलेलें अभयपत्र आहे; पण याचें स्वरूप थोडें निराळें आहे. सामान्यतः जमीन वहितीस आणण्याविषयीं अभयपत्र असेल तर चढता–वाढता वसूल घेत ठरीव वसुलापर्यंत आणून ठेवीत उ. क. ११५, ११६. पण येथें पांच वर्षांपर्यंत वसूल एकच ठरीव घ्यावयाचा आहे. मात्र वहितीस आणावयाच्या जमिनींत— सु. ११२३ च्या पाहणीप्रमाणें सु. ११२४ मध्यें मूलतः १३०१॥ (१३ बिघे, ५॥ पांड जमीन वहितीस आहे असें धरून—दर वर्षी तीन तीन बिघ्यांची वाढ करतां करतां सु. ११२८ पर्यंत २५०१॥ बिघे जमीन कसण्याखालीं आणावयाची असें बंधन येथें आहे.

१२३

इंग्रजांनीं हुबळीहून ता. ५ सप्टेंबर १६६६ रोजीं लिहिलेलें एक पत्र आहे (शिवकालीन पत्रसारसंग्रह क्र. ११३५). यांत म्हटलें आहे कीं, रुस्तुमे झमान ह्या आदिलशाही सरदारानें रांगणा किल्ला शिवाजीचा एक अधिकारी रावजी पंडित याच्या स्वाधीन केला. रांगणा किल्ला या वेळीं मराठ्यांना मिळाला हें निश्चित. कारण हा परत मिळविण्यासाठीं श. १५८९ वैशाख (इ. १६६७ मे) मासीं आदिलशाहाचे दोन सरदार बहलोलखान व व्यंकोजी भोसले यांनीं रांगण्यास वेढा घातला असतां तो शिवाजीनें मारून काढला अशी नोंद जेधे शकावलींत आहे (शिचप्र. ३४). उपर्युक्त ११३५ च्या पत्रांतील घटनांचा कालदृष्ट्या विचार केला तर असें स्पष्ट दिसतें कीं, रांगणा किल्ला मराठी राज्यांत गेल्यानंतर सुमारें पंधरा वीस दिवसांनीं म्हणजे ५ सप्टेंबर १६६६ ला तें पत्र लिहिलें आहे. तेव्हां त्यापूर्वी ऑगस्टच्या मध्यास रांगणा मराठ्यांकडे आला असला पाहिजे. प्रस्तुत पत्राचा काल २१ ऑगस्ट १६६६ आहे. तेव्हां असें दिसतें कीं, रांगणा किल्ला या वेळीं मराठ्यांच्या सत्तेखालीं असून हवालदार विठोजी

जाधव हा शिवाजीकडील माणूस आहे. या विठोजीचा उल्लेख पुन्हा लेखांक १३२ मध्यें आला आहे; पण त्या पत्रांत कालनिर्देश नाहीं. रांगण्यावर तुरुंगांत असलेला प्रस्तुत पत्रांतील 'हरि' नेमका कोण आहे व तो तुरुंगांत कां होता हें लक्षांत येत नाहीं. एव्हां मनोहरगड मराठ्यांच्या स्वाधीन आहे व बाजी घोलप हा शिवाजीचा माणूस आहे. मनोहरगड इ. १६६४ ऑगस्ट २४ च्या पूर्वी शिवाजीनें घेतला होता असें सावंतवाडीच्या राजांकडील एका अप्रसिद्ध फार्सी (क्र. १६). पत्रावरून सिद्ध होतें.

१२४, १२५, १२८

या तिन्ही पत्रांत रजपूत शब्द आला आहे तो केवळ शिपाई या अर्थी आहे. शहाजीनें आपल्याला प्रसिद्ध पत्रांत स्वतःस आपण रजपूत लोक असें संबोधिलें आहे. याचाही अर्थ आम्ही शिपाई गडी असाच आहे. येथें रजपूत जमातीशीं कांहीं संबंध नाहीं.

१३३

या पत्रांत कालनिर्देश नाहीं; पण याचे जे प्रेषक व ग्राहक तेच क्र. १२२ चे असून त्याचा श. १५८८ श्रावण वद्य १२ (इ. १६६६ ऑगस्ट १७) हा काल आहे. तेव्हां हें १२२ व्या पत्राच्या थोडें आगेमागें ठेवण्यास हरकत नाहीं. सावंतवाडीच्या राजांकडील एका अप्रसिद्ध हि. १०७५ जिल्काद २० (श. १५८७ ज्येष्ठ वद्य ७, इ. १६६५ मे २६) या कालाच्या फासां आदिलशाही फर्मानांत श्रीपतराव मजलिसी यास कुडाळ परगणा व आसपासचे महाल यांच्या कमाविसीचें (सारा वसुली) व इतर काम सांगून पाठविल्याचें नमूद आहे (क्र. १८). ऐफासा २१४७ हें आदिलशाही फर्मान हि. १०७७ जवल २६ (श. १५८८ कार्तिक वद्य १३, इ. १६६६ नोव्हेंबर १४) या कालाचें असून त्यांत श्रीपतराव मजलिसी मुस्तफाबाद (दाभोळ) बंदराचा आसमंत आणि मुजफ्फराबाद (रांगणा) मामला यांवर अधिकार चालवीत होता असें नमूद आहे. प्रस्तुत पत्रांत श्रीपतराव विजापुराहून पाटगांव बाजूस नामजाद झाल्याचें सांगितलें आहे व हें पत्र शिवाजीच्या पक्षाचें आहे. तेव्हां श्रीपतराव शिवाजीच्या प्रदेशावर स्वारी करण्यासाठीं येत असला पाहिजे याविषयीं शंका नाहीं.

मुद्रक : द. वा. आंबेकर, आर्यभूषण मुद्रणालय, ९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४.
प्रकाशक : गं. ना. मुजुमदार, ग. ह. खरे, वि. त्र्यं. शेटे. १३२१ सदाशिव पेठ, पुणें २.
मालक : भारत इतिहास संशोधक मंडळ, १३२१ सदाशिव, पुणें २.

(४) या खंडांत प्रकाशिलेले कागद कसे, केव्हां व कोणाकडून मिळाले हें प्रत्येक प्रकरणाच्या आरंभीं निवेदिलें आहे. यांपैकीं (१) नेर्ली-इनामदार व (२) निपाणी-देसाई, या दोन प्रकरणांतील कागदांच्या नकला मुख्यतः माझे मित्र श्री. **मा. द. आपटे** यांनीं केल्या आणि (३) चौक देशमूख व (४) संकीर्ण पत्रें या प्रकरणांतील बहुतेक कागदांच्या नकला श्री. **ना. के. जोशी** यांनीं केल्या. मीं नकला रुजू घेण्याचें व त्या कामांतील अडचणी निवारण्याचें काम केलें. पत्रांच्या तारखा काढण्याचें काम उपर्युक्त आपटे व जोशी यांनीं केलें असून प्रुफें तपासण्याचा मुख्य भार श्री. ना. के. जोशी यांनीं उचलला. माझे मित्र श्री. **ब. मो. पुरंदरे** व श्री. **गो. त्रिं. कुळकर्णी** यांनीं संपादनकार्यांत बनलें तें साह्य दिलें. हीं पत्रें मंडळांत येऊन उणे अधिक दिवस लोटले. मला वाटत होतें कीं, या पत्रांचा शांतपणें अभ्यास करून व उत्तम विवरणात्मक टिपणें लिहून तीं प्रकाशित करावीं. परंतु तसें करण्यास सवड मिळण्याचीं चिन्हें दिसेनात; एवढेंच नव्हे तर जमवून आणलेले कागद पुनः पुनः तपासून त्यांपैकीं उपर्युक्त कागद बाजूला काढण्याइतकीही फुरसत मिळाली नाहीं. सामान्यतः एकदांच तपासणी करून बरे वाटले ते कागद येथें प्रकाशनासाठीं घेतले. यामुळेंच एक महत्त्वाचें पत्र गळत होतें; तें आतां पूरणिकेंत घातलें आहे. केवळ चौक देशमुखांचे व संकीर्ण प्रकरणांतील कागद मुळांतच थोडे असल्यामुळें पुनः तपासणें शक्य झालें. पण तेंही त्या त्या प्रकरणांची छपाई चालू असतां. यामुळें प्रकरणांचे प्रस्ताव व प्रत्यक्ष पत्रें यांतील माहितींत थोडासा फरक पडला आहे. त्या त्या प्रकरणांतील मराठी पत्रांच्या जोडीनें मिळालेलीं फार्सी पत्रें मी सतत विचारांत घेतों तर विवरणात्मक टीपांत आणखी पुष्कळ चांगला फरक पडला असता. तसेंच कालविरहित पत्रांचा कालनिर्णय करण्याच्या कामीं त्यांचा पुष्कळ उपयोग झाला असता. पण मी तसें करूं शकलों नाहीं. शिवचरित्रसाहित्याच्या ६ व्या खंडांत मुख्यतः कर्नाटकांतून आणलेल्या पत्रांचें संपादन मीं केलें आहे. तें करीत असतां त्या खंडांत आलेल्या सर्व अपरिचित गांवांचा तपास करून त्यांचा निश्चय करण्याचा प्रयत्न मीं केला. प्रस्तुत खंडांतील पत्रें बहुशीं कर्नाटकांतील असल्यानें व त्या खंडाच्या मानानें यांतील गांवें आणि विशेषतः कटोरगड, गंधर्वगड, पराक्रमगड, पवित्रगड, पारगड, वल्लभगड, इ. किल्ले अधिक अपरिचित असल्यानें तसा प्रयत्न येथें करणें आवश्यक होतें. पण वेळेच्या अभावीं तेंही होऊं शकलें नाहीं. तातडीचा तडाखा म्हणतात तो असा.

(५) मंडळाच्या शक १८८५ च्या वृत्तांतामध्यें ती हकीकत येईलच; पण येथेंही मोठ्या दुःखानें सांगावें लागतें कीं, श्री. शां. वि. आवळसकर, श्री. श्री. चिं. वि. जोशी, श्री. त्र्यं. शं. शेजवलकर व श्री. शं. ना. जोशी अशा चार मंडळ कार्यकर्त्या सभासदांचें गेल्या १० महिन्यांतच निधन झालें. यमराजानें हा फारच जबर तडाखा दिला. 'आलें देवाजीच्या मना तेथें कोणाचें चालेना' हेंच खरें.

श. १८८६ शिवराज्याभिषेकदिन इ. १९६४ जून २२	ग. ह. खरे संपादक व चिटणीस